म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय : नाटक
दा. क्र. : २०३४४

IRBK-0120344
IRBK-0120344

13 NOV 2000
12 JUN 2002

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

-5 MAR 1997
18 FEB

( क्रृ. मा. प. )
५०००-१२-८२

वाचनालय
नाटक
20388
१४।६।८४

संगीत

# वेड्यांचा बाजार

लेखक
कै. राम गणेश गडकरी
व
कै. चिंतामण गणेश कोल्हटकर

IRBK-0120344
IRBK-0120344

रम्यकथा प्रकाशन, पुणे -- २

किंमत ८ रुपये

प्रकाशक : वा. ग. मेहेंदळे
रम्यकथा प्रकाशन, ३९२ नारायण पेठ,
कान्हेरे बिल्डिंग, पुणे-३०

नवी आवृत्ति : १९७०
पुनर्मुद्रण : १९७५

मुद्रक : वा. ग. मेहेंदळे
जयभारत मुद्रणालय,
५५१ बुधवार, पुणे-२

म. ग्रं.
वा. क्र. 20384
दि. 9/8/58
नाटक

श्रीशंकर प्रसन्न

॥ श्रीशं वंदे ॥

# पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना

सुमारें १॥ तपापूर्वी कै. गुरुवर्य राम गणेश गडकरी हे किर्लोस्कर संगीत मंडळींत मास्तर असतांना त्यावेळच्या किर्लोस्कर कंपनीच्या उत्साही चालकांनीं चालविलेल्या रंगभूमि मासिकांत त्यांनीं या प्रहसनाचे २ अंक मधूनमधून लिहून छापून प्रसिद्ध केले. यानंतर या दोन अंकांचें पुढें काय करावें याचा त्यांचा त्यांनाच वारंवार विचार पडलेला दिसतो. असें होण्याचीं कारणें : (१) त्यांनीं हें कथानक प्रथम मनाशीं ठरवून नंतर लिहावयास घेतलेलें दिसत नाहीं. या नाटकांतील मूळचा नायक जो बाळाभाऊ, त्याच्यावर प्रथम हें प्रहसन लिहिण्याचा मानस असावा. पण पुढें जशी दुसऱ्या कथानकाची जुळणी व्यवस्थेशीर होत चालली असें त्यांना वाटलें; तसें त्यांनीं त्या पहिल्या नायकाला थोडें मागें खेंचून या उपकथानकांतील पात्रांनाच प्रामुख्य दिलें. (२) हें प्रहसन म्हणून लिहावयाचा त्यांचा प्रथमचा मानस असावा पण पुढें त्यांना कथानकाची जुळणी जरा बरी वाटल्यावर याचेंच नाटक करावें असें वाटलें असावें. कारण त्यांनीं कथानकांतील पात्रांच्याच तोंडून वदविलें आहे कीं, 'साधलें तर नाटक नाहीं तर प्रहसन आहेच.' (३) तसेंच, हे दोन अंकसुद्धां त्यांनीं किती हप्त्यांनीं लिहिले व त्यामुळें त्यांचा त्यांनाच कथानकाचा वारंवार विसर कसा पडला हें तिसऱ्या अकांतील पिलंभटाच्या तोंडीं घातलेल्या उद्‌गारावरून सहज लक्षांत येण्यासारखें आहे. 'या अवकाशांत मी पूर्वानुसंधान बरेंच विसरलों आहें.' यानंतर त्यांच्या प्रतिभेचा प्रवाह महाराष्ट्रांत मोठ्या प्रमाणावर निरनिराळ्या मार्गांनीं जोरानें वाहूं लागला व त्यामुळें त्यांना सर्वस्वीं तिकडे लक्ष देणें भाग पडलें. त्यानंतर पुन्हां सन १९१५ मध्यें प्रस्तुत लेखक किर्लोस्कर मंडळींत असतां हें प्रहसन रंगभूमीवर आणावें असें ठरलें व त्याप्रमाणें एक दिवस तालमीस सुरुवातहि झाली; पण त्याच वेळीं 'पुण्यप्रभाव' या नाटकाच्या तालमी जोरांत चालू

असल्यामुळें हा विषय पुन्हां बाजूला पडला. प्रेमसंन्यासानंतर घडलेल्या पुण्य-प्रभावामुळेंच हा 'वेड्यांचा बाजार' भरावयाची पुन्हां १० वर्षांनीं आलेली संधि वायां गेली, व कवीला 'राजसंन्यास' प्रथम करावासा वाटूं लागला. यानंतरची हकीगत महाराष्ट्र रसिकांसाठीं लिहिणें म्हणजे त्यांना बऱ्याच माहीत असलेल्या गोष्टींची पुनरुक्ति करण्यासारखें असल्यामुळें या वेड्यांच्या बाजाराची कवीच्या हयातींत काय हालहवाल होती त्याची माझ्या माहितीप्रमाणें मीं मांडणी केलेली आहे. एवढें खरें कीं, हा बाजार एकदां रंगभूमीवर भरावा अशी कवीची मनापासून इच्छा होती.

प्रस्तुत लेखक नट म्हणून महाराष्ट्र रसिकांच्या किंचित् जरी प्रेमाला पात्र झाला असेल तर तें कै. गुरुवर्य गडकरी यांच्याच कृपेचें फळ होय! तसेंच, प्रस्तुत लेखक व त्यांचे दुसरे नटमित्र यांच्याचकडे 'बलवंत' मंडळीचें चालकत्व असल्यामुळें या मंडळीला 'बलवंत' करण्याचा भार त्यांनाच आपल्या शिरावर घेणें भाग पडलें. रोगानें पूर्ण पछाडलें असतांहि हा भार शिरावर पडल्यावर तो त्यांनीं कसा वाहून नेला व महाराष्ट्र रसिकांचें व मंडळीचें कसें 'भावबंधन' केलें याचें उदाहरणच 'भावबंधन' होय. काळाचा पाश गळ्याभोंवतीं पडला असतां एका हातानें जगाच्या भावनांचीं जाळी सोडवून त्यांचें बंधन करण्यास हा कवि दुसऱ्या हातानें जगाला राम--राम करणारा विरक्त राम कवि ज्यावेळीं आम्हांला सोडून गेला त्यावेळीं आमचे प्राण---

याप्रमाणें त्यांच्याच आशीर्वादानें नांवारूपास आलेल्या मंडळीला आपल्याकडून त्यांची सेवा होईल तेवढी करणें अर्थात् कर्तव्याचें होऊन बसलें व याच कर्तव्याला जागण्यासाठीं त्यांच्या निधनानंतर दोन वर्षांनीं श्रीमन्महाराज तुकोजीराव होळकर सरकार बहादूर यांचे हुकुमावरून त्यांचेसमोर 'राजसंन्यास' या अपूर्ण नाटकाचा प्रथम प्रयोग केला. राजसंन्यास नाटकाचें कथानक सर्वसाधारण सर्वांच्या परिचयाचें असल्यामुळे व त्या काळच्या जुन्या भाषेला या काळांत नावीन्य उत्पन्न करण्याची कवीची हातोटी अद्भुत असल्यामुळे तें जसेंच्या तसेंच अपूर्ण लोकांचे पुढें मांडणें मंडळीचें कर्तव्य होतें. तें नाटक पूर्ण करण्यासाठीं ४।२ विद्वानांना विचारलें असतां त्यांनीं सांगितले कीं ही गोष्ट अशक्य आहे. एक तर या महाकवीच्या

महाकाव्यांत हात घालणें, म्हणजे कारणावांचून हात दाखवून अवलक्षण करून घेण्यासारखें आहे ! कोणी म्हणत कीं, हा अष्टमीचा अर्धा चंद्र पापडाचा अर्धा भाग आकाशांत वर फुंकरून तो चंद्र मी पूर्ण करीन असें म्हणण्यासारखें आहे. कांहींनीं सांगितलें कीं, ' राजसंन्यास ' च जर पूर्ण करावयाचें तर दुसऱ्याच्या संसारांत जाऊन अशी जोखमीची उलथापालथ करण्यापेक्षां स्वतःचा संसार थाटलेला काय वाईट ! त्याप्रमाणें बहुतेकांचा निरनिराळ्या अर्थाचा नकार पडत गेल्यामुळें व तें नाटक रंगभूमीवर आणणें अत्यंत जरूरीचें वाटल्यावरून तें तसेंच बसविलें व रंगभूमीवर आल्यावरहि लोकांनीं त्याचा अत्यंत आदरपूर्ण व प्रेमयुक्त अंतःकरणानें स्वीकार कसा केला हें मुंबईचे सतत तीन महिने अवेळीं होत असलेले सकाळचे प्रयोग या एकाच सप्रयोग गोष्टीवरून सिद्ध होण्यासारखें आहे. याप्रमाणें एका अपूर्ण कामगिरींतून पूर्णपणें मुक्त झाल्यानंतर दुसरा प्रश्न राहिला ' वेड्यांच्या बाजाराचा '! या दुसऱ्या नाटकाला मोठी अडचण म्हणजे प्रहसनवजा लिहिलेल्या या अपूर्ण गोष्टीचा शेवट झालेला दाखविला नाहीं तर लोकांना गोडी कशी लागावी ? कारण हें कथानक कांहीं सर्वांच्या माहितीचें नव्हे. बरें, भाषेच्या व नाट्याच्या दृष्टीनें जरी विचार केला तरी त्यावेळचे गडकरी हे बालगडकरी होते. सिंहगडाला घोरपड लावणें, तलवारीच्या धारेवर नाच करणें या गोष्टी ते शिकत होते ! त्यामुळें या प्रहसनांत त्यांच्या नाट्यलेखनाचा बारकावा नसल्यामुळें हें जर असेंच लोकांचे पुढें मांडलें तर लोकांना तें कितपत रुचेल ? त्यानंतर शेवटचा विचार म्हणजे इतके सगळे प्रश्न बाजूला ठेवून जरी हें नाटक रंगभूमीवर केलें असतें तर तो प्रयोग १॥ तासापेक्षां जास्त झाला नसता ! तेव्हां वरील सर्व गोष्टींचा विचार करून हें नाटक पूर्ण करून नंतरच रंगभूमीवर आणावें अशी धाडसाची कल्पना प्रथम मनांत आली ! पण तें पूर्ण करावयाचें झालें तर कोणीं करावयाचें हा दुसरा प्रश्न ! त्यासाठीं १०।५ मंडळींना विचारून पहातां कोणी या गोष्टीस तितक्या उत्सुकतेनें पुढें येईना, कारण हें प्रहसन आहे-- कसें काय होईल ! उगीच आपण आपलें नांव एवढ्या मोठ्या कवीच्या नांवापुढें जोडायचें, पण तें कमीपणाचें ठरलें तर ? या सर्वांपैकीं एक योग्य व रसिक विद्वान तयार झाले होते, पण दैवाच्या फेऱ्यांत ते सध्या फिरत असतां

त्यांना आणखीं त्रास देणें योग्य वाटलें नाहीं व त्रास देऊनसुद्धां हें प्रहसन योग्य वेळीं तयार होईलच ही खात्री नव्हती ! तेव्हां नाइलाजास्तव पूर्वी ज्या धाडसाची कल्पनासुद्धां नव्हती त्या बाबतींत नुसते कल्पनेचेंसुद्धां धाडस वाटूं लागलें ! या बऱ्याच लांबलेल्या हकीगतीची एवढी प्रस्तावना करण्याचें कारण प्रस्तुत लेखक या बाबतींत धाडस करावयास कसा प्रवृत्त झाला हें सांगणें होय. नाटक तर रंगभूमीवर आलें पाहिजे हा मंडळीचा हेतु. अर्थात स्वतः हें धाडस करणें यावांचून दुसरा मार्ग राहिला नाहीं. आतां लेखणी उचलण्यापर्यंत माझी अक्षराशी ओळख कधीं झाली व कशी झाली हें सांगत न बसतां कै. गु. गडकरी यांनी लावलेल्या काव्योद्यानांत हिंडण्याचा माझा हक्क अतिशय निराळ्या स्वरूपाचा होता व आहे व आणि त्याच हक्कानें मीं या उद्यानांत प्रवेश करून त्यांनींच लावलेल्या झाडावर जीं माझ्या आटोक्यांत चार फुलें दिसलीं तीं मीं तोडलीं आहेत आणि आपणां सर्वांसमक्ष आज तीं त्यांच्याच समाधीवर मी अर्पण करीत आहें. ही मीं भक्तियुक्त अंतःकरणानें केलेली पूजा सर्व हृदयांना मान्य होवो अशी त्या जगन्नियंत्याजवळ माझी प्रार्थना आहे.

बेळगांव
ऑक्टोबर १९२३

चिं. ग. कोल्हटकर
बलवंत संगीत मंडळी

... ग्रंथ, ... ... ... वाचनालय
20388 नों. दि. ........
वि. ७१२८ ...... क्र. ९४६५८

॥ श्रीगणेश प्रसन्न ॥

संगीत

# वेड्यांचा बाजार

---

**नमन**

( **राग**– भूप. **ताल**– झंपा. )

अतुल तव कृति अति भ्रमवि मति ईश्वरा ! ॥ धृ० ॥ वर्षंती मेघजल, शांतविति भूमितल, सलिल मग त्यजुनि मल जात सुरमंदिरा ॥ गोविंद पूर्व–पद–अग्रज स्मरुनि पद, उधळि निज हृत्सुखद शब्द–रत्नाकरा ! ( गोविंदाग्रज )

## अंक पहिला

### प्रवेश पहिला

(**पात्रें**– मधुकर व वसंत. **स्थळ**– रस्ता )

**मधुकर**– वेड्यांचा बाजार आहे आमचें घर म्हणजे ! वसंतराव, एकेकाचा प्रकार ऐकलांत तर अक्कल गुंग होऊन जाईल तुमची ! नाहींतर उगीच वेणुताईचें लग्न इतकें लांबणीवर पडलें असतें का ! आज कांहीं नाहीं तरी सोळावें वर्ष असेल तिला ! पण आमचे तात्या पडले ज्योतिष्याच्या नादांत. अण्णासाहेबांना सगळा वैद्यकाचा व्यापार आणि आईला देवधर्म पुरतात ! बरें, दादाविषयीं म्हणाल तर त्यानें संन्यासदीक्षा घ्यावयाची फक्त बाकी ठेविली आहे !

**वसंत**– खरेंच, माधवरावाच्या डोक्यांत हें वेड कसें काय आलें ?

**मधुकर**– लग्न झालें तोंपर्यंत सर्व ठीक होतें; पुढें त्यांना कळलें कीं, वहिनीला लिहितां-वाचतां येत नाहीं म्हणून; आणि हे म्हणजे पक्के सुधारणावादी ! केला निश्चय की, पुन्हां म्हणून बायकोचें तोंड पहावयाचें नाहीं

आणि त्या सुमारास विवेकानंद, स्वामी रामतीर्थ, हंसस्वरूप या मंडळींच्या व्याख्यानांचा प्रसार सुरू झाला होता. त्या वैतागांत आमच्या दादासाहेबांनींहि परमार्थाची कांस धरली ! इकडे बिचारी रमावहिनी माहेरीं चांगले लिहायला-वाचायला शिकली, पण उपयोग काय ? इतक्या अवकाशांत दादासाहेब पूर्ण विरक्त बनले ! वहिनींना घरीं आणावयाचें नांव काढलें कीं हे घर सोडण्याच्या प्रतिज्ञा करायला लागतात !

**वसंत**– पण, मधुकर, मला वाटतें कीं, माधवरावांचें हें वैराग्य फार दिवस टिकणार नाहीं ! हें दोन दिवसांचें वारें दिसतें सगळें ! कांहीं प्रयत्न केला तर माधवराव अजून ठिकाणावर येतील !

**मधुकर**– येतील तेव्हां खरें ! पण आज तर घरांत एका वेड्याची भर पडली आणि बाकीच्यांच्या वेडांना उठावणी मिळाली ! तात्या म्हणतात, त्याला साडेसाती आहे सध्यां; अण्णा म्हणतात, अभ्यासानें आणि जाग्रणानें त्याचें डोकें फिरलें आहे आणि आई म्हणते, कुणीं तरी जादुटोणा केला आहे !

**वसंत**– आणि तिघांचेहि आपापल्या परीनें सारखे उपाय चालू असतील.

**मधुकर**– तें कांहीं विचारूं नका. त्याच्या पत्रिकेचीं वर्षफळें काढण्यांत तात्या वर्षेच्या वर्षे घालवितात; अण्णांच्या औषधांनीं आणि काढ्यांनीं त्याची अन्नपाण्याचीसुद्धां गरज भागविली आहे आणि आईनें तर अंगाऱ्या धुपाऱ्यांनीं त्याला शुद्ध वैरागी बनविला आहे !

**वसंत**– काय विलक्षण मंडळी ! हा प्रकार पाहून तुम्हांला अगदीं वेड्यासारखें होत असेल !

**मधुकर**– अहो, इतक्यानें कुठें आटोपतें आहे सारें ? दादाच्या लग्नांत आपण चुकलों असें प्रत्येकाला वाटतें आहे आणि वेणुताईच्या लग्नाबद्दल फाजील सावधगिरी घेऊन मागच्या चुकीचा वचपा भरून काढण्याची तिघांनींहि आपापल्या मनाशी गांठ बांधून ठेविली आहे !

**वसंत**– आमची यमुताई मोठी भाग्याची म्हणून निर्विघ्नपणें तुमच्या पदरांत पडली म्हणायची !

**मधुकर**– त्यावेळीं आमच्या मंडळींत इतकी जागृति झाली नव्हती. नाहींतर माझ्या लग्नाचा प्रकारसुद्धां वेणुताईच्या लग्नासारखाच झाला असता. हल्लीं मात्र खरा तमाशा चालला आहे घरांत ! वेणुताई आणि दादा यांच्या कल्याणासाठीं तिहेरी उपायांचा सारखा मारा सुरू आहे.

**वसंत**– यमुताई कधींकधीं या गोष्टी सांगते, पण इतका प्रकार असेल असें नव्हतें आम्हांला वाटत ! मग कदाचित् ती मुद्दाम सांगत नसेल !

**मधुकर**– ती सांगणार किती तुम्हांला ! अण्णांनीं या दोघांसाठीं औषधांचा असा सांठा करून ठेविला आहे घरांत, कीं तो पाहून मुर्दी आंजल्यांच्या वैद्यांना-सुद्धां लाज वाटावी ! आईनें दोघांच्या हातांपायांत गंडेताइतांची इतकी गर्दी केली आहे कीं दोघांनींहि ताबुतांत फकिरी घेतली आहे असा भास होतो. आणि तात्यांनीं तर या दोघांचीं वर्षफळें, पत्रिका यांच्या नकला करण्यासाठीं आणि टिपणें करण्यासाठीं वीस रुपये दरमहाचा एक स्वतंत्र कारकून ठेवून दिला आहे !

**वसंत**– आणि माधवराव हें सारें मुकाट्यानें सोशीत असतात वाटतें ?

**मधुकर**– तो इकडे लक्षच देत नाहीं ! भोंवतीं बैराग्यांचा एक तांडा असला म्हणजे झालें ! त्यानें तर घराला धर्मशाळेची कळा आणून ठेवली आहे.

**वसंत**– अशा घोटाळ्यांत सारी जबाबदारी तुम्हांलाच संभाळावी लागते हें स्वाभाविकच आहे. मधुकर, मी वेणूच्या लग्नाचा विषय आज मुद्दामच काढिला आहे हें तुमच्या लक्षांत आलेंच असेल.

**मधुकर**– तुम्ही न बोलतां तुमचा हेतु माझ्या डोळ्यांसमोर नेहमीं उभा असतो; पण ज्या गोष्टीचा इलाज आपल्या हातीं नाहीं तिचा नुसता उच्चार करण्यांत काय हंशील आहे या विचारानें मी नेहमीं स्वस्थ बसतों.

**वसंत**– तर काय; आमच्या प्रीतिविवाहाची आशा मीं सोडून द्यावी म्हणतां? मधुकर, आमचा प्रीतिविवाह म्हणजे एखाद्या नाटकांतली नाहीं तर कादंब-रींतील बडबड समजूं नका ! तुमच्या लग्नांत वेणु मला देण्याबद्दल जी सारखी थट्टा चालली तिचा आमच्या दोघांच्याहि मनावर अगदीं तात्पुरताच परिणाम झाला नाहीं. लग्नानंतर यमुताईबरोबर मी तुमच्या खेडेगांवीं एक महिनाभर होतों त्यावेळीं एकमेकांच्या अधिक परिचयानें तो परिणाम दृढ झाला. तुमच्या लग्नांतल्या थट्टेला आम्ही लग्नापेक्षां जास्त महत्त्व देऊं लागलों. पुढें, तुम्हांला माहीतच आहे, मी जरी त्यानंतर कधीं तुमच्या घरीं आलों नाहीं तरी या तीन चार वर्षांत आमच्या यमुताईबरोबर वेणु आमच्या घरीं दोन चार वेळां महिना महिना राहिली होती. या अवकाशांत आमच्या एकमेकांच्या गुणाची आम्हांला पारख पटून तुमच्या लग्नांतल्या थट्टेला आमच्या लग्नानें खरेपणाचें स्वरूप देण्याचा निश्चय केला आणि या

कामांत माझी सारी भिस्त, मधुकर, एकट्या तुमच्यावरच आहे. आमच्या लग्नाला तुमची आडकाठी नाहीं ना ?

(राग– यमन; ताल– दादरा.)

वैवाहिक दीक्षा जधिं प्राप्त हो तुला ।। प्रेमोत्सव होई कीं तेंवि तो मला ।। धृ० ।। आप्तवर्ग बांधिति तीं सूत्र–बंधनें ।। तींच करिति सुदृढ सुनव प्रेम–बंधनें ।। अंकुरित प्रेमांकुर होई त्या पळा ।।१।।

**मधुकर**– असल्या अनुरूप विवाहाला दुर्दैवाखेरीज दुसऱ्या कोणाची आडकाठी असणार ? मीं मागेंच एक दोन वेळां तुमच्यावद्दल गोष्ट काढिली होती; पण तात्या म्हणतात– तुमचें टिपण जमत नाहीं, आई म्हणते–परतवेल होते; आणि अण्णा तर वैद्याच्या मुलाखेरीज कोणाचें नांवसुद्धां काढूं देत नाहींत. यंदा तात्यांनीं पुढल्या महिन्यांत वेणूचे ग्रह साधारण बरे आहेत, तेव्हां तेवढ्यांत लग्न करून घ्यायला हरकत नाहीं म्हणून लग्नाला कशीतरी परवानगी दिली आहे एकदांची ! तेव्हां आतां लोकांचीं तोंडें बंद करण्यासाठीं निदान त्या बाळाभाऊशीं का होईना, पण एकदांचें वेणूचें लग्न करण्याचा मीं विचार केला आहे.

**वसंत**– बाळाभाऊ कोण हा ?

**मधुकर**– अहो, तो आमच्या गांवच्या वैद्यबुवांचा मुलगा ! वैद्यबुवानीं अण्णांच्यावर आपल्या वैद्यकाचें चांगलेंच जाळें पसरलें होतें. अण्णा त्यांच्या अगदीं अर्ध्या वचनांत वागत असत. वैद्यबुवांच्या अंतकाळीं अण्णांनीं त्यांना वचन दिलें कीं, वेणु बाळाभाऊला देईन म्हणून. आतां बाळाभाऊनें स्वत: नकार दिल्याखेरीज अण्णा म्हणतात कीं मी कांहीं माझ्या वचनाला बाध आणणार नाहीं.

**वसंत**– बरें; निदान मुलगा तरी बरा आहे का ?

**मधुकर**– कसला बरा ? जाणूनबुजून पोरीला विहिरींत लोटायची ! घरच्या माणसांनीं शिकण्यासाठीं इथें ठेवला आणि मुलानें नाटकाचा छंद धरिला ! उठतां बसतां नाटकाखेरीज बोलणें नाहीं ! नेहमीं नाटकवाल्यांत पडलेला !

**वसंत**– आणि अशा माकडाच्या पदरीं तुम्हीं असलें रत्न बांधणार ? मधुकर, यापेक्षां वेणूला खरोखरीच एखाद्या–

**मधुकर**– वसंतराव, मला कांहींच कळत नाहीं असें समजूं नका ! पण हा लोकापवाद मोठा कठीण आहे ! चवाठ्यावरचीं कुत्रीं भाकरीच्या तुकड्यानें तरी भुंकायचीं थांबतात; कावळा व्रण असेल तिथें तरी चोंच मारितो, विंचवाला छेडलें तरच तो नांगी चालवितो; पण लोकांच्या कुटाळकीची तऱ्हा या सर्वांच्या विरहित असते. तेव्हां असा देखता डोळ्यानीं आगींत पाय घालायला तयार झालों आहें. वरें, दुर्दैवानें त्याचें टिपणहि तात्यांच्या पसंतीस उतरलें आहे ! आज आतां तेवढ्यासाठींच निघालों आहें. कुठून तरी त्याला हुडकून काढून एकदां मुलगी समक्ष पहा म्हणजे शास्त्रोक्त झालें म्हणून सांगतों.

**वसंत**– धिक्कार असो आमच्या समाजाला ! विचारी मनुष्याला असा अविचार करणें भाग पडतें आणि त्याबद्दल त्याला कोणी दोष देत नाहीं! अरेरे! असे प्रकार पहात बसण्यापेक्षां संन्यास घेऊन वनवास पत्करलेला बरा !

**मधुकर**– वसंतराव, असें अगदीं निराश होऊं नका ! चला, आज त्या बाळाभाऊला बोलावूं, त्याला दोन गोष्टी सांगून पाहूं ! मीहि आज रात्रीं पुन्हां तुमच्याबद्दल गोष्ट काढून पहातों ! पाहूं– प्रयत्नांतीं परमेश्वर ! नाहींतर होणाराला पाठ दिलीच पाहिजे. चला, त्या बाळाभाऊचा तपास काढूं.

**वसंत**– काशीच्या नव्या पाठशाळेंतून शिक्षण संपवून परीक्षा दिल्यानंतरसुद्धां तेथेंच राहिलों असतों आणि संन्यास घेतला असता–

**मधुकर**– वा: ! मग दादाला हंसायला कुठें जागा उरली ? चला, अहो हातपाय गाळूं नका. चला.

( राग– बिहाग; ताल– त्रिवट. )

सजुनि तुम्ही संन्यासी होतां नुरत तिळहि हंसण्या कारण इतरां कां तुम्ही हंसतां ॥धृ०॥ हा विषाद द्या त्यजुनि आम्ही प्रयत्न करुनि वरा नव यशा ॥१॥ (जातात.)

## प्रवेश दुसरा

[ पात्रें– वेणु व यमुना. ]

**वेणु**– [यादवराया भाई या हो,]

भीमकबाळा ती वेल्हाळा टाकुनि गोपाळा ॥
निश्चय केला बंधुवरानें द्यावी शिशुपाळा ॥

विवाहकाळीं खळ तो आला तंव राजस बाळा ॥
शोकभरानें विव्हळ झाली दोष लावि भाळा ॥
" अजुनि तरी या दासीसाठीं या हो गोपाळा ॥
जवळी आली काळवेळ ही संकट हें टाळा ॥
ऐन समयिं का निष्ठुर झालां ? काय असें केलें ॥
दीनावरिचें प्रेम सदाचें आज कुठें गेलें ॥
कधि वाहिन ही काया माझी देवा तव पायां ॥
कधि पाहिनसें झालें मजला सांवळि ती काया ॥
कधीं सांठविन रूप मनोहर या नयनीं देवा ॥
मिळेल केव्हां अभागिनीला प्रेमाचा ठेवा ॥
नका करूं छळ याहुनि माझा अजुनी घननीळा ॥
वाट बघुं किति घेउनि हातीं अश्रूंची माळा ॥
किती आळवूं परोपरीनें कंठ कि हो सुकला ॥
तरिहि यावया अजुनि माझा माधव कां चुकला ॥
सर्वसाक्षि भगवंता आतां अंत नका पाहूं ॥
कीं विषपानीं प्राण तरी हा पदकमला वाहूं ॥
मीच अभागी, म्हणुनी आपण अजुनी नच आलां ॥
ब्रह्म सगुण जे दुर्लभ सकलां मिळे कसें मजला ॥
रडतां यापरि अश्रुजलानें पदर भिजुनि जाई ॥
ऊर भरुनि ये, शब्दन चाले—

**यमुना**— हें हो काय वन्सं ? गाणें म्हणतां म्हणतां तुमचीसुद्धां अगदीं तुमच्या गाण्यांतल्या भीमकबाळेसारखी स्थिति झाली !

**वेणु**— वहिनी, तुझें आपलें भलतेंच ! भीमकबाळेसारखी स्थिति व्हायला मला ग काय झालें आहे ! एकादें गाणें म्हणतांना मनुष्य तसें तद्रूप नाहीं का होत ?

**यमुना**— वेणुवन्सं ! पुरे झाली ही बनावणी; तुमच्यासारखी शिकलेली नसेल म्हणून काय झालें ! इतचें का मला कळत नसेल ? सांगा पाहूं तुमच्या मनांत काय असेल तें. वा: गडे, माझ्याजवळसुद्धां आडपडदा ?

**वेणु**– वहिनी, रागावूं नकोस अशी. बायकांच्या मनाला कुठें तोंड असतें का? इतके दिवस तुला मीं माझें दुःख मुद्दाम सांगितलें नाहीं. तूं तरी काय करणार बापडी ! रमावहिनीचें दुःख आपल्याला पुष्कळ माहीत आहे. पण काय उपाय होतो आपल्या हातून तिथें तरी ? तीच माझी गत. एरवीं आडपडदा कशाला ? फार झालें तर डोळे निपटीत बसावें हेंच बायकांचें समाधान.

**यमुना**– (पदरानें तिचे डोळे पुसून) नका रडूं, वन्सं, शपथ आहे तुम्हांला माझ्या गळ्याची ! आजच तुम्हांला इतकें वाईट वाटायला काय झालें ? सांगा पाहूं मला–

**वेणु**– सांगतें, पण वहिनी, ऐकून घेतल्यावर तू माझी थट्टा नाहीं ना करणार?

**यमुना**– काय बोलतां वन्सं ! चला. तुमचें बोलणें तुम्हांलाच शोभतें. हीच का माझी परीक्षा केली आजवर ? आम्हीं नांवाच्या नणंद भावजयी पण सख्ख्या बहिणीप्रमाणें आतांपर्यंत वागत आलों आणि तुमचें हें बोलणें ? मग काय बोलायचें माणसानें पुढें !

( **राग**– देस **ताल**– झपताल. )

असुनी भगिनि–भाव, का हा दुजा भाव ? मळवा न तें नांव
॥ धृ० ॥ कथुनि कारण मला, करूं नका शोक हा, मी देत
वचनाला ॥ ठेव न त्या नांव कां हा दुजा भाव ? ॥ मळवा न तें
नांव ॥ १ ॥

**वेणु**– रागावलीस पुन्हां ! तसें नव्हे वहिनी, पण सुखांतल्या माणसाला दुःखी माणसाच्या दु.खाची चांगलीशी कल्पना करितां येत नाहीं. म्हणून मी तसें बोललें, तुला लावून बोलण्यासाठीं नव्हे ! वितीच्या यातना वितीलाच माहीत; दुसऱ्यांना तिचें दुःख हलकेंच आहे असेंच वाटायचें !

**यमुना**– बरें, तसें का होईना ? मी मुळींच बोलत नाहीं आतां ! आधीं मला सांगा आणि मग पहा. मी थट्टा करतें का काय तें ? हातच्या कांकणाला आरसा कशाला हवा ? सांगा पाहूं तुम्हांला कां वाईट वाटलें मघाशीं.

**वेणु**– सांगायलाच कशाला हवें ? तूंच सांग बरें वहिनी, माझी स्थितिसुद्धां त्या भीमकबाळेसारखीच नाहीं का ?

**यमुना** – ती कशी काय ?

**वेणु**– नीट आठवण कर म्हणजे तुझ्यासुद्धां तेव्हांच लक्षांत येईल.

**यमुना**– (थोडा वेळ विचार करून) माझ्या नाही बाई कांहीं लक्षांत येत

**वेणु**– असें वेड पांघरलेंस तर कुठून येणार लक्षांत !

**यमुना**– वेड नव्हे वन्सं, खरेंच नाहीं आठवत मला कांहीं.

**वेणु**– बरें, तुझ्या लग्नांतली तरी तुला चांगली आठवण आहे ना ?

**यमुना**– अगदीं चांगली आठवण आहे ! पण तिच्यावरून काय समजायचें इथें ?

**वेणु**– बोहल्यावर तूं आणि मधुदादा होता ! मागें मी मुहूर्तांचा कऱ्हा घेऊन उभी होतें, आठवतें का तुला ?

**यमुना**– हो. न आठवायला काय झालें ? डोळ्यांदेखतच्या गोष्टी ! त्यावेळीं जाऊबाईनीं तुमच्या नि आमच्या वसंतदादाच्या पदराला गांठ मारली, मुलींनीं तुम्हांला वसंतदादाचें नांव घ्यायचा आग्रह केला, अखेर तुम्ही लाजून अगदीं रडकुंडीस आलां तेव्हां मींच ती गांठ सोडली, तेव्हांचीच गोष्ट ना ?

**वेणु**– तेव्हांचीच कशाला, तीच गोष्ट ! आतां तरी आलें ना सारें लक्षांत ?

**यमुना**– अस्सं ! अस्सं ! आतां लक्षांत न यायला वेडी का आहें मी !

**वेणु**– वहिनी, कां बरें इतकी घाई केलीस, त्यावेळीं ती गांठ सोडायची ?

**यमुना**– हें काय वन्सं ? (तिचे डोळे पुसते) या गोष्टी कुणाच्या हातच्या का असतात ? झालीं, पांच वर्षें होऊन गेलीं त्या गोष्टीला !

**वेणु**– पांच वर्षें झालीं का ग वहिनी तुझ्या लग्नाला ?

**यमुना**– हो. यंदाच्या श्रावणांतली माझी पांचवी मंगळागौर ना ? वर्षांना काय लागतें व्हायला ! आलीं– गेलीं वर्षें.

**वेणु**– मला ही गोष्ट अगदीं काल झाल्यासारखी वाटते. वहिनी, त्या दिवसापासून मला एवढ्या एकाच गोष्टीचा सारखा निदिध्यास लागला आहे. वहिनी, पुन्हां येईल का ग तशी वेळ कधीं ?

**यमुना**– हो, देवाच्या मनांत आलें तर तसेंसुद्धां घडून येईल.

**वेणु**– मला तुझे असे मोघम आशीर्वाद नकोत. तूं घेशील का मनावर माझें एवढें काम ? तुझी अगदीं जन्माची उतराई होईन.

**यमुना**– हात्तिच्या ! त्याला एवढी काकळूत कशाला करायला पाहिजे, मला नको का आहे असें झालें तर. एकदां मीं गोष्ट काढलीसुद्धां होती जवळ ! आज पुन्हां काढीन.

**वेणु**– " पुन्हां काढीन " नाहीं ! एवढ्यानें नाहीं व्हायचें माझें समाधान. उन्हाच्या धांपेंत उडत्या पांखराच्या सांवलीनें काय विसांवा मिळणार ? तू

मधुदादाला अगदीं गळ घाल आणखीं.

**यमुना**– आणखीं वसंतदादालासुद्धां ना ?

**वेणु**– हो, दोहीकडे अगदीं आळ घेऊन बैस. कांहीं म्हटल्या कांहीं आपला हट्ट सोडूं नकोस. नाहींतर पहा, बाबा कांहीं करोत, माझ्या मनासारखें नाहीं झालें तर मी कांहीं माझ्या जिवाचें–

(राग– यमन. ताल– त्रिवट.)

सोसुनि दुःखा यापरि, ऐशी ॥ होऊं भार कां या जगतासी ? ॥धृ०॥
प्रिय गोष्टींचा त्याग करोनि, अप्रिय तेंही प्रिय मानोनि,
घालूं माळा कां दुःखासी ? ॥ १॥

**यमुना**– पुरे मेलें हें बोलणें. वन्सं, तुम्हीं अगदीं बिनघोर रहा. मी काय पाहिजे तें करीन. पण तुमच्या मनासारखें घडवून आणीन. आतां तर झालें ना ?

**वेणु**– तुझ्या तोंडांत साखर पडो म्हणजे झालें.

**यमुना**– बरें, पण वन्सं, आजच तुम्हांला इतकें वाईट वाटून घ्यायला काय झालें ?

**वेणु**– आज दुपारीं जेवणावर बाबा काय म्हणाले तें सांगितलें नाहीं वाटतें मधुदादानें तुला ?

**यमुना**– कुठून सांगणें होणार, तुमचें तरी काय विचारणें.

**वेणु**– हो, खरेंच, राजाराणी गांठ पडायची ती मंचकावरच ! झालें, मुरड-लेंस नाक ! पोर व्हायची वेळ आली तरी आमच्या वहिनींचें पोरपण कांहीं गेलें नाहीं अजून.

**यमुना**– बरें, काय म्हणत होते मामंजी ?

**वेणु**– बाबांनीं मधुदादाला सांगितलें कीं, ते–ते हे आहेत ना, त्यांना म्हणावें उद्यां येऊन मुलीला शास्त्रोक्त पाहून जा एकदां म्हणून ! म्हणजे उद्यांच्या वैशाखांत घेऊं उरकून कार्य झालें !

**यमुना**– कुणाला ? आपल्या वैद्यबुवांच्या बाळाभाऊंना वाटतें ?

**वेणु**– हो!

**यमुना**– मग त्यांच्या नांवाची लाज वाटायला लागली वाटतें इतक्यांत !

**वेणु**– वघ, केलीस खरी भलतीच थट्टा ! अग लाज कशाची ? जें नांव ऐकायलासुद्धां नको तें कशाला तोंडावाटें काढूं उगीच ?

**यमुना**– आणि उद्यांच बाळाभाऊ तुम्हांला पहायला येणार वाटतें ?

**वेणु**– हो. अन् हें ऐकल्यापासून माझा जीव कसा खालींवर होत आहे सारखा! सांगशील ना तूं मधुदादाला आजच ?

**यमुना**– सांगेन, सांगेन, अगदीं खचित सांगेन. तुम्हीं कांहीं काळजी करूं नका.

[सदाशिव येतो.]

**वेणु**– या सदुभाऊ, इतक्या उन्हाचे कुणीकडे ?

**सदाशिव**– ताईनें तुम्हांला बोलाविलें आहे घरीं !

**वेणु**– कुणी ? रमावहिनीनें का ?

**सदाशिव**– हो, तिला करमत नाहीं म्हणून तुम्हांला बोलाविलें आहे घटकाभर बसायला.

**वेणु**– खरेंच, किती दिवसांत रमावहिनीकडे गेलें नाहीं. शनवार शनवार आठ, आदितवार नऊ आणि आजचा सोमवार दहा. चल, वहिनी तूं पण.

**यमुना**– अशा उन्हाच्या; अंमळशानें–

**वेणु**– गाडी आणवतें हवी तर, मग तर झालें ना !

**सदाशिव**– आणवायला नकोच. मीं आणलीच आहे आमची गाडी.

**वेणु**– झालें तर मग. गाडींत नाहीं ना झोंप लागणार उन्हाची आमच्या दादाच्या नाजुक राणीला ? चल–

**यमुना**– दमा जरा. सदुभाऊ, चहा करतें आणि मग–

**सदाशिव**– नका, आतां तुमच्या घरीं करा चहा. चला लौकर, यमू–बरें चला.

(जातात)

## प्रवेश तिसरा

[बलवंत प्रासादिक नाटकमंडळीचा दिवाणखाना. तालमीचा देखावा. कांहीं मंडळी जमली आहेत, कांहीं येताहेत, एकजण मध्येंच निजले आहेत.]

**काका**– चलारे; कृष्णा, दे घंटा आणि हाक मार बड्या मंडळीला; दादा, पांडू, भाऊराव– (दोन-तीन मुलें जातात.) हें कोण निजलें आहे, देशपांडे का ? उठीव त्यांना !

**कृष्णा**– देशपांडे, अहो देशपांडे, उठा कीं.

**देशपांडे**– अरे कां त्रास देतोस मर्दा ? आहे काय गडबड ?

**कृष्णा**– अहो तालीम.

**देशपांडे**– तालीम नाहीं आखाडा.

**कृष्णा**– काय कोट्यांचा नाद हा!

**देशपांडे**– नाद नाहीं आवाज.

**काका**– अहो, बस करा कीं; उठा. (देशपांडे उठून बसतात. मुलें येतात.)

**गोपाळ**– काका, अण्णासाहेब गेले आहेत बाहेर. पंत म्हणतात माझी आहे पाठ नक्कल, आणि गणपतराव म्हणतात तुम्हीं सुरू करा मी आलोंच. रघुनाथ, भाऊराव म्हणतात मी भांग काढून येतो केंसांना.

**देशपांडे**– भांग का गांजा ? [दोघे तिघेजण येतात.]

**पांडू**– कां काका, आम्हांला जरा उशीर झाला कीं कायदे आणि कलमें काढिलीं, आतां करा कीं दंड ?

**देशपांडे**– दंड का हात ?

**काका**– आम्ही कशाला बसतों कुणाला दंड करीत; मालक जाणें अन् तो दंड जाणे ! तो मालकांचा मान !

**देशपांडे**– मान का कंबर ?

**पांडू**– हूं. तें ठीकच आहे; मोठ्यांना कोण ठेवणार नांव ?

**देशपांडे**– नांव नाहीं होडी.

**तात्या**– गप्प बैस कसा. पांडू; अरे, ती वडील मंडळी. आपण त्यांना असें बोलूं नये. त्यांनीं कांहीं केलें तरी आपल्याला ती पूज्यच !

**देशपांडे**– पूज्य का शून्य ?

**काका**– बस करा आपला फाजीलपणा, देशपांडे. नक्कल आहे का उद्यांची पाठ ?

**देशपांडे**– (हळूच एकीकडे) पाठ का पोट ?

**काका**– बरें भाऊराव येईपर्यंत तेवढें " जाऊं कामाला " घ्या बसवून ! पांडू; सूर धर काळ्या पांचव्याचा मध्यम.

**देशपांडे**– (एकीकडे) मध्यम का उत्तम. [कांहीं मुलें पुढे येतात.]

**मुलें**– जाऊं कामाला ! चलाग दिवस किती आला ॥

**काका**– ए विन्या, नीट म्हण कीं लेका जा–ऊं.

**विन्या**– जाऊं [त्याचा सूर चुकतो.]

**काका**– अरे लेका, जा–आ–आ–ऊं.

**विन्या**– जा–आ–आ–ऊं, [सूर पुन्हां चुकतो.]

**काका**– जा–आ–आ–आ.

ठाणे, ग्रंथालय ... ०३४८ ...

**विन्या**– जा–आ–आ–आ–आ.
**काका**– चार कशाला आकार घेतोस ? जा–आ–आ–आ. प, ध, प, सा.
**विन्या**– प, ध, प, सा.
**देशपांडे**– पसा का मूठ ?
**काका**– आ–आ–आ–आ–प, ध, प, सा. [काका व विन्या म्हणतात.]
**गणपत**– (एकीकडे) तात्या हे कावळ्याची " सारीगम " करण्यापैकींचं हं. ग्वालेरीस आपला मुक्काम होता, तेव्हां एकदां सकाळीं कावळा ओरडत होता एक. काका पडले गाण्यांतले दरदी; केली सुरुवात त्याच्या ओरडण्याची सुरावट करायला. त्यांतलाच हा अव्यापारेषुव्यापार या मूठभर पोराला काय कळणार यांचा ' पधपसा ' नि ' निसधप ' !
**काका**– आ, लेका, म्हण कसें तरी. [ मुलें पद म्हणतात. ]
**शंकर**– उपवन तरूवेलींना जल मीं घालाया जातें ।। जल मी घालाया जातें.
**हरि**– हरिण शिशूंना कोमल पल्लव– काका, हरिण शिशूंना म्हणजे काय ?
**काका**– यांत काय अवघड आहे ? अरे बेट्या, हरिण म्हणजे हरणें आणि शिशू म्हणजे ससे ! हरिण शिशूंना म्हणजे हरिणांना अन् सशांना.
**गणपत**– (एकीकडे) शाबास ! शिशू म्हणजे ससे नि विश्व म्हणजे विशवे.
**हरि**–हरिण शिशूंना कोमल पल्लव चाराया जातें । पल्लव चाराया जातें ।।
**गोपाळ**– कादंबरीची कुसुम कंचुकी गुंफाया जातें । कंचुकी गुंफाया जातें ।।
**काका**– जरा चेहऱ्यांत मजा आणा की थोडी ! रडतोस कां असा ?
**दामू**– पंजर शुकसारिकेस गायन शिकवाया जातें । सगायन शिकवाया ।।
**काका**– अरे खुळ्या, सगायन काय ? आणि तूं काय गायन शिकविणार ! मांजर खाल्ल्यासारखा ओरडतो आहे नुसता ! नाहीं आवाजांत प्रेम कीं नाहीं गाण्यांत ढंग ! आणि म्हणे गायन शिकवाया जातें.
**दामू**– काका, भाऊराव आले ! [भाऊराव येतात.]
**काका**– हं, मग घ्या मुलींचा प्रवेश शारदेंतला !
**रघुनाथ**– काका, मी करूं वल्लरीची नक्कल ?
**काका**– लेका, आवाजाचे झालें आहे मडकें आणि वल्लरीची नक्कल कशाला ? बसत जा आजपासून आंतल्या पेटीवर !
**शंकर**– तात्या, तुमचे बाळाभाऊ आले ! [बाळाभाऊ दोघांशी बोलत बोलत येतात.]

**काका--** तात्या, हं, आज होऊंन जाऊंदे याची गंमत.

**तात्या--** ओ हो हो हो, बाळाभाऊ ? या, गुरु !

**बाळाभाऊ--** गुरु ? कोण; आम्ही का तुम्ही ? वा: भय्या !

**तात्या--** (हंसत) भले ! आम्ही गुरु वाटतें ! आमची काय आहे योग्यता गुरु व्हायची !

**देशपांडे--** (एकीकडे) गुरु का जनावर ?

**बाळाभाऊ--** बनवा, बनवा बुवा आम्हांला !

**तात्या--** हें बनवणें वाटतें ! आतां मात्र हात जोडले; माफ करा बाळाभाऊ; तुमची काय गोष्ट, आज तुम्ही नाटकांत नाहीं, नाहींतर झुलवून सोडलें असतें लोकांना.

**काका--** काय तात्या, बाळाभाऊ गातात वाटतें !

**तात्या--** गातात ! तुम्हीं ऐकलें नाहीं कधीं ! किर्लोस्करांच्या भाऊरावामागें एवढा एकच प्राणी आहे आज ! आपल्या इथें नेहमीं येतात तर खरें ! तान तयारी भलतीकडे. गळा फिरता, आवाजांत धार अशी आहे अगदीं किनरीसारखी ! आतां गंधर्वाचा पाडा शिल्लक नाहीं. नाहींतर हे सव्वा, दीड, अडीच गंधर्वांपेक्षांहि बालगंधर्व व्हावयाचे.

**भाऊराव--** मग, तात्या, होऊंद्या आतां कांहीं !

**काका--** हो खरेंच, ऐकवा कांहीं आम्हांला !

**तात्या--** बाळाभाऊ, या पुढें ! भय्या एकच चीज, पण ऐशी झाली पाहिजे कीं अगदीं भलतीकडे ! काका, सुरेलपणाबद्दल तर शिकस्त आहे ! रहिमतखां झक् मारतो यांच्यापुढें !

**बाळाभाऊ--** ए, तात्या ! काय हें ! आम्ही आपले उगीच आ करणारे--

**तात्या--** आ करणारे ! लोकांना आश्चर्यानें "आ" करायला लावाल ! काका, हें सारें उगीच वरवर बरें का ? गृहस्थाच्या अंगांत इतके गुण आहेत पण कोणी स्तुति केली की बिघडलें बस्तान !

**गणपत--** हं, मग, तात्या, आतां उशीर कां ?

**तात्या--** बाळाभाऊ, करा सुरुवात. कृष्णा, घे तबला.

**बाळाभाऊ --**(गंभीर आवाजानें तात्याच्या कानाशीं लागून पण सर्वांस ऐकूं येत जाईल अशा रीतानें) अरे, तात्या, काय मांडलें आहे काय तुम्हीं हें, इतक्या बड्या मंडळीत आपण काय म्हणणार राव !

तात्या— (त्याच रीतीनें) बडी मंडळी? जाऊं द्या! तुम्हीं एकदां चढत्या सुरांत दोन ताना फेंका कीं चिमणीसारखें तोंड होईल एकेकाचें! बडी मंडळी! देखनेमें ढबू और चलनेमें शिवराई! (उघड) म्हणा, आपल्याला थोडाच रंग मारायचा आहे?

बाळाभाऊ— पण...पण बुवा.

देशपांडे— (मध्येंच) पण का पैज?

काका— तात्या, वेळ जातो आहे उगीच!

तात्या— बाळाभाऊ, हं. पांडू, धर सूर! [पांडू पेटीचा सूर धरतो.]

बाळाभाऊ— (निरनिराळे सूर बदलून) आ--आ--आ--आ. हं, ठीक आहे. नाहींतर एक सूर चढा द्या अजून. [पांडू तसे करितो.]

बाळाभाऊ— मग, काय म्हणायचें तात्या! (बाळाभाऊ पुढील ठुंबरी वेडयावांकडया सुरांत ओरडतात; तात्या बढजाव भय्या म्हणून म्हणतात; मंडळी तोंडाला पदर लावून हसतात व मधून मधून "वाहवा" देतात. बाळाभाऊ क्रमाक्रमानें आवाज चढवीत शेवटीं किंकाळया मारितात व ताल प्रथम सावकाश (लय) नतर फारच जलद (दुगण) व एकदम अगदीं सावकाश (ठाय) असा बदलून मधून मधून भरपूर ताना मारितात. मंडळी माना डोलावितात.)

(चीज)

बाळाभाऊ— जो तूं गुण समजत सुन हमरी ॥

काका - वाहवा! बाळाभाऊ, वाहवा तात्या! खूप मजा केली.

भाऊराव— शिकले कुठें हें इतकें?

बाळाभाऊ— शिकण्यासारखें आहे काय त्यांत, उगीच आपुलें वेडेंवाकुडें गाईन परी तुझा म्हणवीन.

तात्या— अहो खऱ्या हिऱ्याला उसनी चमक हवी कशाला? हें सारें ऐकून ऐकून झालें आहे नुसतें.

[मुलें बाळाभाऊस मधून मधून ताना द्यावयाला सांगतात, बाळाभाऊ वेडयावांकडया ताना मारितात, तात्या बोटानें गिरक्या घेऊन त्यांना सूचना देतात.]

रघुनाथ— बाळाभाऊ, आतां फिरकीची तान.

शंकर— भले, आतां जिन्याची तान.

**रघुनाथ**– आतां चक्री तान.

**तात्या**– बाळाभाऊ, आतां लावणी 'नका टाकून जाऊं–'

**काका**– तात्या, आतां जरा यंत्र थांबवा. हा ग्रामगीताचा प्रकार नको.

**तात्या**– यंत्र थांबवा कशाला, आतांशा गाणाऱ्या यंत्रांतून चांगले मोठे प्रतिष्ठित लोकसुद्धां ही लावणी घरोघर बिनदिक्कत ऐकत बसतात. मग आमच्या या यंत्रानेंच काय पाप केलें आहे ! तें कांहीं नाहीं. चलंदेव, बाळाभाऊ अगदीं हावभावसुद्धां.

( तात्या शिकवितात. बाळाभाऊ हावभावासकट वरील लावणी म्हणतात. )

**काका**– भले, बाळाभाऊ, खूप आहे ! हावभावाची तर शिकस्त आहे !

**तात्या**– नाटकांत येणार आहेत आपल्या ! चालेल का नाहीं ?

**पंत**– चालेल म्हणजे ? किर्लोस्करांतल्या बालगंधर्वावर आहे कडी !

**देशपांडे**– कडी का कुलूप ?

**पंत**– घाला कीं तुमच्या तोंडाला कुलूप एकदां !

**काका**– बरें, तात्या, आणखीं कांहीं सुनवा कीं ?

**तात्या**– बाळाभाऊ, होऊन जाऊं द्या एकदां अखेरचें ! काय पाहिजे मंडळी ? 'नच सुंदरी करूं कोपा ?' कीं 'अरसिक किती हा शेला ?'

**रघुनाथ**– 'अरसिक किती हा' च होऊं द्या !

**कृष्णा**– आणखीं, तात्या, परवां रंगपटांत झालें तशा थाटानें !

**तात्या**– हरकत नाहीं, का बाळाभाऊ ?

**बाळाभाऊ**– म्हणजे पदर घेऊन ? माफ करा भय्या ! बनवितां वाटतें आम्हांला ?

**तात्या**– बनवितों ? तुम्हांला वाटतें का तसें खरोखरीच ? मग काय, राहिलें आमचें म्हणणें ! बाकी, बाळाभाऊ, आ हो तुम्हांला मंडळीतले समजतों आणि तुम्ही मात्र फटकून असतां बरें का ?

**काका**– बरें, बुवा गाणें आपलें असें तसें असतें तर मग भाग निराळा.

**पंत**– हो, पण आवाज जसा गळी, म्हणणें ढंगदार ! मग बनविणार कसें इथं ?

**तात्या**– आणि मी तुम्हांला बनवीन ? आपल्या मंडळीला बनविलें म्हणजे झालेंच कीं मग ! तुम्हांला वाटलें का खरेंच तुमचा आवाज वाईट आहे आणि ही सारी थट्टा म्हणून ?

**बाळाभाऊ**– नाहीं, पण उगीच बाहेरची मंडळी आली म्हणजे पंचाईत.

**तात्या**– बाहेरचें कोण येणार ? एवढी आपलीच मंडळी ! मी करतों सारी व्यवस्था.

**पंत**– नाहींतर त्याना आवडत नसेल तर राहूं दे तात्या ! उगीच कशाला इतका खल !

**देशपांडे**– खल का वत्ता ?

**तात्या**– नाहीं; नाहीं ! म्हणावयाचें ना गुरु ?

**बाळाभाऊ**– म्हणूं कीं ! पण बाहेरचें कुणी–

**तात्या**– मी तें करितों सारें ठीक ! अरे, कोणी तरी बसा आणि कुणी दारांत आलें तर एकदम कळवा पाहूं ! कोण बसेल बरं, कृष्णा ?

**गणपत**– कृष्णा कशाला, मीच बसतों कीं. उगीच पोरासोरीं काम नको.

**तात्या**– बस, बस. सत्रा आणे काम ! [गणपत जाऊं लागतो.]

**बाळाभाऊ**– गणपतराव, भय्या तसदी पडते आहे; माफ करायची हं.

**गणपत**– अरे दोस्त. तुमच्यासाठीं जान कुरबान आहे.

[एका टोंकाला जाऊन बसतो.]

**तात्या**– ठीक ! आतां उठा भय्या. रघु, जा त्यांना पदर दे पाहूं. हें बे माझें उपरणें.

**बाळाभाऊ**– तात्या, पदरच कशाला पण नुसतें म्हणतों कीं.

**तात्या**– हं, एकदां भाषा झाल्यावर बदलावयाचें नाहीं गुरु. जा रे रघु; कर सोंग तयार. या उपरण्याचा पदर दे. सदऱ्याच्या बाह्या चोळीवजा सरकीव म्हणजे झालें. टोपवीप नको आज.

**रघुनाथ**– पण तात्या, चोळीला कापूस नाहीं ना इथें.

**तात्या**– अरे नसूं दे लेका कापूस. ते धाकटे रंगाचे रिकामे पेले आहेत ना कोनाड्यांत, तेच घे लौकर जा.

**पंत**– ठीक रंग आहे, तात्या. [बाळाभाऊ, रघु व एकदोन मुलें जातात.]

**काका**– खूप बनविला आहेस बुवा ! [वसंत व मधुकर येतात.]

**गणपत**– ओहोहो ! कोण, मधुकर आणि वसंतराव ? या बसा ! कोणीकडे आज वाट चुकलां ?

**मधुकर**– आमचे ते बाळाभाऊ वैद्य; त्यांना बोलवावयाला आलों.

**गणपत**– होय का ? या मूर्तीशीं काय काम निघालें तुमचें ?

**मधुकर**– थोडेंच काम होतें; आहेत का ते ?

**गणपत**– आहेत; पण जरा बाजूला उभे राहून थोडी मजा पहा त्यांची. पुढें मात्र येऊं नका इतक्यांत; नाहींतर त्यांचा फिक्का पडेल.

[मधुकर व वसंत थोडे बाजूला सरतात. नंतर धोतराचा पदर घेतलेले स्त्रीवेषधारी बाळाभाऊ येतात.]

**काका**– तात्या, सोंगांतसुद्धां प्रेम आहे, चालण्यांतसुद्धां लकब आहे थोडी.

**पंत**– हं हं बाळाभाऊ, खूप आहे बरें चालूं द्या आतां.

[एका उपरण्याचा शेला घेऊन बाळाभाऊ वेड्यावांकड्या अभिनयांत 'अरसिक किती हा शेला' हें पद म्हणतात. मंडळींचा गोंधळ चालूच आहे ]

**काका**– शाबास गब्रू ! अगदीं सही भाऊराव कोल्हटकर !

**देशपांडे**– सही नाहीं शिक्का.

**पंत**– सवाई भाऊराव म्हणाना ! हा गुण नवीनच कळला !

**तात्या**– अहो, झांकलें माणिक आहे माणिक ! गाणें आहे; चेहरा आहे; अभिनय आहे; शिवाय कवि आहेत !

**काका**– काय सांगतोस ?

**तात्या**– खरेंच; नाटक लिहिलें आहे त्यांनीं एक ! त्याचें नांव वैद्यनाटक !

**बाळाभाऊ**– वा: ! तात्या, वैद्यनाटक नव्हे; नाट्यवैद्यक !

**काका**– म्हणजे वैद्यकाची भानगड आहे वाटतें त्यांत ?

**तात्या**– म्हणजे त्यांचे वडील मोठे प्रसिद्ध होते ! आणि हे नाट्यभक्त, तेव्हां आपल्या वडिलोपार्जित धंद्याचें नांव गाजविण्यासाठीं तोच विषय घेतला नाटकाला ! हो, कवीला काय कमी ? 'जहां न पहुंचे रवि; वहां पहुंचे कवि !" त्यांत नायिकेला कामज्वर भरला होता तो पांचव्या अंकांत काडेचिराइताचा काढा देऊन हटविला असा भाग आहे एकंदर !

**पंत**– वाहवा ! ऐकायला मिळालें पाहिजे बुवा एकदां !

**काका**– बरें, तात्या, आतां अखेरचें एक म्हणजे खेळ खलास !

**तात्या**– बाळाभाऊ "जाईं परतोनि ' आतां! आणि शेवटीं म्हणत म्हणत आंत निघून जायचें !

[ कृष्णाला हरिण कल्पून बाळाभाऊ पद म्हणतात; मधून मधून घसा फोडून रडतात; मंडळी रडण्याचा अविर्भाव आणितात; तात्या

तर ओक्साबोक्शीं रडतात. शेवटीं बाळाभाऊ झटक्यानें निघून खोलींत जातात टाळ्यांचा गजर ]

**मधुकर**– काहो, गणपतराव, अगदीं हुबेहूब माकडचेष्टा आहेत या !

**गणपत**- तो मदारी आहेना आमचा तात्या ! असें हुरळलेलें तट्टू तात्याच्या तावडींत सांपडलें कीं त्यानें बनविलेंच त्याला ! जरा चढविलें कीं झालें काम !

**वसंत**– म्हणजे, ही काय जादू आहे तात्याजवळ ?

**गणपत**– उद्योग काय तात्याला दुसरा ! हा बाळाभाऊ अगदीं फटेल ना, पण तात्याच्या अर्ध्या वचनांत अगदीं ! तात्याचें वाक्य त्याला प्रमाण !

**मधुकर**– फारच नवल म्हणायचें बुवा !

**गणपत**– नवल कशाचें ? एकटा बाळाभाऊच आहे का असा ! मुक्कामाच्या दर नांवाला आमच्या तात्याचीं एक दोन कुळें आहेतच ! एरवीं ही मंडळी खूप हुषार; पण एवढ्या बाबतींत ढिसाळ ! चांगले सात सात यत्ता शिकलेले लोकसुद्धां आहेत तात्याच्या यादींत ! (बाळाभाऊ बाहेर येतात.) बाळाभाऊ, हे मधुकर आले आहेत तुमच्याकडे !

**बाळाभाऊ**– (गडबडीनें) कसें काय मधुकर ? कुणीकडे आज ?

**मधुकर**– तुमच्याकडेच आलों आहें ! अण्णांनीं तुम्हांला बोलाविलें आहे घरीं तुम्हीं वेणुताईला एकदां-शास्त्रोक्त पाहून जा म्हणजे बरें पडेल ! आज किंवा उद्यां तुमच्या सवडीप्रमाणें येऊन जा.

**बाळाभाऊ**– ठीक आहे ! चला ! आतां पहातों कांहीं काम नसलें तर, नाहीं तर उद्यां येईन. चला, बरें आहे, मंडळी, जरा जाऊन येतों. (मधुकर व वसंत नमस्कार वगैरे करितात व बाळाभाऊसह जातात. मंडळींत खूप हंशा होतो.)

## प्रवेश चौथा

[**पात्रें**– अण्णासाहेब, यशोदाबाई ]

**अण्णा**– काय करावें आतां प्रकृतीला ! अगदीं तीळ खपेनासा झाला आहे ! आज सकाळीं अग्निमांद्य झालें म्हणून चूर्ण आणिवलें वैद्यबुवांकडून तों लागलींच इतकी क्षुधा प्रदीप्त झाली कीं साऱ्या मुलखाची खाई खाई सुटली आहे ! काय ही भूक !

**यशोदा**– मग खायचें होतें कांहीं थोडेसें ! देऊं का आणून कांहीं ?

**अण्णा**– अग, खायचें काय कपाळ ! मागें त्या रामभाऊला असेंच अग्निमांद्य

झालें; पुढें चूर्ण घेतल्याबरोबर अशीच खाई खाई सुटून त्या नादांत त्यानें खाल्लेंहि थोडेसें ! झालें; सहा महिने खाटेला खिळून पडावें लागलें ! वैद्य तरी आतां कोणता आणावा ?

यशोदा– खरें तर काय ? इतके वैद्य झाले पण मेल्या एकाच्यासुद्धां हाताला गुण नाहीं. सारे मेले–

अण्णा– अग, वैद्याला शिव्या देऊं नयेत अशा ! वैद्यांच्या स्वाधीनच्या का या गोष्टी आहेत ? वैद्य काय करणार इथें ? आतांशा हवा पहाना कशी असते ती ? सकाळीं सारें आभाळ झांकलेलें ! दुपारीं अंगाचीं कारंजीं होतात आणि संध्याकाळीं गार वारा लागतो ! रात्रीं असाच वाऱ्याचा खेळ! घटकेंत वारा इतका बंद होतो कीं श्वासोच्छ्वाससुद्धां बंद व्हावयाची वेळ येते, तर घटकेंत असा वारा सुटतो कीं घरेंसुद्धां उडून जातील असें वाटतें! घर पडेल म्हणून बाहेर यावें म्हटलें तर लागलीच सर्दी व्हावयाची ! काय करावें काय या वाऱ्याला ?

यशोदा– असें वाऱ्याशीं भांडून काय होणार ? हें सारें बाहेरचें आहे; आणि त्यानेंच इकडे असें वाटतें !

अण्णा– कसलें आलें आहे कर्माचें बाहेरचें !

यशोदा– नाहीं म्हणून कसें चालेल ? परवां का कालच वाटतें, कोपऱ्यांत तेलाचा डबा होता आणि सकाळीं बघतें तों डबा आपला आंगणांत !

अण्णा– अग, उडाला असेल या वाऱ्यानें !

यशोदा– तसेंच, परवां पहांटे पहांटेस गोठ्यांत सारखी खडबड आणि सकाळी कपिलेनें दुधाचा एक थेंब दिला असेल तर शपथ !

अण्णा– वाऱ्यानें वासराचें दावें तुटलें असेल नाहींतर या उन्हानें गाय आटली असेल झालें !

यशोदा– कांहीं नाहीं, वेणूला पाहिलें तर काल आपली एकदम उचकीच लागली; घटका झाली, दोन घटना झाल्या, उचकी आपली तशीच ! नाना उपाय केले. पण ज्याचें नांव तें ! अखेर अंबाबाईच्या नांवानें अंगारा लावला; म्हटलें चुकलें, कांहीं चूक झाली असेल तर आईनें पदरांत घ्यावी ! झालें; घटकेंत उचकी बंद !

अण्णा– बाकी ती आतांशा फारच झुरणीस लागल्यासारखी दिसते.

यशोदा– पहावत नाहीं पोरीकडे ! कसली गेंदासारखी पोर, पण फाट्या-

सारखी झाली आहे बघतां बघतां ! खाणें नाहीं, पिणें नाहीं ! इकडे पोरीची ही दशा आणि तिकडे लोकांचीं घालून पाडून बोलणीं ! नकोसा झाला आहे जीव ! कुणी म्हणतात पोरीनें लग्नाची धास्ती घेतली आहे तर कुणी म्हणतें तिचें मीठ तोडलें आहे !

**अण्णा**– धास्ती कसली आणि मीठ कसलें ! तिला मुळीं पहिल्यापासूनच क्षयाची भावना आहे !

**यशोदा**– आतां बोललें तर येईल राग ! क्षय नाहीं, खोकला नाहीं; हा सारा बाहेरवा आहे ! म्हणून हे सारे खेळ होताहेत.

**अण्णा**– पण बाहेरवा व्हायला आम्हीं काय कुणाचें खाल्लें आहे ?

**यशोदा**– आज सकाळींच मीं पिलंभटाचा देव खेळविला, देवानें स्पष्ट सांगितलें, की करंजगांवच्या विहिरीवर तुझी मूल तिनीसांजची न्हाऊन माखून डोकींत गजरा घालून गेली होती, तिथें तिला बाहेरचा पायरव झाला. तसां मागें मी एकदां अंबाबाईला गोंधळ बोललें होतें तो कांहीं अजून घातला नाहीं– त्याची ही सारी घरांत नड आहे !

**अण्णा**– तुला नाहीं उद्योग आणि त्या पिलंभटालाहि नाहीं उद्योग ! घाला गोंधळ झालें. पण घरांत कुणाचें औषध मात्र बंद करूं नका !

( मधुकर व पिलंभट येतात. )

**मधुकर**– अण्णा, देऊन आलों वसंतरावांची पत्रिका आजोबांजवळ !

**पिलंभट**– हें पनवेलकरांचें क्षीणामृत वेणूताईसाठीं ! या माधवरावाच्या कफ-पित्त-वातनाशक गोळ्या दिल्या आहेत भाऊशास्त्री घाटयांनीं ! आणि हीं तुमच्या काढ्यांचीं औषधें ! पिंपळी, हिरडा, बेहडा, कोष्टिकोळीजन, धमासा, पित्तपापडा, वावडिंग, डिकेमाली.

**अण्णा**–भले शाबास ! पण पिलंभट, जीर्णज्वर कांहीं हटत नाहीं अजून ! पहा बरें, आहे का आतां ताप !

**पिलंभट**– (नाडी पाहून) ओ हो, हो, पुष्कळ ताप आहे अंगांत. काढा वदलला पाहिजे असें वाटतें !

**यशोदा**– (अण्णांच्या अंगाला हात लावून) कुठें, आहे कुठें ताप ? उगीच पराचा कावळा करायचा झालें !

**अण्णा**– अग, नाहीं कसा ताप ? कालपासून अंगांत कणकण आहे नि म्हणे ताप नाहीं ! काल रात्रीं आंचवायला बागेंत गेलों आणि जरा बोलत उभा

राहिलों जरासा उघड्या अंगानें वाऱ्यांत; तेव्हां मन कचरलें ! आणि म्हणे ताप नाहीं !

यशोदा– मग हाताला लागत नाहीं कुठें माझ्या ?

पिलंभट– बाईसाहेब, हाडीज्वर हाताला कसा लागणार ? बोलून चोरटें दुखणें हें ! त्यांतला दरदी असेल त्यालाच कळायचें !

अण्णा– (कण्हत) अहाहा, काय पाठींत कळ आली पहा.

पिलंभट– ही झुळूक आली ही, वाऱ्याची, तिनें !

मधुकर– बरें; पत्रिकेचें तसेंच राहिलें ? वसंतरावांची–

अण्णा– वसंतराव, वसंतराव, माळ का करून घालायची आहे गळ्यांत वसंतरावांची ! छप्पन वेळ सांगितलें आणि आतां पुन्हां सांगतों एकदां, कीं तो सोन्यानें भरला असला तरी मला त्याला मुलगी द्यायची नाहीं !

यशोदा– पण उगीच का जिवाचें पाणी करून घ्यायचें तें ! तिनें ज्याचे तीळ तांदूळ खाल्ले असतील तो येऊन आपण होऊन घेऊन जाईल तिला. आपण कशाला उगीच संताप करून घ्यायचा !

अण्णा– तसें नव्हे; मीं एकदां सांगितलें कीं मी वेणु बाळाभाऊला देणार, त्याच्या वडिलांना माझें वचन गेलें आहे तें कांहीं मी मोडणार नाहीं. आणि बाळाभाऊनें आपण होऊन नको म्हटलें तर दुसऱ्या एखाद्या वैद्याच्या घरीं देईन ! पोरीला क्षय आहे, तिला वैद्याच्याच घरीं दिली पाहिजे.

यशोदा– बाळाभाऊचें ठिकाण कांहीं वाईट नाहीं; आज इतके दिवसांचा नाद आहे आणि मुलगाहि माहितीचा ! आतां अंमळ मुलगा आहे बसक्या बांध्याचा आणि पोरीची जात पडली उफाड्याची म्हणून वरणभात व्हायची भीति आहे थोडीशी, पण तेवढ्यावर कांहीं हातचें स्थळ घालवायला नको !

मधुकर– पण जें करायचें तें जरा विचारानें केलें तर बरें नाहीं का ?

यशोदा– अरे सारें खरें; पोरीला सुख लागलें पाहिजे; मुलगा हाताचा धड पाहिजे–

पिलंभट– नाहींतर आपली हातातोंडाशीं गांठ.

यशोदा– हो; सगळें खरें; पण करायचें कसें, पोरीचें बाशिंगबळ असें कीं आजवर लग्नाचें नांवसुद्धां निघायची पंचाईत. आतां कुठें हातातोंडास गांठ पडते तोंच हीं कुसपटें कशाला हवींत ! कुठून तरी पोरीला हळद लागली म्हणजे मिळविली असें झालें आहे. थोरापोरीं बोलबोलून नकोसें केलें आहे

मला.

**मधुकर**– पण, आई, लोकांसाठीं का लग्न करायचें आहे ? उगीच एखाद्या उडाणटप्पूला धरला आणि दिली पदराला गांठ तर तिकडून लोक नांवें ठेवणारच.

**अण्णा**– आतांच्या लोकांना भारी समजायला लागलें. आम्ही यांच्या वयाचे होतों पिलंभट, पण वडिलांचे समोर बोलण्याची प्राज्ञा नव्हती कधीं. कांहीं मागणें सवरणें झालें तर तेंसुद्धां चिठ्ठीनें, तोंडांतून म्हणून ब्र निघायचा–नांव कशाला पाहिजे !

**पिलंभट**– हल्लींसुद्धां आम्हीं पहात नाहीं का प्रत्यक्ष ! तात्यासाहेबांच्या तोंडीं लागतांना आपण अण्णासाहेबांना अजून तर कांहीं पाहिलें नाहीं. अगदीं सांभाच्या पिंडीवर हात मारून सांगावें कुणी यांतलें एक अक्षर खोटें असेल तर !

**अण्णा**– तात्यांची मर्जी निराळी दिसली अंमळ कीं आमचें आपलें माघार ठरलेलें. पण आमचे चिरंजीव पहा–

**मधुकर**– अण्णा, तुम्हाला येतो राग, पण कांहीं वेळांच अशा असतात.

**यशोदा**– ऐकरे, मधु, भारी तोंड तुला, आपला साधारण कल पाहिला सोडून दिली गोष्ट, सर घाड्या पाणी खाल, उगीच तोंड करायचें कारण काय ?

**मधुकर**– आई, आतां तोंड न केलें तर उद्यां लोक तोंड काढू देणार नाहींत कुठें. तुला सांगितलें ना नाटकमंडळींत काय चाललें होतें तें, अशा वेड्यापिराच्या गळ्यांत पोर बांधली तर लोक काय म्हणतील ?

**अण्णा**– अरे, नाटकमंडळींत गेलें आलें एखादे वेळीं म्हणून काय होतें त्यानें ? पोरपण आहे, होतोच असा हूडपणा थोडा माणसाच्या हातून ! आम्ही लहान होतों तेव्हां किर्लोस्कराचें नाटक नवीनच निघालें होतें; आम्ही खुशाल जात येत होतों. अण्णा मोठा योग्य पुरुष ! लाख मनुष्य ! शरीरानें असा सुदृढ असे कीं हा एकेक दंड ! कधी ताप नाहीं, खोकला नाहीं; कांहीं नाही.

**पिलंभट**– वा: ! अण्णाची गोष्ट कशाला! हजारों माणसाचा पोशिंदा तो ! अत्तराचे दिवे जाळलेत त्यानें ! भटाभिक्षुकाला मुठीनें पैसे द्यावे त्यानें आल्यागेल्याला, गोब्राह्मणाला खेळ पहायची सदर परवानगी ! आतांचे नाटकवाले कसले भुकेबंगाल ! कुणाला फुकट सोडतील का नाटकाला !

नांव कशाला ! अण्णाची गोष्ट कशाला !

**अण्णा**–त्यांचा आमचा मोठा घरोबा ! पण म्हणून माणसांतून का उठून गेलों होतों ! त्यांतलेंच बाळाभाऊचें काम ! आस्ते आस्ते संसाराचें ओझें पडूं लागलें कीं तितकें राहत नाहीं तें वारें. बरें, हा वसंतराव तरी काय असा लागून गेला आहे मोठा ? त्याचे तरी काय हात लागले आहेत आकाशाला ?

**मधुकर**–काय वाईट आहे वसंतराव ? आपल्या दादासारखी त्याचीसुद्धां वकिलीची परीक्षा झाली आहे !

**यशोदा**–मग यांनीं काय दिवे लावले एवढें शिकून, तर त्यानें लावायचे राहिले आहेत ? शिवाय आमच्या मुलीला माहेरकरांचें वळणच निराळें ! देव नाहीं, धर्म नाहीं, शिवत नाही, टिपत नाहीं ! त्या मुलाचे गुण तर कांहीं विचारूंच नका ! तुम्हीं पाहिलेच असतील आपल्या मधूच्या लग्नांत, पिलंभट !

**पिलंभट**–हो, न पहायला डोळयावर भात का बांधला होता माझ्या ? बाई, शिकलेले लोक ना हे !

**यशोदा**–अहो, शिकलेले झाले म्हणून काय झालें ! आमचीं मुलें नाहीत का शिकलेलीं ! पण शिकण्याशिकण्याच्या परी आहेत ना ?

**पिलंभट**–आमच्या मुलांची गोष्ट कशाला पाहिजे ? मधुमाधवांच्या एवढाल्या परीक्षा झाल्या पण कधीं बुवा पायरीला पाय लावतील ? किंवा जीभ कापून देईन मी आपली हवीतर ! लौकिक केवढा, अगत्य काय माणसाचें ! केव्हांहि पानतंबाखूला चार सहा आणे मागा; नाहीं म्हणून नाहीच निघायचें एकाच्या तोंडातून ! तेंच याच्या जवळ कधीं मागितलें–मागतो कोण आधीं. आपण तर त्यानें एकदां नाहीं म्हटल्यापासूनच कानाला खडा लावला आहे ! पण एकदां म्हटलें संकल्प सांगतों, उदक सोडा, म्हणे, आम्हांला संकल्प नको. म्हटलें, तशीच दक्षणा द्या, धर्माला पाठ देऊं नये अशी ! म्हणे, धर्म आंधळयापांगळयांना करावा. तात्पर्य काय, अखेर दक्षणा दिली नाहीं, साफ नाहीं म्हटलें !

**यशोदा**–तें असो, पण मधूच्या लग्नात वसंतराव करीत होता विडे आणि चुना होता थोडासा कोरडा. या मुलानें पाणी घेतलें हातीं तेव्हां म्हटलें मामाच्या भाच्यानें चुन्यांत पाणी घालूं नये; तर म्हणतो–त्यानें काय व्हायचें

आहे, खुशाल त्यानें पाणी टाकलें चुन्यात ! झालें; म्हटलें तर शनवारीं आदरून दूध घ्यायचें, भरल्या घरांत दिवे लागतांना जेवायला बसायचें असें नाहीं तें करायचें.

पिलंभट–तसेंच वरातीच्या वेळीं माझा देव खेळविलाना तुम्हीं आणि देवानं मधुकरावरून उतरलेला नारळ यानें घेतला तो हातीं. म्हटलें, हा उतरलेला नारळ हातीं घेऊं नये, द्या इकडे, मी करतों त्याची व्यवस्था. त्यानें तिथल्या-तिथें फोडला नारळ आणि हंसत हंसत खाऊन टाकला.

यशोदा–छे: ग बाई ! मी नाहीं द्यायची माझ्या पोरीला असल्या मुलाला ! साराच मेला भ्रष्टाकार ! !

अण्णा–आणि शरीरानें तरी काय आहे ? बरगडीन्‌बरगडी मोजून घ्यावी मुलाची ! मला वाटतें त्याला क्षयाची बाधा असावी !

पिलंभट–हो, हो, आहेचना ! कालच मीं त्याला खोकतांना पाहिला. खोकला म्हणजे क्षयाचें मूळ आहे. एरव्हीं यायचाच नाहीं. (अण्णासाहेब खोकतात.) नाहींतर हें खणखणीत खोकणें पहा. खोकण्या-खोकण्याच्या तरी परी आहेत. त्या पोराचें शरीर काय आणि खोकणें काय !

अण्णा–छे, हो, अगदींच पाण्याचें पितर, पोरीला काय डोळे झांकून विहिरींत का लोटावयाची आहे.

मधुकर–(स्वगत) बिचाऱ्या वसंतरावाचे ग्रह कांहीं ठीक दिसत नाहींत ! (पाहून) झालें, हे तात्या आलेच ! यांचें कांहीं निराळेंच असेल आणखीं. [ तात्यासाहेब व माधव पत्रिकांचो भेंडोळीं घेऊन येतात. ]

माधव–ह, हीं घ्या पत्रिकांचीं बिंडाळीं सारीं. [ खालीं टाकितो. ]

तात्या–अरे, अरे, माधव, पत्रिका ना त्या वेड्या ! अशा टाकूं नयेत त्या !

पिलंभट–हो, जन्मजन्माचा संबंध त्यांत. एखाद्या पत्रिकेंतला एकादा ग्रह या घरांतल्या घरांत लवंडला तर फट् म्हणतां ब्रह्महत्त्या व्हायची.

तात्या–वा: पिलंभट, वसंतरावाची पत्रिका घेऊन मी तुमची वाट पहात बसलो. म्हटलें, आता याल, मग याल, अखेर कंटाळून मीच आलों माधवा-बरोबर पत्रिका घेऊन इकडे.

पिलंभट–मी गेलों अण्णासाहेबांचीं औषधें आणायला ! त्यांचा जीर्णज्वर आज जरा बळावला आहे !

तात्या--आतां काय सांगावें या लोकांना ! अरे, औषधें घेऊन काय होणार

कपाळ ? जीर्णज्वर नाहीं; आणि विषमज्वर नाहीं; ही सारी ग्रहांची पीडा आहे ! मंदा अण्णाला मुळीं शनीची महादशा आहे !

**पिलंभट–** हो, हो, तरीच शरीर काळें ठिक्कर पडत चाललें आहे ! शनी-खेरीज काळसरपणा नाहीं. जपजाप्य करायला हवें उद्यांपासून.

**मधुकर–** बरें, तात्या, त्या टिपणांचें काय झालें ?

**तात्या–** आज इतके दिवस घालविले तेव्हां अखेर दोन टिपणें वेणूच्या टिपणाशीं जमतातशीं आढळलीं. अगदीं झाडून जुन्यापान्या साऱ्या कुंडल्या पालथ्या घातल्या ! ही विक्रमाची; ही काशीकर गागाभट्टाची ! ही थोडी बहुत जमते. पण त्याला मरून झालीं अडीचशे वर्षे ! आता ही हिंदुस्थान देशाची आणि ही बाळाभाऊची कुंडली. या दोन्ही मात्र जमतात.

**पिलंभट–** तेव्हां त्यांत बाळाभाऊच बरे ! हो, हिंदुस्थान देशाशीं तर लग्न नाहीं लावतां येत.

**मधुकर–** पण ती वसंतरावाची नाहीं जमत कुंडली ?

**तात्या–** मुळींच नाहीं. ती तर अगदींच जमत नाहीं. फारच भयंकर योगा-याग.

**मधुकर–** साधारण जमत असेल तर पहा. अगदींच फार बारकाईनें–

**तात्या–** छत् ! वेडया, नांवसुद्धां काढूं नकोस त्या मुलाचें त्याच्या लग्नीं राहू, केंद्रांत मंगळ, त्रिकोणांत शनि असे सारे ग्रह अनिष्ट पडले आहेत. काय सांगू तुला, अरे, त्याच्या गळयांत लग्नाची माळ पडल्याबरोबर त्याला मृत्यु येणार. अगदीं मृत्यु ठेवलेला.

**पिलंभट–** मी म्हणतों, निदान अपमृत्यू. अपमृत्यूला तर मरण नाहीं ना ?

**अण्णा–** आणि हीं पाप्याचीं पितरें अपमृत्यूनेंसुद्धां मरायचीं !

**पिलंभट–** तर काय ? यांना मरायला मृत्यूच कशाला हवा ! खरें कीं नाहीं माधवराव ?

**माधव–** कशाचा मृत्यु आणि कशाचा जन्म. हे सारे या स्थूल देहाचे विकार आहेत. अंतवंत इमे देहा नित्यस्योक्ताः शरीरिणः ।। आत्म्याला या उपाधि मुळीच नाहींत. आत्मा अविनाशी अविकारी अनंत असा आहे. त्याला नाश नाहीं. नैनं छिंदंति शस्त्राणि नैनं दहति पावकः । न चैनं क्लेदयंत्यापो न शोषयति मारुतः ।। पंचवीस तत्त्वांचा मेळ म्हणजे देह मात्र. वासांसि जीर्णानि यथा विहाय नवानि गृह्यति नरोऽपराणि ।। तशांतला आत्मसंक्रम-णाचा प्रकार, मायाभ्रमानें मूढ जीव त्याला मरण म्हणतात. बाकी खरें

पहातां, आत्मा अमर आहे. 'नायं हंति न हन्यते.'

**यशोदा**– माधव, हें रे काय बडबडणें ? एकुलत्याएक बहिणीच्या लग्नाचें घाटतें आहे आणि–

**माधव**– बहीण, भाऊ, आई, बाप सर्व भ्रम आहे हा. का तव कांता कस्ते पुत्रः संसारोयमतीवविचित्रः । कस्य त्वं त्वा कुत आयातः । मी कोण याचा विचार केला पाहिजे । संसारमृगजलवत् आहे. गेल्या जन्मींचीं बहीण-भावंडें कुठें गेलीं; पुढल्या जन्मींचीं आतां कुठे आहेत; हा सारा मायेचा खेळ आहे. 'अहं ब्रह्मास्मि' मी ब्रह्म, तूं ब्रह्म, तात्या ब्रह्म, अण्णा ब्रह्म–

**पिलंभट**– मीहि ब्रह्म आहें; पत्रिका ब्रह्म आहेत; पैसा ब्रह्म आहे.

**माधव**– एकं सद्विप्रा तद्बहुधा वदन्ति ! तें शोधून काढलें पाहिजे ! ब्रह्म हविर्ब्रह्म भोक्ता ब्रह्माग्नौ ब्रह्मणाहुतम् !

**मधुकर**– दादा, जरा थांब. मुख्य कामाचा ब्रह्मघोटाळा होतो आहे सारा. तात्या, पत्रिकेवर इतका भरंवसा ठेवून कसें चालेल. वेळ थोडी चुकली तर लागलीच जमीनअस्मानाचें अंतर पडतें भविष्यांत.

**पिलंभट**– हो, सरासरी आणि शतमान.

**मधुकर**– म्हणून म्हणतों कीं पत्रिकेकडे थोडें दुर्लक्ष केलें तर नाहीं का चालणार ? मुलगा चांगला आहे.

**तात्या**– भलतेंच कांहीं तरी ! मुलगा चांगला आहे; पण लाभला पाहिजे ना ? विषाची परीक्षा पहायची आहे कीं काय ? खुळा नाहींतर ! आजन्म मुका राहीन माझें बोलणें खोटें झालें तर.

**पिलंभट**– भलतेंच होण्यमाण कुठें चुकतें काय ?

**यशोदा**– शिवाय परतवेल होईल तें निराळेंच.

**मधुकर**– मग काय हा नाद सोडून द्यायचा ? दैव पोरीचें, दुसरें काय !

**अण्णा**– चला; मधु, जा आणि बाळाभाऊला आतांच घेऊन ये.

**मधुकर**– जातों. काय करायचें, मर्जी प्रभूची !

**माधव**– मधु वेड्या, असा हताश काय होतोस ? काय करायचें तें केलें पाहिजे ! परिणाम कांहीं का होईना !

कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ॥
मा कर्मफल हेतूर्भूर्मा ते संगोऽस्त्वकर्मणि ॥

( पडदा पडतो. )

# अंक दुसरा

## प्रवेश पहिला

[ भिंतीवरून उडी मारून बाळाभाऊ येतात. ]

**बाळाभाऊ**– काल मधुकरानें वेणूला पहायला येण्यासाठी मला बोलाविलें, पण तशा राजरोस रीतीनें येण्यांत काय अर्थ? कुठल्याहि कादंबरींत, नाटकांत नायक-नायिकेला त्यांच्या भावांचें किंवा बापाचें साह्य किंवा संमति मिळाली आहे का? असें साह्य मिळतें तर कित्येक कादंबऱ्यांचा पहिल्या प्रकरणांतच शेवट झाला असता आणि बहुतेक नाटकें नाटकांतल्या पांच अंकांऐवजीं उजळणींतल्या पांच अंकांतच आटोपलीं असतीं! प्रेमाची खरी लज्जत चोरटे-पणांतच आहे. पण या अरसिकांना त्याची काय किंमत? तिच्या नाहीं, माझ्या प्रियेच्या बापाची, भावाची निदान आईची जरी आमच्या विवाहाला आड-काठी असती तर आमच्या या प्रीतिविवाहाला नाटकाचें किती सुरेख स्वरूप आलें असतें. तरी माझ्याकडून मीं किती सावधगिरी ठेविली आहे. मोहन-तारेंतल्या मोहनाप्रमाणें, प्रियेची बागेंत चोरून भेट घेण्यासाठीं या भिंताडा-वरून उडी मारून मी आंत आलों. किती त्रास पडला मला! माझा ढोपर फुटून पाय अगदी जायबंदी झाला. मोहनचा कांहीं ढोपर फुटला नाहीं. नाट-कांतले नायक भाग्यवान् खरे! उड्या मारतांना त्यांचे ढोपर फुटत नाहींत! कित्येक जखमा लागल्या तरी त्यांना दुःख होत नाहीं! जेवणाखाण्याची त्यांना ददात नाहीं! नाहीतर हल्लीचें नीरस जीवित! लेखणी करतांना चाकूनें हात कापला तरी असह्य वेदना होतात. उडी मारतांना ढोपर फुट-तात. पण नाहीं, असें भिऊन उपयोग नाही. प्रेमांत संकटें तर यायचींच. (पाहून) अरे, पण माझ्या येण्याचें सार्थक झालेंसें वाटतें. कारण--

> ही सुरसुंदरी जणुं खालीं। उतरोनी भूवरि आली ॥
> ती ही गगनिची रंभा उर्वशि कीं।

पण, ही सुंदरी केर टाकण्याकरितां येत आहे, त्या अर्थी ही ती नसावी. कुठल्याहि नाटकात, काव्यांत, कादंबरींत, नायिका केर वगैरे टाक-तांना दृष्टीस पडली नाहीं. ही तिची एखादी मोलकरीण– चुकलों, मोलकर-णींना काव्यांत जागाच नाहीं. तिची एखादी दासी किंवा निदान सखी असावी! [ निरखून पाहून ] पण छे, माझी शंका निराधार आहे! हीच

ती माझी प्रिया, कारण–

सुवर्ण केतकी परि जो दिसतो वर्ण नव्हे तो दुसरीचा ।।
सडपातळ हा नाजुक बांधा खचित त्याच मृदुदेहाचा ।। (वगैरे)

अरेरे, कोण भयंकर हाल हे ! कोणत्याहि सुंदर स्त्रीवर असा दुर्धर प्रसंग आला नसेल. ही सुंदरी केर टाकणार ! परमेश्वरा, हें पहाण्यापेक्षां मी अंध कां नाहीं झालों ? हें काय पहायचें नशिबीं आलें ! प्रभु विचित्र किती तव चरित्र तर्क न कोणाचा चाले ।। कोमल शकुंतलेला झाडांना पाणी घालायला लावणाऱ्या त्या थेरड्या कण्वापेक्षां हिचा थेरडा फारच अविचारी असला पाहिजे. करूं का सूड घ्यायची प्रतिज्ञा ? लाडके, सुकुमार वेणु, टाक, टाक तो केर खालीं. पण हें काय ? या केराकडेच माझी नजर इतकी कां बरें लागत आहे ? हं, मोहनतारेंत, तारेच्या हातांतल्या घागरीप्रमाणें आपणहि फुंकलों गेलों असतों तर फार बरें झालें असतें असें मोहनला वाटलें तसेंच मलाहि वाटत असलें पाहिजे. अहाहा, मी जर असा केर होऊन झाडलों गेलों असतों तर आणखीं काय पाहिजे होतें ! वा केरा, धन्य आहेस तूं. हा केर ज्या उकिरड्यावर पडेल तो उकिरडा धन्य, त्याच्यावर लोळणारा गाढवसुद्धां धन्य–धन्य, त्रिवार धन्य ! त्या केरांतला कागदाचा फाटका तुकडा मला प्रणयपत्रिकेसारखा वाटतो; त्यांतली धूळ हीच अंगारा.

[तिच्याकडे पहात रहातो.]

**वेणु**– (स्वगत) जरा कुणाचें पाऊल वाजलें कीं कोणी मला पहायला येत आहे असें मला वाटतें. वहिनीनें मला इतका धीर दिला खरा, पण तिचें बापडीचें तरी काय चालणार ! असो, नशीब आपलें ! जें व्हायचें असेल तें, होईल. आतां देवासाठीं चार कळ्या तरी काढून ठेवाव्या.

**(राग– पिलु, ताल– त्रिवट.)**

कलिका करिती केलि का गणिति न नाशास कां ? ।।धृ०।। ह्या
आत्मार्पण करुनी ईशा मजही सुचविति का ? ।।१।।

[फुलें काढूं लागते.]

**बाळाभाऊ**– (स्वगत) आतां पुढें कसें व्हावें ? अशांत हिच्यावर एखादें संकट येईल तर काय बहार होणार आहे. पण संकट तरी कोणतें येणार ? सौभद्राप्रमाणें घटोत्कचासारखे राक्षस या या कलियुगांत नसल्यामुळें तशीं संकटें

येण्याचे मार्गच बंद झाले आहेत. निदान वीरतनयांतल्या शालिनीप्रमाणें एकादा वाघ येईल म्हणावें तर त्याचाहि कांहीं संभव नाहीं. या घराजवळच्या बागांतून अरण्यांतल्या सिंहवाघांबद्दलची भूक कुत्र्या-मांजरांवरच भागविली पाहिजे. हां! निदान शाकुंतलासारखा एखादा भ्रमर मात्र या बागेंत असेल कुठें तरी, पण त्याला या आतांच्या पोरी भितात तरी कुठें? त्याच्या गुंजारवानें आतांशा कोणी गुंगतहि नाहीं. प्रेमाच्या बाजारांतल्या साऱ्याच पदार्थांचा भाव उतरल्यासारखा दिसतो. प्रणयी जनांच्या या गैरसोयी परमेश्वर कधीं दूर करील तो सुदिन. (पाहून) आहा, ती एक माशी तिच्या तोंडापुढं येत आहे. माशी का असेना? बुडत्याला काडीचा आधार. व्हावेंच आतां पुढें. (पुढें होऊन माशी हांकलतो. वेणु दबकते.) सुंदरी, भिऊं नकोस. काय ही तुझी स्थिति! सुंदरी,

घेउनि पंकजपत्राचा पंखा घालूं का शीत वारा ॥ (वगैरे)

**वेणु**– आहे काय हा गोंधळ? आणि तुम्ही इथें आलां कसे?

**बाळाभाऊ**– कसा आलों हें भगवान् कामदेवाला ठाऊक!

**वेणु**– म्हणजे?

**बाळाभाऊ**– त्या पडक्या भिंताडावरून. येतांना माझ्यावर काय काय संकटें आलीं याची तुला कल्पनाहि नसेल. काय सांगूं सुंदरी, माझा सदरा फाटला; धोतराला आंकूट भरला, हा पहा माझा ढोपरहि फुटला आहे. पण त्याचें काय आहे– प्रणयी जनांनीं संकटें हीं सोसलींच पाहिजेत.

**वेणु**– इतके सायास घ्यायचें कारण?

**बाळाभाऊ**– कारण? कारण, तूंच. तुझ्याखेरीज दुसरें कोण?

**वेणु**– काय; मी? मीं काय केलें यांत?

**बाळाभाऊ**– काय केलेंस? तूंच पहा बरें, सुंदरी–

हें काय बरें त्वां केलें ॥ मृणालसममुक्तालतिकेतें। दावुनि जैसें हंसवरातें। तैंसे मम मानसजन्म्यातें ॥ बहु दूर विलोभुनि नेलें ॥१॥

**वेणु**– मोठाच चमत्कार म्हणायचा! बरें, तुम्हांला यायचेंच होतें तर इतर रस्ते का थोडे पडले होते? घरांत यायचें होतें नीट!

**बाळाभाऊ**– घरांत! छेः! प्रणयी जनांची पहिली भेट अरण्यांत– निदान एकाद्या बागेंत तरी घडावी असा सिद्धांतच आहे! अर्जुन सुभद्रेला भेटला तो अरण्यांत! मोहनानें तारेला पाहिलें तेंहि बागेंत! दुष्यंत-शकुंतलेची भेट पहा

अरण्यांतच ! कामसेन रसिकेला भेटला बागेंतच ! एवढी जहांबाज त्राटिका, पण प्रतापरावाला बागेंतच भेटली ! फार कशाला, मतिविकार--अगदीं आजकालचें नाटक ना ? त्यातसुद्धां चकोर चंद्रिकेची भेट तुळशीवृंदावनांत होते!

**वेणु**-- अस्सें ! पण अशा रीतीनें येतांना तुम्हीं सारासार विचार पहायचा होता थोडा ! लोक काय म्हणतील तुम्हांला ?

**बाळाभाऊ**-- सुंदरी, प्रेमवेड्याला लोकांची भीति कधीं असते का ? सारासार विचार पहावयाला किंवा लोकांची बोलणी ऐकायला मला अवकाश नाहीं. कारण--

प्रणयतरंगांसवें । विवश वाहतों जवें । जलरवें पाहवें गतिमुळें न ऐकवें ।। योगबलें जणुं यति । ब्राह्मउपाधींप्रती । प्रणयीजन निवारिती । खेद मुळिं न त्यां शिवे ।।१।।

**वेणु**-- इतकें प्रेम आहे तुमचें माझ्यावर ? मला नव्हतें हें माहीत !

**बाळाभाऊ**-- इतकेंच काय; यापेक्षांहि जास्त ! वेणु, सुंदरी--

तुजविण वृथा गमे संसार । संसार सौख्य कुठचें ।। ध्वनि ।।

**वेणु**-- बरें, पण इतकें दिवस हा तुमच्या प्रेमाचा उमाळा असाच राहिला आणि आजच त्याला असा पूर कशानें आला ?

**बाळाभाऊ**-- इतके दिवसांची गोष्ट निराळी ! आतां तरुणपणाची गोष्ट निराळी ! बाळपणींचा काळ निघून गेला तो ! त्यावेळीं 'जे ब्रह्म काय तें मायबाप ही जोडी ।। खेळांत काय गोडी ।।' पण आतां ते खेळ नकोत, त्या आट्यापाट्या नकोत, ते बैदूल नकोत, ती लंगडी घालणें नको असें झालें आहे ! आणि तें कां म्हणशील तर--आलि कालि या मज तरुण दशा ।। निःशंकपणे रमणें गेलें प्रणयकेलि मज सुचती ऐशा ।। धात्रीपूर्वी निधिवाटे तो सांप्रत गणती तरुणी प्रियशा--

**वेणु**-- बरीच मनोरंजक आहे तुमची कहाणी ! बरें, झालें ना तुमचें पहाणें ? जातें मी आतां.

**बाळाभाऊ**-- (तिला अडवून) वा: ! हें काय ! चाललीस कुठें अशी तूं ? मी तुला जाऊं देणार नाहीं. नुसता तुला पहावयास मी आलों हा तुझा संशय खोटा आहे. सुंदरी, भूमिजल तेज नभ ... ! पाणि तुझा सखे ।। (तिचा हात धरितो. ती रागानें दूर जाऊन उभी रहाते.)

**वेणु**-- हं; खबरदार अंगाला हात लावाल तर !

**बाळाभाऊ**-- (स्वगत विस्मयानें) मला वाटलें होतें की, माझे श्रम जाणून ही

आतां मला आलिंगन देऊन सुभद्रेप्रमाणें ॥ बहुत छळियलें ॥ पद म्हणणार! पण ही तर संतापून दूर उभी राहिली ! नाटकांतल्या मुख्य मुख्य खुब्या हिला ठाऊक नाहींत असें दिसतें ! आमचेकडे स्त्रीशिक्षण नाहीं त्याचे हे दुष्परिणाम ! आतां हिचें समाधान केलें पाहिजे. ( प्रकट ) सुंदरी, अशी रागावूं नकोस ! अशा वेळीं रागावणें म्हणजे अगदीं अरसिकपणा आहे ! एकसुद्धां नाटक पाहिलें नाहींस वाटतें तूं ? तरीच. म्हणून म्हणतों—नच सुंदरि करुं कोपा । मजवरि करि अनुकंपा ॥ ( वगैरे ) काय, अजून तुला माझी दया येत नाहीं?

**वेणु**– ( स्वगत ) काय म्हणावें आतां या मूर्खपणाला ? (प्रकट) तुमच्याकडे पाहील त्याला तुमची दया येणारच म्हणा—

**बाळाभाऊ**– ( आनंदानें ) झालें तर मग ! कर टाकि सखे ग या कंठीं ॥ फिरविन हनुवटी । शिणविन तनुकटी ॥ ( वगैरे )

**वेणु**– ( स्वगत ) या स्वारीला बेतानेंच जायला लाविलें पाहिजे. (प्रकट) हें पहा, तुमच्या आवडत्या नाटकांतलाच मी तुम्हांला एक प्रश्न विचारतें ! आतांच तुम्हीं म्हटलें ना, कीं मीं एकहि नाटक पाहिलें नाहीं म्हणून ? तें पुष्कळसें खरें आहे आणि तुम्ही तर असे रसिक ! मग तुमची शारदा म्हणते त्याप्रमाणें रेशमाच्या शेल्याला सुताच्या दशीप्रमाणें मी तुम्हांला शोभलें तर पाहिजे ना ? तेव्हां हा नाद तुम्हीं सोडून द्या ! तुमच्यासारखी एखादी रसिक मुलगी पाहून तिच्याशीं लग्न करा !

**बाळाभाऊ**– ठीक विचारलेंस ! असेंच शालिनीनें शूरसेनाला विचारिलें तेव्हांचें त्याचेंच उत्तर तुला देतों ! वेडे—

अशि ही सगुणखनि देइ त्यजोनी । जगिं या दिसोनी न येईल कुणी
शरच्चंद्र अतिनिर्मल जैसा शोभवि तारागार ॥ विमल देहीं शुद्ध आत्मा
तेंवि करित सुविहार ॥ निरखोनी । विदेही मुनिही मतिहीन होई ॥१॥

असा मूर्ख–अंध–वेडा; पुढें शालिनीचें वाक्य आहे ! दुसरी रसिक मुलगी आतां पाहणें म्हणजे प्रेमाला हरताळ लावण्यासारखेंच आहे! पुष्कळदां नायिकेपेक्षां दासींचीं सोंगें सुरेख दिसतात; परंतु कोणत्याहि नाटकांतला नायक तिकडे ढुंकून पहायचा नाहीं आणि प्रियेचे दोष त्याला गुणांसारखेच वाटतात. कारण अनिवार मनुज करि अंतरीं ज्या वस्तुवरी प्रीति ( वगैरे ) म्हणून म्हणतों, लाडके, आतां अंत पाहूं नकोस ! ये अगो, बैस मजसरशी ! नाहीं कुणी दुसरें ॥ कां शंका धरिशी बिंबाधरे ॥

**वेणु**– ( स्वगत ) छेः हें वाढतच चाललें ! आतां आटोपतें घेतलेंच पाहिजे. ( प्रकट ) मी मघांपासून पाहतें आहें; लाज नाहीं वाटत तुम्हांला असें मलभलतें बोलायला ? जनलज्जा मनलज्जा कांहीं वाटूं द्या थोडी !

**बाळाभाऊ**–सुंदरी, कां रागावतेस आतां उगाच ? रागावण्याचा काळ गेला

जें जें तूं बोलसी तें मजला का श्रुत नसे ॥
परि त्याचें काय आतां मज भरलें स्मरपिसें ॥

म्हणून आतां मी तुझें मुळींच ऐकणार नाहीं ! माडिवरी चल ग गडे जाउं झडकरी । नाहीं तर हा अस्सा मी सोडीत नाहीं !

**वेणु**– चला व्हा दूर ! शरम नाहीं वाटत तुम्हांला ? एवढें वय वाढलें त्याची कांहींच का लाज नाहीं !

**बाळाभाऊ**–आतां मलाहि राग आवरत नाहीं ! फार वेळ तुझें बोलणें ऐकून घेतलें मीं ! तुझ्या बापानेंच मला इथें बोलाविलें आहे ! पाहूं बरें आतां काय करतेस ती ! वेणु– अजवरि हेका । धरूनि अनेका ॥ ( वगैरे. )

( तिचें चुंबन घ्यावयास जातो. )

**वेणु**– ( घाबरून ) धांवा हो धांवा ! दादा, अहो अण्णा !

**बाळाभाऊ**– बोलाव, कोणालाहि बोलाव ! मीसुद्धां आतां कीचकासारखा बेफाम झालों आहें ! येऊं देत, तुझे दादा येऊं देत; अण्णा येऊं देत, भीम येऊं देत; अर्जुनं येऊं देत !

कोण येतो तो पाहतों मजसि माराया ।
प्राण त्याचा प्रथम घेतों कोप शमवाया ।
युवतिकुंकुमतिलक पुसुनी पुसुनि नंतर या (तिचें कुंकू पुसतो.)
शुद्धबीजांकुर नर हा सिद्ध झाला या ॥

( एकदम थबकून ) अरेरे, काय अविचार करीत होतों मी ? कोणत्याहि नायकानें अजून असा अत्याचार केला नाहीं ! प्रणयिनीनें धिःकार केला तर फार झालें तर मूर्च्छित पडायचें ! नायिकेला त्रास प्रतिनायकानें द्यायचा ! जा वेणु, जा. नाटकाच्या नियमाबरहुकूम मला आतां मूर्च्छितच पडलें पाहिजे. ( ती जाते. ) हाय ॥ गेली प्रिया गेलि गेली प्रिया गेलि गेली॥ हर हर ! शेवटची साकीसुद्धां मला उंच सुरांत म्हणवत नाही.

पाषाणापरि मस्तक झालें स्पष्ट दिसे ना कांहीं ॥
भ्रम पडलासे वाटे मतिला अंगहि हालत नाहीं ॥
जिव्हा जड पडली प्रिये ये– ॥ ( मूर्च्छित पडतो. )

( पडदा पडतो. )

## प्रवेश दुसरा

( **पात्रें**– यमुना, मधु व वसंत. )

**यमुना**– मग काय ? हो म्हणायचें ना ? वसंतदादाचा विचार कांहीं वावगा नाहीं !

**मधुकर**– वावगा नाहीं खरा; पण जर बाजू अंगावर आली तर मात्र फजितीला पारावार नाहीं ! बाळाभाऊची नाटकी तऱ्हाच ही ! चोहींकडे हंसें होईल फसगत झाली तर !

**वसंत**– समजलें ! प्रयत्न करून पहायचा, बोलून चालून वेड्यांचा बाजार हा ! साधलें तर नाटक नाहींतर प्रहसन आहेच पुढें !

**मधुकर**– साधला तर ठीक आहे प्रयत्न; पण–

**यमुना**– पण नको नि वीण नको ! घरांतल्या माणसांनाच काय हंसायचें ! इकडेसुद्धां संशयाचें वेडच आहे नाहीं तर काय ?

**वसंत**– पहा, एका कामांत दोन कामें होत आहेत ! जबाबदारी सारी माझ्यावर !

**मधुकर**– तो नाटकांतला तात्या इतकें सारें करणार कसा ? त्याला असा मुलगा कोण मिळणार ?

**वसंत**– तें तर मी हां हां म्हणतां जमवून आणीन पंचाईत आहे जरा या दुसऱ्या कामाची. रमाबाई गांवीं येणार कशा ?

**यमुना**– दादा, त्याची नको तुला काळजी ! तें माझ्याकडे लागलें. जाऊबाईना मी सांगेन सारें समजावून. आपलें कल्याण होतें आहे तिथें अडथळा कोण करणार ?

**मधुकर**– मग काय; करायचें म्हणतां असें ?

**वसंत**– अगदीं कांहीं हरकत नाहीं, पिलंभटाला पैशानें सहज विकत घेतां येईल.

**मधुकर**– पण मी त्याला नाहीं विचारणार. एखादे वेळीं तो कबूल न होतां, सारें रहस्य उघडकीस आणूं लागला तर तोंड दाखवायची पंचाईत पडेल मला ! तो पुरा आपलासा होईपर्यंत या गोष्टींत माझें अंग आहेसें त्याला कळतां कामा नये.

( **राग**– बागेश्री. **ताल**– एकताल )

सहजची तो भेद करील, मार्ग हा बरवा ॥ धृ० ॥

अतिलोभी भिक्षुक तो पाडिल फाँश मजला ॥ १ ॥

**यमुना**–मग काय रे दादा, कसें करायचें ? इकडचा स्वभावच असा पडला.

**वसंत**– मी विचारतों त्याला; मग तर झालें ना ? त्याच्याकडें कामें दोन. एक, ही घरांत उंदीर मेल्याची बातमी पसरावयाची; आणि दुसरें– रमाबाईना घेऊन गुपचिप तुमच्या गांवीं जायचें. हो, आणखीं मी बैरागीवेषानें तुमच्या गांवी आलों म्हणजे माधवरावांजवळ, अण्णासाहेबांजवळ माझी निरनिराळी स्तुति करायची.

**मधुकर**– तुमच्या या घरगुती सौभद्रांतला गर्गमुनीच म्हणायचा ! त्या बाळाभाऊला हंसतां हंसतां तुम्हीसुद्धां त्याच वळणावर जात चालला हळूहळू !

**वसंत**– खरें म्हणाल तर सौभद्रावरून मला ही युक्ति सुचली. त्यांतल्या-त्यांत म्हटले माधवरावहि ताळ्यावर आले तर पाहूं. रमाबाईची आणि माधवरावांची एकदां गांठ पडली म्हणजे माधवरावांचें वैराग्य खात्रीनें लटपटणार.

**यमुना**– खात्रीनें. बायकांचें बळच असें आहे.

( राग– हमीर, ताल– एकताल. )

अबला आम्ही प्रबला, चुकुनी भ्रमुनि अलि येतां, कमलिनी बद्धचि करि त्याला ॥ धृ० ॥ प्रेम–पाशबंधन कर गळां पडतां, सुटका कधीं न कुणाला ॥ १ ॥

पुरुष एकदां का हातीं सांपडले म्हणजे सुटावयाची अशाच नको.

**वसंत**– मधुकरांना तर त्याचा अनुभव आहेच म्हणा !

**यमुना**– आणि तुला कुठें नाहीं ! वत्संसाठींच ना तुझी सारी खटपट ! इकडे संन्यास तर नाहीं ना घ्यावा लागत माझ्यासाठीं ?

**मधुकर**– बरें, ठरलें ना सारें ?

**वसंत**– ठरलें, पण घरांत उंदीर पडल्यावरोबर अण्णासाहेब गांवीं जायला निघतील ना ?

**मधुकर**– अगदीं सहकुटुंब सहपरिवारें पैपाहुण्यांसुद्धां. घरांत पाणीसुद्धां पिऊं देणार नाहींत मग ते कोणाला. तडक गांवचा रस्ता धरतील.

**वसंत**– आणि गांवी पोंचतांच तुम्ही तें औषध खुबीनें त्यांच्या पायाला लावायचें म्हणजे आपोआप वळंधा येईल.

**मधुकर**– काय काय होतें तें बघूं या आतां ! घोडा मैदान जवळच आहे.

**वसंत**– आपल्याला एखादा चाबकाचा फटका खाण्याची पाळी न येवो म्हणजे

झालें! बरें, जातों मी आणि करितों सारी व्यवस्था.

**मधुकर**– ठीक आहे. मला कळवा मात्र ताबडतोब. ( जातात. )

## प्रवेश तिसरा

[ पिलंभट प्रवेश करतो.]

**पिलंभट**– (स्वगत) एकदां कुठें पार्वती रावणाच्या हवालीं केली म्हणून शंकराला लोक भोळा शंकर म्हणतात. पण त्यांत कांहीं अर्थ नाहीं. स्त्री-दानांत खरीं भोळीं दैवतें दोन. एक विष्णु आणि दुसरा गणपति. एकानें लक्ष्मी आणि दुसऱ्यानें सरस्वति साऱ्या जगाची मालमत्ता म्हणून मोकळ्या सोडल्या आहेत. चोरागोरांच्यासुद्धां हातांत त्या सांपडावयाच्या! माझी गोष्ट पहा ना, आज इतकीं वर्षे या इनामदारांच्या घरच्या लक्ष्मीशीं खुशाल हवी तशी धिंगामस्ती करितों आहें. पैसा, पैसा म्हणजे बिशाद काय! आणखीं चार वर्षांत सोन्याचीं कवलें घालीन घरावर. नाहींतर आमच्या वडिलांची कारकीर्द. घराला सोन्याचांदीचा विटाळ नाहीं. आम्ही दोन सोन्यासारखीं मुलें, तो शिंगमोडका सोन्या बैल आणि तो परसदारांतला सोनचांफ्याचा खुंट याखेरीज सोनें दृष्टीस पडायचें तें दसऱ्याच्या दिवशीं आपट्याच्या पानाचें. याउपर सोन्याचें नांव नाहीं घरांत. नाहीं म्हणायला आमची आजी वारली तेव्हां मात्र कोणी कोणी म्हणालें कीं, 'तिचें काय चाईट झालें? सोनें झालें तिचें!' मग का ती सोनामुखी फार खात होती म्हणून म्हणाले कुणास ठाऊक! आम्ही लहान; गेलों तिसरे दिवशीं रक्षा उपसायला, पहातों तों भट्टींत हिणकसच फार! मूठभर अस्थि मात्र सांपडल्या. त्या नेऊन वाईस पोंचविण्याचा भानगडींत, आटलेलें सोनें सांपडण्याऐवजीं खर्चाच्या पेंचानें चांगली चांदी मात्र आटली! ही बाबांच्या संसाराची कहाणी! तेंच आतां पहा! ज्योतिष, वैद्यक, देव खेळविणें; होय आहे– नाहीं आहे, निरनिराळ्या मार्गांनीं इनामदारांच्या घरांतून पैसा येतो आहे! समुद्राला जसे चहूंकडून नद्यांचे ओघ मिळायचे तसा संपत्तीचा ओघ निरनिराळ्या मार्गांनीं आमच्या घराकडे वहातो आहे. एवढ्यानें इनामदारांच्या मनमुराद उत्पन्नाला तरी काय धक्का बसणार? कांहीं नाहीं; दर्यामें खसखस! भरल्या गाड्याला सुपाचा काय भार? आतां या वेणुताईच्या लग्नांत बरेंच चांचपडायला सांपडेलसें वाटतें. त्या वसंत-रावाचें टिपणामुळें फिसकटलें– अरे वा! नांव काढल्याबरोबर स्वारी हजर!

(वसंतराव येतो.) या वसंतराव !

**वसंत**– पिलंभटजी, तुमच्याकडेच आलों आहें. थोडें काम आहे माझें.

**पिलंभट**– हं हं ! काम आहे ? मग आंधळ्या-पांगळ्यांना बोलवा ! दान-धर्माला आंधळेपांगळे आणि कामाधामाला मात्र पिलंभटजी ! असें रे कां बावा ? अरे, तुम्हां शिकलेल्या लोकांना लाजा नाहींत लाजा ! साहेब लोकांच्या नादानें पूर्व विसरलांत ! आतां काय काम अडलें आहे भटा-भिक्षुकांशीं ? जा, आतां जा साहेबांकडे, तेच तुमच्या पांचवीला पुजलेले.

**वसंत**– केलें आहे काय असें त्या साहेबांनीं तुमचें ?

**पिलंभट**– काय केलें आहे ? अरे पोथ्या नेल्या, पुस्तकें नेलीं, तुमच्या शेंड्या नेल्या. आणखीं काय करायचें राहिलें आहे त्यांनीं ? नाहीं म्हणायला तेवढा जानव्याचा कारखाना कांहीं काढिला नाहीं अजून ! आतांशा तर म्हणतात, पापड-लोणचींसुद्धां येतात विलायतेची डब्यांतून ! तेव्हां आतां कुठें तुमचे डोळे उघडताहेत ! आतां भटजीची आठवण होते ! म्हणे, भटजी माझें थोडेसें काम आहे ! लाज नाहीं वाटत तुम्हां लोकांना ? बेशरम कुठले ! तुम्हां शिकलेल्या लोकांना पाहिलें म्हणजे असें वाटतें कीं, एक कोरडा घेऊन मारे फडाफड (वसंत कांहीं रुपये देऊं लागतो.) तुमच्याबद्दल नाहीं म्हणत मी, या हुच्च शिकलेल्या लोकांची एक गोष्ट सांगितली ! सारेच तसे नसतात ! तुम्हीं झाला, आमचा मधु झाला, तुमची गोष्ट निराळी ! आज तुमच्यासारखे धर्माचे आधार नसते तर ब्राह्मणत्व कधींच गेलें असतें रसा-तळाला ! (पैसे घेतो.)

**वसंत**– हा आपला नुसता विसार दिला तुम्हांला ! देणगी अजून पुढेंच आहे ! आतां होईल ना माझें काम ?

**पिलंभट**–हें काय विचारणें ? झालेंच पाहिजें काम. नाहींतर तुम्ही यजमान कशाचे आणि आम्ही आश्रित कशाचे ? आपल्या जिवावर आमच्या साऱ्या उड्या. गरीबाचे वाली आपण; आंधळ्यापांगळ्यांनाहि पैपैसा दिला पाहिजे. आमच्यासारख्यांचाहि हात भिजला पाहिजे. काम काय तें सांगा म्हणजे. झालें, केलेंच म्हणून समजा.

**वसंत**– सांगतों, पण अगोदर यांतलें एक अक्षर कोठें बोलणार नाहीं अशी शपथ घ्या पाहूं !

**पिलंभट**– घेतों शपथ, पण–पण––

**वसंत**– कां, घुटमळता कां असे ? काम वाईटपैकीं असेल असें वाटतें कीं काय ?

**पिलंभट**– भलतेंच! वाईट काम आणि आपल्या हातून, असें कुठें झालें आहे? तुम्हां शिकलेल्या लोकांच्या हातून वाईट कामें होणें नाहींत. साहेब लोकांच्या विद्येचा हा तर मोठा गुण. साहेब लोकांसारखे लोक मिळायचे नाहींत कुठें !

**वसंत**– मग काय अडचण आहे आतां ?

**पिलंभट**– अडचण एवढीच, काकी अडचण कसली ती म्हणा ? आपण तेव्हांच तिचा निकाल कराल ! इतकेच म्हणत होतों आतां ही जी कृपादृष्टि केली आणि पुढच्या देणगीबद्दल जो कांहीं मनांत संकल्प केला असेल, हो आपण कुठलें रहायला ? आणि तो संकल्पसुद्धां अव्वाच्या सव्वा असायचा हं, तर हें सारें काम करण्याबद्दल झालें ! आतां तें पुन्हां गुप्त ठेवण्याची जबाबदारी, भिक्षुकाची जीभ अंमळ लवचिकच ! काम करणें आमच्या मतें सोपें; पण तें गुप्त ठेवणें मोठें कठीण ! तेव्हां म्हटलें. या दुसऱ्या अवघड कामगिरीबद्दल–

**वसंत**– हं, समजलों ! तुमचें तोंड बंद करण्यासाठीं पिशवीचें तोंड मोकळें करावें लागणार. (पैसे देत ) बरें हें घ्या ! आतां झालें ना ?

**पिलंभट**– आतां ही यज्ञोपवीताचीच शपथ ! या कानाचा शब्द या कानालासुद्धा कळणार नाहीं. कुणी माझी जीभ तोडली तरी शब्द नाहीं निघायचा एक. सांगा खुशाल आपलें काम !

**वसंत**– करा कान इकडे, आजच्या आज घरांत एक मेलेला उंदीर टाकून त्याबद्दल बभ्रा करायचा ! आणखी दुसरें, एक दोन दिवसांत रमाबाईंना घेऊन करंजगांवीं जायचें. त्यांना अगदीं गुप्तपणें तुमच्याच इथें ठेवावयाच्या. (भट तोंड वाईट करतो.) खर्चाचा योग्य बंदोबस्त आम्ही करूं. (भट सुप्रसन्न होतो.) पुढें लौकरच मी संन्याशाचे वेषानें तुमच्या घरीं येईन. तेव्हां काय करावयाचें तें मधुकर, तुम्ही–आम्ही मिळून ठरवूं.

**पिलंभट**– मधुकर आहेत ना या बाबतींत ?

**वसंत**– तर तुम्हीं वाईटपणाबद्दल शंकासुद्धां आणूं नका मनांत ! इनामदारांच्या हितासाठींच ही खटपट आहे सारी. हं, मेलेल्या उंदिराला शिवल्याबद्दल हें घ्या प्रायश्चित्तादाखल (रुपये देतो.)

किती वैराग्य तुमचें ! व्यर्थचि निंदा केली ।। धृ० ।। नच सौजन्यासि या तिळहि सीमा उरलि, जगिं जन्मा मृत्युसि जो ठेवी भेदा न मुळीं ।। १ ।।

**पिलंभट–** [ घेत घेत ] आतां काय बुवा नाहीं कसें म्हणावें ! शब्द कसा मोडावा !

**वसंत–** हं, लागा आपल्या कामाला ! या गोष्टीची वाच्यता मात्र अगदीं बंद !

**पिलंभट–** हें पहा घातलें तोंडाला कुलूप !

**वसंत–** आतां तें चांदीच्या किल्लीनेंहि उघडणार नाहींना ? नाहीं तर कराल सारा घोटाळा, चला आतां लागा कामाला. (जातात. पडदा पडतो.)

## प्रवेश चौथा

[ नाटक मंडळीचे घरासमोरील रस्ता. पात्रें : तात्या व रघुनाथ. ]

**तात्या–** हे मधुकर म्हणायचे, ते त्या मुलीचे भाऊ आणि ते वसंतराव म्हणायचे, त्याच्याशीं तिचें लग्न व्हायचें आहे ! मुलगी आहे नक्षत्रासारखी आणि तिच्या बापानें तर बाळाभाऊलाच वचन दिलें आहे; तो 'नाहीं' म्हणेल तेव्हां पुढची गोष्ट ! आणि तो तर असा वेडापीर ! म्हणून ही सारी खटपट करायची. नाहीं तर फुकट पोर बुडते बघ !

**रघुनाथ–** पण तात्या, हें मालकांना पसंत पडेल का ? नाहींतर म्हणतील तुला कोणी ही पंचाईत सांगितली होती म्हणून !

**तात्या–** अरे वेडाच आहेस ! ते कशाला नको म्हणतात ! यांत कांहीं वाईट का आहे ! उलट परोपकार ! आतां सोंग घेतल्यावर त्यांच्याशीं कसें काय बोलायचें तें सारें तुला सांगेन मग !

**रघुनाथ–** पण असें कसें बोलायचें बुवा भलतेंच !

**तात्या–** अरे लेका, रोज सोंगें नाहीं का घेत तुम्ही ! त्यांतलेंच हें एक सोंग. बरें, जा तर आतां ! तो पहा, बाळाभाऊच येत आहे; तर सोंगाची तयारी करून ठेव जा. (तो जातो व बाळाभाऊ येतो. तात्याला न पहातां बाळाभाऊ विचार करतो. )

**बाळाभाऊ–** जगायचें कीं मरायचें हा एवढाच प्रश्न आहे ! जगणें–मरणें हीं दोन्हीं सारखींच ! अखेर तिनें मला केराप्रमाणें झाडून लोटून दिला ना ?

प्रियेनें माझा धिक्कार केल्यानंतर हें काळें तोंड कुठें दाखवूं ? कांचनगडच्या मोहनेंतल्या हंबीररावाप्रमाणें माझी दुर्दशा झाली आहे ! अरेरे, सुंदर वस्तूंची लयलूट कां बरें असूं नये ? नाहींतर दुसऱ्या एखाद्या— काय हा पापी विचार ! हा अधम बाळाभाऊ आतां दुसऱ्या स्त्रीवर प्रेम करणार ! धिक्, धिक् ! काय करूं रे, मला कोणी प्रतिस्पर्धी नाही ! याहि बावतींत मी पुरा दुर्दैवी आहें ! परमेश्वर, सूड घेण्याचें समाधानसुद्धां तूं मला देत नाहीस !

**तात्या**— बाळाभाऊ !

**बाळाभाऊ**— (दचकून, पण गंभीर आवाजानें) कोणी हांक मारिली मला ? बोला, तुम्ही वेणु आहांत का ? (पाहून) कोण, तात्या ? माझा प्रिय मित्र तात्या ! (त्याच्या गळ्याला मिठी मारितो.) मित्रा, प्रिय मित्रा तात्या, इतका वेळ कुठें रे होतास ? माझ्या कपिंजला, या बाळाभाऊला–तुझ्या मित्र पुंडरीकाला विरहावस्थेंत टाकून तूं कुठे रे गेला होतास ? तात्या, प्राणमित्रा तात्या, अरे—

कोण जगीं या तुजवीण दुसरा मज विश्वासाचा ॥
मित्र जिवाचा कोण तुझ्याविण आश्रय शोधूं अन्य कुणाचा ॥
घालुनि पोटीं अपराधातें कोण करिल मज बोध हिताचा ॥

**तात्या**- बाळाभाऊ, काय हें ? धीर धरा, धीर धरा गुरु, हें काय ?

**बाळाभाऊ**- तात्या, आतां कशाचा गुरु, तात्या, तुमचा तो आनंदी, रंगेल बाळाभाऊ आतां कुठें आहे ! आतां मी गुरु नाहीं, कोणी नाहीं ! आतां धीर धरणार कशाच्या जीवावर ! शून्यची भासे हें जग सारें नच उत्साह कसा तो ॥ (वगैरे)

**तात्या**— या बोलण्यांत काय अर्थ आहे ? उठा ! हें शोभतें का तुम्हांला ?

**बाळाभाऊ**— न शोभेना ! मला आतां त्याच्याशीं काय करायचें आहे ? मी आतां कोठें तरी जाऊन आत्मघात करणार !

**तात्या**- काय; आत्मघात ? महत्पाप, महत्पाप, महत्पाप !

**बाळाभाऊ**— भगवान् नारदमुने—नाहीं, नाहीं. प्रियमित्रा तात्या, आत्महत्त्या करूं नको तर काय करूं ? ठेवूनि प्राण करूं मी काय ! ऐसा हतभागी ॥

**तात्या**— पण काय झालें काय तें तर सांगा आधीं ! माझ्यासारख्या मित्राजवळसुद्धां सांगायचें नाहीं, मग कुणाजवळ सांगणार ?

बाळाभाऊ– ऐक तर मग! मधुकर कालपरवां मला बोलवण्यासाठीं आला हें माहीत आहे ना?

तात्या– हो, त्यांच्या बहिणीला पहाण्यासाठीं तुम्हांला बोलावलें होतें ना त्यानें?

बाळाभाऊ– हो. पण मी तिला भेटतों तों निराळाच प्रकार! मीं तिचें पाणिग्रहण करितांच ती संतापली. तिनें माझा धिक्कार केला, मला दुरुत्तरें बोलली, माझ्या पवित्र प्रेमाला पायांखालीं तुडविलें!

तात्या– म्हणजे लाथ मारली कीं काय तुम्हांला?

बाळाभाऊ– नाहीं. माझा फार अपमान केला तिनें. अखेर मी मूर्च्छित पडलों. हें पाहून ती राक्षसी विनदिक्क्त मनानें निघून गेली.

तात्या– अरेरे! काय क्रूरपणा हा! आणि तुम्हीं?

बाळाभाऊ– मी तिथेंच मूर्च्छित पडून राहिलों! त्यावेळीं मला तिथें वारा घालून सावध कोण करणार? पुष्कळ वेळ वाट पाहिली कीं कोणी येऊन माझ्या हताश मनाचें समाधान करील म्हणून! पण त्या भयाण वेळीं आणि भयाण अरण्यांत–

तात्या– अरण्यांत?

बाळाभाऊ– म्हणजे त्यांच्या त्या बागेंत कोण येणार? मित्रा, तूंसुद्धां त्यावेळीं तिथें नव्हतास!

तात्या– पण अखेरीस उठलां कीं नाहीं?

बाळाभाऊ– अर्थात; नाहींतर इथें कसा आलों असतों? उठलों खरा, पण तो कसा? त्यांच्या माळ्यानें येऊन मला हांकलून दिलें, अगदीं हांकलून दिलें बरें! तेव्हांपासून एक तासभर असा भटकत फिरतों आहें!

(तात्या डोळे पुसतात व रडतात.)

बाळाभाऊ– पण तात्या, हें काय? अरे बोलता बोलतां–दृष्टि भरे जलभारें। कारे अनिवारें। सुहृदारे। वद कारण मजला सारें॥

तात्या– हरहर! इतका वेळ माझें लक्षच गेलें नाहीं। काय दशा झाली आहे ही तुमची! पंजर झाला अस्थींचा या सुरम्य देहाचा॥

बाळाभाऊ– (स्वगत) तर काय, मी रोडसुद्धां झालों आहें? विरहावस्थेचीं सारीं वर्णनें अक्षरशः खरीं आहेत तर मग? (प्रकट) काय म्हणतां, मी रोड झालों आहें?

**तात्या**– रोड ? अहो तुमच्या अंगांतून तुमचा सदरा कसा गळून पडला नाहीं याचेंच मला नवल वाटतें ! कोदंड दोन तीन दिवसांत रोड झाला, शूरसेनाची 'काय ही दशा' व्हायला एक दिवस लागला आणि पुंडरीकाचा वाळून कोळ व्हायला आठ प्रहर लागले, पण या साऱ्या सृष्टिचमत्कारांवर तुमची ताण आहे ! तुम्ही एका तासांतच वाळून कोळ झाला ! फिके तर इतके पडलां आहां कीं हे सारे नायक फिक्के पडतील तुमच्या दारुण विरहावस्थेपुढें. पण गुरु, तुमची टोपी कुठें आहे ?

**बाळाभाऊ**– मला माझ्या देहाचीहि परवा नाहीं मग टोपीची काय कथा ? आतां मला टोपी काय करायची आहे ?

**तात्या**– खरेंच ! ती ठेवायची तरी कुठें ! डोकें असेल तर ना ठिकाणावर? (स्वगत) डोकें मुळींच नाहीं, मग त्याचें ठिकाण कसें मिळणार ?

**बाळाभाऊ**– (स्वगत) टोपी मुद्दाम टाकून दिली तिचें सार्थक झालें ! विरहावस्थेंत नायक नेहमीं बोडकाच असावयाचा ! (प्रकट) तात्या, झालेल्या दुर्दैवी प्रकरणांत त्या माळ्यानें मला हांकलून दिलें याचें मला फार वाईट वाटतें ! गुप्तमंजूषांत विलासाला नदिनीचा बाप मेघनाथ स्वत: हांकलून देतो, अर्जुनाला हांकलणारा बलराम सुभद्रेचा वडील भाऊ तरी होता ! पण माझ्या वांट्याला तो भिकारडा माळी, वेणूच्या घरचा गडी यावा ना !

**तात्या**– मला वाटतें तिनेंच तुमचा अपमान करण्यासाठीं त्याला मुद्दाम पाठविलें असावें !

**बाळाभाऊ**– असें तुम्हांलाहि वाटतें ना ? मलाहि थोडासा असा संशय येतोच !

**तात्या**– संशय नकोच ! एरवीं त्याची काय छाती होती तुम्हांला धक्के देण्याची !

**बाळाभाऊ**– खरें आहे तुमचें म्हणणें ! (एकदम आवेशानें) आतां असें करणार ?

**तात्या**– कसें ?

**बाळाभाऊ**– अंगिकार करुनि हिचा गर्व खंडितों ॥
अबलेचा पाड काय सहज जिंकितों ॥
श्रेष्ठ नराव्रीण यास काय भूषण ॥
कुशब्द बोलुनि मलाच लावि दूषण ॥

तिच्या बापानें तर आमच्या लग्नाबद्दल वचन दिलेलें आहे ना ?

**तात्या**– (स्वगत) अरेच्चा ! हें भलतेंच होऊं पहात आहे. (प्रकट) नाहीं गुरु, या रीतीनें जाण्यांत मजा नाहीं. माझ्या मतें अशा उन्मत्त स्त्रीचा सूड दुसऱ्या एखाद्या स्त्रीवर प्रेम करून घ्यावा ! मानिनी स्त्रियांना यासारखें दुसरें मरण नाहीं !

**बाळाभाऊ**– छे छे ! दुसऱ्या स्त्रीवर प्रेम कधीं कोणी केलें आहे का ? अनुरक्त पुरुषाला त्याच्या प्रणयिनीखेरीज गत्यंतरच नाहीं !

**तात्या**– तें कां ? सत्यविजयांत नाहीं का सत्यविजयानें पहिली स्त्री टाकून दुसरी केली ती ! वा: गुरु, विसरूं नका असें !

**बाळाभाऊ**– हो हो, ठीक आहे, पण हें जमणार कसें ? अशी दुसरी स्त्री कोण मिळणार ? वेणूसारखी योग्य ?

**तात्या**– भय्या, हा तात्या बोलतो आहे म्हटलें ! अर्धवट गोष्टी नाहींत आपल्याजवळ ! तुमच्या योग्य अशी एक सुंदर तरुणी पाहूनसुद्धां ठेविली आहे ? उगीच नाहीं ! अगदीं त्या वेणूपेक्षां सरस !

**बाळाभाऊ**– कोण, कोण हो ती ?

**तात्या**– आपला रघुनाथ आहे ना ? त्या ची हुबेहूब प्रतिमा ! रूपानें, गुणानें, वयानें, उंचीनें अगदीं तशी !

**बाळाभाऊ**– खरें ? का थाप आहे झालें !

**तात्या**– थाप ? दिली आहे का थाप कधीं तुम्हांला ? शिवाय तुमच्यासारखाच नाटकाचा नाद आहे तिला ! सारीं नाटकें पाठ !

**बाळाभाऊ**– काय म्हणतां ? सारें खरें हें ?

**तात्या**– अक्षरश: खरें ! आणि म्हणूनच तर ती एका संकटांत आहे.

**बाळाभाऊ**– काय, संकटांतसुद्धां आहे? मग तीच खरी नायिका !

**तात्या**– संकटांत आहे तर ! तिच्या बापानें एका मनुष्याशीं तिचें लग्न ठरविलें, पण तिचें त्याच्यावर प्रेम नाहीं ! म्हणून ही लग्नाला कबूल नाहीं ! एवढ्यासाठीं तिच्या बापानें तिला एका खोलींत कोंडून ठेविली आहे ! कोणाला तिकडे जाऊं देत नाहीं, कोणाशीं तिला बोलूं देत नाहीं !

**बाळाभाऊ**– अरेरे, कोण भयंकर हाल हे !

**तात्या**– आणखी सांगितलें तर तुम्हांला खोटें वाटेल, तिचें तुमच्यावर थोडेसे प्रेमहि आहे !

**बाळाभाऊ**– हॅट् ! थाप आहे सारी !

**तात्या**– आतां काय सांगावें तुम्हांला ? माझा तिचा स्नेह आहे ! तुम्हांला माझ्याबरोबर वरेच वेळां फिरतांना पाहून तिनें तुमची सर्व हकीकत मला विचारली ! पण तिकडे जाणें मोठें कठीण आहे ! मार्गांत शत्रु फार ! एक उपाय आहे फक्त !

**बाळाभाऊ**– बोला, कोणता तो ? मला संकटाची मुळींच पर्वा नाहीं. हा मग तदर्थ त्यजीन प्राण ।। (वगैरे)

**तात्या**– तिच्या घरीं जायचें तें रात्रीं वेषांतर करून. एका पेटाऱ्यांत बसून जावें लागेल ! म्हणजे पेटारा तिच्या खोलींत पोंचविण्याची मी व्यवस्था करीन ! आहे कबूल ?

**बाळाभाऊ**– कबूल ! कबूल ! पेटारा मात्र बुरुडी करा म्हणजे झालें !

**तात्या**– हो, म्हणजे वारा खेळतां राहील म्हणतां !

**बाळाभाऊ**– शिवाय शिवाजीमहाराजांचें अल्प अनुकरण केल्यासारखें होईल त्यांत. छत्रपति दिल्लीहून पळाले ते बुरुडी पेटाऱ्यांतूनच !

**तात्या**– उत्तम ! करूं तर मग सारी व्यवस्था ?

**बाळाभाऊ**– अगदीं खुशाल ! पण तिचें नांव नाहीं सांगितलें तुम्हीं ?

**तात्या**– सरोजिनी !

**बाळाभाऊ**– वाहवा ! नांवांतसुद्धां प्रणय आहे ! सरोजिनी ऽऽ !

**तात्या**– जातों तर मग मी ! दोनचार दिवसांत तुम्हीं मला भेटा !

**बाळाभाऊ**– बरें ! [तात्या जातो.]

**बाळाभाऊ**– आतांच ती रात्र असती तर किती बरें झालें असतें ! प्रत्येक क्षण मला युगासारखा वाटत आहे ! प्रिया संकटांत, माझ्यावर तिचें प्रेम, मी रात्रीं तिला चोरून भेटणार, मी वेषांतर करणार ! अहाहा, नाटकांत यापेक्षां काय जास्त असतें ! नांव तरी किती गोड ? सरोजिनी ! काव्यमय, प्रेममय, सरोजिनी. नाहीतर हीं गांवढळ नांवें, यमी, वगडी, गोदी, वेणु ! शीः त्या वेणूचें तर नांवसुद्धां नको ! आतां एक सरोजिनी आणि बाळा-भाऊ ! बाळाभाऊ हें नांव जरासें बावळटच आहे. हरकत नाहीं ! आपण तर नांवसुद्धां बदलणार ! विक्रांत हेंच नांव सांगणार ! झालें, माझ्या भाग्याला तर पार नाहीं ! हे छत्रपति शिवाजी राजा, मी आज तुझ्या-सारखा बुरुडी पेटाऱ्यांत बसून जाणार, तर या कार्यांत यश दे ! बोल, शिवाजीमहाराज की जय ! [उडी मारून निघून जातो. पडदा पडतो.]

## प्रवेश पांचवा

[पात्रें : अण्णासाहेब व यशोदाबाई.]

**अण्णा**– तुला सत्रा वेळां सांगितलें तरी तुझ्या कांहीं ध्यानांत रहात नाहीं ! औषधाची अबाळ करून माझा प्राण का घेणार आहांत तुम्ही ? पहांटेस झोंप येत नाहीं म्हणून तें औषध शास्त्रीबुवांनीं मुद्दाम दिलें ! तें कांहीं पहांटेस द्यायची आठवण राहिली नाहीं !

**यशोदा**- द्यायचें तरी कसें? पहांटेस आपल्याला लागली होती झोंप! म्हटलें, चांगली झोंप लागली आहे ती कशाला मोडावी ?

**अण्णा**– शिकस्त झाली आतां ! झोंप येत नाहीं म्हणून मी औषधें आणितों आणि तुझें म्हणणें मला झोंप लागली होती ! काय म्हणावें तुम्हांला आतां?

**यशोदा**– खरेंच झोंप लागली होती ! खोटें कशाला सांगू मी ?

**अण्णा**– भलतेंच ! झोंप नाहीं ती ! ग्लानि असेल ! औषधावांचून आजाऱ्याला झोंप येणार कशी ? आली तरी खरी झोंप नाही, पुन्हां मला अशी झोंप लागली तर जागे करून औषध देत जा म्हणजे मी पुन्हां शास्त्रोक्त निजत जाईन ! मला असली वेडीवांकडी झोंप नको !

**यशोदा**– बरें, आतां नाहीं विसरायची !

**अण्णा**– बरें नाही, आतां आण !

**यशोदा**– आतां कशाला अवेळी ?

**अण्णा**– अवेळ कशाची ? औषध केव्हांहि घ्यावें आणि कितीहि घ्यावें. जा; आण लौकर ! जा ! जा ! लौकर ! [यशोदाबाई जातात.]

**अण्णा**– (स्वगत) काय कटकट करावी लागते पहा ! ही पुडी घ्यावी आतां (पुडी उलगडून पहातो.) पुरती चिमूटसुद्धां नाहीं वैद्यलोक आतांशा पैशाकडे फार बारकाईनें पाहूं लागले; अगदी सोन्या-मोत्याच्या भावानें औषधें देतात ! (पुडीतील औषध तोंडात टाकतो.) बाकी शास्त्रीबुवांचीं औषधें रामबाण खरीं ! त्यांनीं म्हटल्याप्रमाणें खरेंच हुशारी आल्यासारखें वाटूं लागतें ! मला वाटतें दुसरी पुडी घेतली तर दुप्पट हुशारी येईल ! पाहतोंच प्रचीति ! (दुसरी पुडी घेतो.) अरेच्चा हुशारी ! वाहवारे औषध, शाबास ! रात्री खावें तूप आणि सकाळी पहावें रूप ! आपण तिसरीहि पुडी घेणार ! (तिसरी पुडी घेतो.) वाहवा, वाहवा, नवीन जन्म घेतल्यासारखें वाटतें !

मला वाटतें, चोवीस तास या पुड्यांचाच खुराक चालू ठेवावा ! पण पुड्या कुठें आहेत जास्त आतां ? (फडकें झाडतो. कांहीं पुड्या पडतात.) अरेच्चा ! या पुड्या कसल्या ! (पुडीवरील अक्षरें वाचतो.) अरे, हुशारीच्या पुड्या तर या ! मग मीं घेतल्या त्या कोणत्या आणि त्यांनीं हुशारी आली कशी ? हां. आलें लक्षांत ! पहांटेस खरी झोंप न येतां झोंपेचा भास झाला ! तशीच आतां हुशारी आल्याचासुद्धां हा भासच असावा ! मला वाटतें, माझा रोग फार बळावत चालला ! त्यानें असे विलक्षण भास होतात ! आतां खरें तरी कोणतें आणि भास तरी कोणता ? सध्यां जें कांहीं दिसतें त्यावर विश्वास ठेवतां कामा नये ! बरें, पण मी खाल्ल्या त्या पुड्या तरी कशाच्या ? (त्या पुड्यांवरील अक्षरें वाचतो. घाबरून) अरे बापरे, या तात्यांच्या नेत्रानंदकज्जलाच्या पुड्या ! आणि त्यांत विष असेल तर ? हो, डोळ्यांच्या औषधांत विष असावयाचेंच ! छेः, आहेच ! हें, माझें डोकेंसुद्धां फिरूं लागलें ! हें जिकडे तिकडे हिरवेंगार दिसूं लागलें ! आतां कसें करावें ? (मोठ्यानें ओरडून) अहो पिलंभट ! धांवा ! धांवा पिलंभट ! अहो घात ! घात ! [पिलंभट धांवत घाबऱ्या घाबऱ्या येतो.]

**पिलंभट**– (स्वगत) उंदीर मेल्याची थाप ठोकावी आतां. (प्रकट) घात, अण्णासाहेब, घात अहो घात, घात–

**अण्णा**– अहो घात, भयंकर घात, घात !

**पिलंभट**– घात, भयंकर घात.

**अण्णा**– अहो, केवढा घात !

**पिलंभट**– अगदीं आपण म्हणतां एवढा घात, घात–

**अण्णा**– आतां कसें करावें ?

**पिलंभट**– आतां कसे करावें ? घात ! अहो घात !

**अण्णा**– अहो घात ! घात ! पण करायचें कसें आतां ?

**पिलंभट**– करायचें काय दुसरें ? आतांच्या आतां पळालें पाहिजे इथून !

**अण्णा**– पळून काय होणार ! यमापुढें किती पळणार ?

**पिलंभट**– मग दुसरा काय उपाय करणार इथें ?

**अण्णा**– यावर कांहीं औषध नाहीं ?

**पिलंभट**– कांही औषध नाहीं ! घटकेचा उशीर केला तर निकाल लागायचा !

**अण्णा–** (खालीं बसतो.) माझे हातपायच मोडले ! आतां पळणार तरी कुठं ? घात ! औषध नाहीं ना कांहीं उपयोगी ?

**पिलंभट–** नाहीं ! पण आपल्याला कसें कळलें हें ?

**अण्णा–** अहो माझें मला कसें कळणार नाहीं ?

**पिलंभट–** म्हणजे ? ही गोष्ट प्रथम पाहिली मीं !

**अण्णा–** पण केली मीं ना ! या पहा पुड्या हुशारीच्या ! अन् या मी खाल्लेल्या नेत्रानंदकज्जलाच्या ! भिनलें त्याचें विष !

**पिलंभट–** अहो हें निराळेंच ! मी म्हणतों तें निराळें ! अहो, आपल्या घरांत मेलेला उंदीर !

**अण्णा–** (ताडकन् उठून) मेलेला उंदीर ? अहो, कुठें ? पिलंभट; कुठें ?

**पिलंभट–** अहो, आपल्या माजघरांत ! घात माजघरांत !

**अण्णा–** माजघरांत; अहो घात ! मघांच्याहून मोठा घात !

**पिलंभट–** म्हणून तर मी आपल्यापेक्षां मोठ्यानें ओरडत होतों !

**अण्णा–** तुम्ही पाहिलांत स्वत: ?

**पिलंभट–** अगदीं या डोळ्यांनीं पाहिला तो पहा तिथें आहे, चला–

**अण्णा–** अहो, नको, मी नाहीं यायचा त्याच्या जवळ. धांवा, मधूला बोलवा; माधवाला बोलवा; आतांच्या आता करंजगांवीं चला सारे ! धांवा; अहो धांवा म्हणतों ना ? करा तयारी निघण्याची. (पिलंभट धांवत जातो.) अरे मधु, माधवा, उठा ! बांधा पेट्या, चला गाड्या आणा, निघा पळा. (यशोदाबाई येतात.) उठा ! बांधा पेट्या, चला गाड्या आणा, पळा.

[इकडून तिकडे धांवतो.]

**यशोदा–** (घाबरून) अगबाई असें काय करायचें हें ? हें काय बोलायचें असें !

**अण्णा–** अग धांव, पेट्या बांध ! ऊठ, पळ ! अरे, धांवा पळा, गाड्या आणा.

**यशोदा–** (मोठ्यानें) अगबाई, आतां काय करूं ? इतक्यांत कुणी कौटाळ केलें वाटतें ! अहो पिलंभट, धांवा हो धांवा ! घात, अंगारा आणा. अहो पिलंभट, धांवा; अंगारा ! अगबाई आतां काय करूं ?

**अण्णा–** (स्वगत) तिकडूनच आली ही वाटतें ? झाला घात ! ताप वायुसुद्धां झाला वाटते ! झाली, बडबडसुद्धां करायला लागली ! आतां काय करावें ? (प्रगट) अहो पिलंभट, धांवा ! घात ! ही तिकडूनच आली. हिला

ताप भरून वायुसुद्धां झाला ! अहो धांवा, घात ! डागण्या आणा ! घात ! अरे, डागण्या आणा !

यशोदा– घात ! सर्वस्वी घात ! अहो पिलंभट, इकडे बाहेर घात झाला इतक्यांत ! काय ही बडबड ! अहो धांवा ! अंगारा आणा ! घात !

(अण्णासाहेब "वायु, घात, डागण्या" असें ओरडतात; व यशोदाबाई "बाहेर व्हा, घात, अंगारा" असें ओरडतात; मधु, माधव व पिलंभट येतात.)

पिलंभट– अण्णा, बाई, असें घाबरूं नका ! कोणाला कांहीं झालें नाहीं अजून !

अण्णा– अहो नाहीं झालें कसें ? मग ही ओरडते कां अशी ?

यशोदा– आपण ओरडायचें म्हणून !

अण्णा– अग, घरांत उंदीर पडल्यावर कोण नाहीं ओरडणार ?

यशोदा– अस्सें ! मला वाटलें आपल्याला बाहेरचा झाला म्हणून मीं भिऊन हांका मारल्या पिलंभटांना.

अण्णा– मला वाटलें, माजघरांतून तूं आलीस तेव्हा तुला ताप भरून वायु झाला. हं पिलंभट, पहा कुणाला झाला आहे का ताप आणि करा बांधाबांध लौकर.

मधुकर– अण्णा, अहो आहे काय हें ? एखादा उंदीर मेला म्हणून झालें काय?

अण्णा– अरे बाबा, घात ! या काळांत जिवंत सिंहापेक्षां मेलेल्या उंदरालाच जास्त भ्यावें लागतें, समजलास ?

माधव– रास्त आहे आत्मा म्हटला म्हटलें सर्वांचा सारखाच. सर्वत्र एकच ब्रह्म पसरलें आहे. मूळ ब्रह्म, तिथून पुढें ओंकार ध्वनि तिथून पुढें माया––

अण्णा– अरे, पुरे बाबा, तें राहूं दे आतां. पिलंभट, उठा लवकर, धांवा, टांगे आणा, पहिलीच गाडी सांपडली पाहिजे. जा मधु, पळ––

मधुकर– पण, अण्णा––

अण्णा– सांगितलें ना आतां वेळ घालवूं नका म्हणून ? गाड्या, बग्या, छकडे, टांगे, दमण्या, बंड्या, खटारे, एक्के, पैठणी, जें सांपडेल तें घेऊन या !

माधव– त्यांत भेद तो काय पहावयाचा ! हा टांगा, हा छकडा, ही बंडी, हा सारा स्थूल दृष्टीस भ्रम आहे. अंतर्दृष्टीला एकाकारानें एकाची शून्यांत आणि––

अण्णा– याला, मला वाटतें झालें आहे कांहीं तरी–––

माधव– व्हावयाचें आहे काय ? या साऱ्या उपाधि–––

**अण्णा**– खरी उपाधि आहे बुवा तुझी ! पिलंभट पळा; उगीच वेळ घालवूं नका !

**पिलंभट**– बरें, पण आपण त्या पुड्या खाल्ल्या त्याचें काय ?

**अण्णा**– अहो, त्याचें काय ! मला तर विषसुद्धां चढेनासें झालें आहे. प्रकृति अगदीं अश्शी होऊन बसली आहे ! नसता भास होतो आहे.

**माधव**– अहाहा ! हीच उन्मनी अवस्था. मुमुक्षेची तृष्णा लागण्यापूर्वी मुमुक्षु जनाची हीच अवस्था होते, इथून पुढें तळमळ, पुढें पिपासा, पुढें साक्षात्कार, पुढें मुक्ति ... अण्णा धन्य, धन्य तुमची ! तुर्यावस्था संपून तिच्या पुढची अवस्था तुम्हांला प्राप्त होणार ! ज्ञानदेव, तुकाराम, एकनाथ, विसोबा खेचर----

**अण्णा**– म्हसोबा गाढव--पुरे कर हं यादी ! आणखी कांहीं वेळ असा घोळ घालून बसलांत तर रोगानें माझी खरोखरीच पुढची अवस्था होणार ! धन्य आहे तुझी ! पिलंभट, उठा ! मधु पळ ! हे पहा तात्या आलेच ! [तात्या येतात.]

**अण्णा**-- तात्या, चला. घरांत उंदीर पडला ! आतां इथें राहून उपयोगी नाहीं.

**तात्या**– नाहीं खरें, पण चलायचें कसें ? घरांतून बाहेर पडायचें म्हटलें तर पूर्वाभिमुख गमन करावें लागेल-आणि हा मुहूर्त तर पूर्वाभिमुख गमनाला विरोधी आहे ! या वेळीं उत्तराभिमुख गमन लाभेल काय तें !

**अण्णा**– अहो, आतां मुहूर्त पाहावयाला तरी अवकाश कुठें आहे ? हात-घाईच्या वेळीं सारे मुहूर्त सारखेच !

**माधव**– हेंच खरें ! हरीचिया दासा ।। शुभकाळ अवघ्या दिशा ।।

**अण्णा**– माझी आई, तुला दहा दिशा मोकळ्या आहेत; पण आतां जीभ मोकळी सोडूं नकोस ! काय तकलीफ आहे पहा ! हं, तात्या, आतां निघा-लेंच पाहिजे !

**तात्या**– अरे काय म्हणणें हें, अण्णा ? हें पहा, [ पंचांग दाखवितात. ] संकट होय, क्लेश उपजे, सुखनाश; मुहूर्तें चालेल तो सुख पावेल. गोरक्ष पुसे. मत्स्येंद्र सांगे; हा केवळ मुहूर्तराज होय ! सहदेव म्हणे भाडळीशीं--

**अण्णा**– आपली मति हरली बुवा आतां ! हा प्राण जाण्याचा मुहूर्त दिसतो; मग तात्या, आतां करायचें तरी कसें ?

**तात्या**– करायचें काय त्यांत ? त्या उत्तरेकडच्या खिडकींतून सारे बाहेर पडा म्हणजे झालें.

**यशोदा**– त्यापेक्षां, मी म्हणतें, तेवढें परस्थान--

**अण्णा**– आतां पायांवर डोकें फोडून घेऊं का एकेकाच्या ! आतां परस्थान नको, संस्थान नको; पिलंभट--

**यशोदा**– असें काय म्हणायचें भलतेंच ? परस्थान ठेविल्यावांचून का कुठें निघणें म्हटलें आहे ?

**पिलंभट**-- आतां असें करूं द्या– परस्थान घेऊन मी त्या उत्तरेकडच्या खिडकीवाटे बाहेर पडतों आणि मग मंडळी येऊं द्या पुढल्या दारानें ! म्हणजे साऱ्या अडचणी भागतील !

**अण्णा**-- शाबास ! असेंच करा. चला, तात्या, पिलंभट, त्या विषाच्या पुड्या खाल्ल्या त्यांच्यावर उतारा पण आणा बरें कां ? मला भलभलता भास होऊं लागला आतां !

**पिलंभट**-- (स्वत:शीं) न होईल तर मग माझी करामत कुठें राहिली ? साऱ्या पुड्या इथून तिथून एक. घरचा वैद्य ...

**अण्णा**-- हां, निघा आतां.

**पिलंभट**-- जातों, तांगे आणतों आणि आपल्यासाठीं उताऱ्याचें औषधहि आणतों.

**अण्णा**-- औषध आणाच, तें घेईन आगगाडीत बसल्यावर ! आधीं तांगे आणा ! तांगे कांहीं आगगाडीत बसल्यावर मग उपयोगी पडायचे नाहींत तेव्हां आधीं तांगे आणा. चला, एकएक क्षण म्हणजे वर्ष आहे आतां !

**यशोदा**-- अंगारा तरी लावूं का कुळस्वामिनीचा सगळ्यांना ?

**अण्णा**-- नको. अंगारा आणायलासुद्धां तिकडे जाऊं नकोस, चला. काय बांधाबांध करायची ती करून घ्या लौकर ! मी जाऊन बसतों सडकेवर.

(जाऊं लागतात.)

**तात्या**– अरे, पण त्या मुहूर्ताच्या खिडकींतून--

**यशोदा**-- तेवढें तें परस्थान आधीं--

**माधव**-- कशाला ? अण्णा, तुम्हींच जा म्हणजे झालें. अग, परस्थान आणि अण्णा यांच्यांत काय भेद आहे ? आणि या खिडकींत आणि त्या दारांत तरी काय भेद आहे ?

**अण्णा**-- वेडयांचा बाजार, खरा वेडयांचा बाजार हा ! चला. (सर्व जातात.)

**मधुकर**-- (जातां जातां) शाबास, पिलंभट ! सपला हा प्रवेश; आतां चला, पुढच्या कामाला लागा.

[जातात. पडदा पडतो.]

म. मं. सं. ... वाचनालय ...
वा. क्र. 20384 ... 781814

# अंक तिसरा

## प्रवेश पहिला

[ यमुना व रमाबाई भीत भीत येतात. माधवरावांची खोली.]

**यमुना**-- हं, या आतां लौकर आणि घ्या पाहून सारी व्यवस्था !

**रमाबाई**-- यमुनाबाई, माझ्या किनई उरांत धडकीच भरली आहे !

**यमुना**-- जाऊबाई, भारीच भित्रा स्वभाव बाई तुमचा ! माधवभावोजी आतां इकडे मुळींच यायचे नाहींत.

**रमाबाई**-- त्याचा कुणी नेम सांगावा ! जर येणें झालें तर आणखीं संतापायचें होईल ! कांहीं नाहीं तर आज सात-आठ वर्षें नांव टाकिलें आहे; मग संतापाला कारण मिळाल्यावर तर काय होईल नि काय नाहीं ? म्हणून म्हणतें, अजून चला माघाऱ्या !

**यमुना**-- कांहीं होत नाहीं नि जात नाहीं ! मला इकडून अगदीं चांगलें सांगणें झालें आहे कीं माधवदादाला बाबांच्याजवळ बसवून ठेवितों, घरांतील सारीं माणसें तिथेंच बसलीं आहे, तेव्हां आतां रमावहिनीला नेऊन सारी जागा दाखीव म्हणून ! आतां तर झालें ना ? आणखीं मींसुद्धां येतांना पाहिलें तर माधवभावोजी मामंजींच्या पायाला तेल चोळीत बसले आहेत ! ते कांहीं इतक्यांत इकडे येत नाहींत !

**रमाबाई**-- खरेंच, मामंजीची तब्बेत एकदोन दिवसांत इतकी कशी बरें बिघडली ? पुण्यास बरे होते ना अगदीं ?

**यमुना**-- अहो, बिघडली कशाची ? वसंतदादाची आणि इकडची सारी खटपट ! वसंतदादानें दिलेलें कसलेसें औषध इकडून मामंजींच्या तळपायाला लावायचें झालें ! त्याचा मामंजींच्या पायांत आला बळघा ! झालें, पिलंभटानें मेलेला उंदीर घरांत टाकलाच होता, मामंजींना आणखी तें काय हवें ! लागलींच ते घायकूत होऊन बसले ! एकदां त्यांच्या मनांत संशयानें घर घेतलें कीं झालें ! इकडचा सूर्य इकडे होईल पण त्यांचा संशय कांहीं दूर व्हावयाचा नाहीं !

**रमाबाई**-- पण इतकें करून पुढें काय करायचें तें नाहींच सांगितलें मुळीं !

**यमुना**-- अहो, तें सारें सांगत बसलें तर भारत होईल आणि इथें तर कुडालासुद्धां कान फुटायचे ! वेणू वन्संनासुद्धां यांतलें अगदीं अवाक्षर माहीत नाहीं.

त्या आहेत हळव्या मनाच्या ! फटदिशीं बोलून जायच्या ! वसंतदादाच वैरागी होऊन येणार आहे हें सुद्धां त्यांना ठाऊक नाहीं.

**रमाबाई–** वसंतरावांचें करणें तरी अघटितच ! बायकोसाठीं वैरागी होणार

**यमुना–** आणि वैराग्यासाठी बायको आणणार हें नाहीं म्हटलेंत कुठें ! बरें, तें राहूं दे. सध्यां आपलें पायापुढचें पाहिलें म्हणजे पुरें झालें. ही पहा दाराची कडी; बाहरच्या बाजूनें या बिजागऱ्या खिळखिळ्या केल्या आहेत. त्या फिरविल्या म्हणजे कोयंडा मोकळा होईल. तो सुटला कीं त्याला बांधलेला तो दोर सैल सोडा म्हणजे कोयंडा हळू हळू खालीं येईल, घाई केलीत तर आवाज होईल ! आलें लक्षांत ! वसंतदादानें टाळी वाजवून खूण दिली कीं हळूच या युक्तीनें दार उघडून आंत शिरा. दार लावून घ्या आणि या पडद्यामागें उभ्या रहा. पुढें काय करायचें आणि कसें बोलायचें हें कांहीं सांगायला नको. भिऊं बिऊं नका म्हणजे झालें !

**रमाबाई–** काय होईल तें खरें ! माझें मन आपलें सारखें मागचें पाऊल घेतें.

**यमुना–** अहो, होणें जाणें दैवाधीन ! प्रयत्न आपल्या हातीं, तेवढा करून पहावयाचा झाले. चला आतां. सांगितलेलें नीट लक्षांत ठेवा.

( जातात. )

## प्रवेश दुसरा

( पिलंभट व बैराग्याच्या रूपानें वसंत प्रवेश करितात. )

**पिलंभट–** मग काय, इतक्यांतच हा वेड्यांचा बाजार आटोपता घ्यावयाचा म्हणतां ?

**वसंत–** अजूनसुद्धां इतक्यांतच का ?

**पिलंभट–** म्हणजे मला जारीची जुळवाजुळव करावी लागणार ?

**वसंत–** त्याला कसें करायचें ? गरज आपल्याला आहे ना ?

**पिलंभट–** बरें मग सांगा पाहू काय काय करायचें तें ? या गडबडींत मी पूर्वानुसंधान बरेंचसें विसरून गेलों आहें आधीं आतां काय करायचें ?

**वसंत–** आधीं मधीं असें कांहीं नाहीं सवि सापडेल तसतसें एक एक काम हातावेगळें करायचें. तो नाटकी बाळाभाऊ आहे ना, त्याच्याकडून आतां एकदोन दिवसांत पत्र येईल कीं मला कांहीं वेणूशीं लग्न करावयाचें नाहीं म्हणून !

**पिलंभट**– तें कशावरून आणि कां ?

**वसंत**– त्याचा खुलासा मी सावकाशीनें करीन. सध्यां तुम्हीं असें पत्र खात्रीनें येणार एवढें धरून चला आणि हें यशोदाबाईंजवळ देव खेळवितांना सांगा; तात्यासाहेबांजवळ भविष्यकथनाच्या नात्यानें सांगा; वाटलें तर माधवरावांजवळ त्रिकालज्ञानाच्या धोरणानें सांगा.

**पिलंभट**– आणि एकादे वेळीं बाळाभाऊंचें असें पत्र न आलें म्हणजे ताडदिशीं माझ्या पदरीं खोटेपणा यायचा !

**वसंत**– पिलंभट, तुम्हांला खोटें पाडण्यासाठीं का आम्ही या खटपटी करीत आहोंत ? अहो, उलट हें तुमचें भविष्य दोन दिवसांनीं अचूक खरें ठरलें म्हणजे तुमचा या लोकांत बोज मात्र वाढेल !

**पिलंभट**– मग कांहीं हरकत नाहीं; अशीं खात्रीनें घडून येणारीं भविष्यें मला जरूर सांगत चला; म्हणजे पहा मी कशीं किफायतवार विकतों तीं ! अशी भविष्यें म्हणजे माझा हातखंडा आहे अगदी !

**वसंत**– पण ऐन वेळीं जिभेला खंड पडूं देऊं नका म्हणजे झालें. नाहीं तर आयत्या वेळीं कचराल. ररऽ कराल आणि सारेंच रस्त्यावर आणाल !

**पिलंभट**– ती धास्तीच सोडून द्या ! असा आडरस्त्यानें वावरण्यांत मी अगदीं पटाईत झालों आहें. अहो, आतां तुमच्याजवळ म्हणून आपलें बोलायचें–हा जो द्रव्याचा ओघ माझ्या घराकडे चालला आहे, हा का सरधोपट मार्गानें वहातो आहे वाटतें ? मुळींच नाही. निवळ आडवळणांनीं––

**वसंत**– बरें, तें असो. पुढें दुसरी गोष्ट, तात्यांच्या जवळ वेणूची पत्रिका आहे; ती कांहीं तें कोणाच्या नजरेस पडूं देत नाहीत. तेव्हां कशा तरी गफलतीनें ती पत्रिका तेवढी हस्तगत करून घ्यावयाची. निदान तिची नक्कल तरी करून घ्यावयाची आणि आपल्या ओळखीच्या एखाद्या ज्योतिष्याजवळून तिच्याशीं बरोबर जमेल अशी एक पत्रिका माझ्यासाठीं–या माझ्या संन्यासी नांवासाठीं करून आणावयाची. आलें लक्षांत ?

**पिलंभट**– लक्षांत आलें, पण पटलें नाहीं इतकें. आतां तुमच्या या कारवाया आणि युक्त्या पाहून मी अगदीं सद झालों आहें; पण ही युक्ति नाहीं इतकी आवडली मला. हें सारें तात्यासाहेबांना तुमची पत्रिका वेणूताईच्या पत्रिकेशीं जमते एवढें भासविण्यासाठींच ना ? मग असें केलें तर नाहीं का चालणार ? त्या बाळाभाऊची कुंडली तात्यासाहेबांना पसंत आहेच, तिचीच जवळजवळ नक्कल करून घेतली म्हणजे झालें कीं नाहीं ?

**वसंत**– ठीक आहे. कसें तरी करून पत्रिका जमवा म्हणजे झालें. नाहीं तर बैराग्याला मुलगी देतेवेळीं पुन्हां वसंताचेंच नशीब आड यावयाचें. बरें; हें एक ठरलें. तसेंच मी अण्णासाहेबांना औषध द्यायला उद्यांपासून सुरू करणार; तेव्हां आधीं त्याच्याजवळ माझी वैद्यकीच्या ज्ञानाबद्दल स्तुति करा; तात्यासाहेबांभोंवती ज्योतिष्याचें जाळें पसरा, आणि माधवरावां-जवळ माझ्या योगसाधनाची तारीफ करा. मी तुमचा गुरु आहें असें सांगा. म्हणजे प्रत्येकाचा तुमच्या सांगण्यावर विश्वास बसेल. घटकाभर मला गुरु माना म्हणजे झालें.

**पिलंभट**– गुरु मानायला कशाला पाहिजे ? तुम्ही खरोखरीच माझे गुरु झाला आहां. मला हा लप्पन् छप्पन् करण्याचा थोडासा नाद पहिल्यापासूनच होता, आणि त्याबद्दल मी माझ्या मनांत अगदीं मग्न असें. पण तुमची मधुकरांची हीं शिकलेलीं कुलंगडीं पाहून मी अगदीं चीत झालों आहें. आम्हीं दशग्रंथी पाहिलेलीं माणसें या तुमच्या करामतीपुढें कुचकामाची ठरतों. आमच्या दशग्रंथीचीं सूत्रें ताणून धरिली तरी त्यांचें असें सर्वस्वी गुरफटणारें जाळें होणे शक्य नाहीं. या बाबतींत तुमचा शिकलासवरलेला हात धरण्याची आम्हां दशग्रंथ्याची शहामत नाहीं, तुमचे पायच धरावयाला पाहिजेत. माझ्या गर्वाचें पाणी पाणी होऊन मी कधींपासूनच आपल्याला गुरुस्थानीं मानायला लागलों आहें.

**वसंत**– झालें तर मग; या भावनेनेंच माझी सर्वांजवळ स्तुति करीत सुटा. बाळाभाऊचें पत्र आलें म्हणजे आम्हां गुरुशिष्यांच्या जोडीवर बऱ्याच जणांचा विश्वास बसेल; नंतर अण्णासाहेबांचा हा आम्हींच उभारलेला आजार कमी होत चालला कीं यशोदाबाईच्या मनांत मुलगी देण्याचें भरवून द्या म्हणजे आटोपलें. बाळाभाऊनें वेणूशी लग्न करण्याच नाकारिलें म्हणजे वचनमुक्त झालेले अण्णासाहेब माझें वैद्यकज्ञान पाहून माझ्या उपकारांतून उतराई होण्यासाठीं आपण होऊनच मला मुलगी देऊं करतील. तात्या-साहेबांचा बंदोबस्त ठरविलाच आपण आतां. म्हणजे जमेल कीं नाहीं सारें ?

**पिलंभट**– अगदीं चोख ! पण काय हो, माधवरावांची तुम्ही प्रथम योग-साधनाबद्दल खात्री कशी करून देणार ?

**वसंत**– त्याचा विचार मीं पूर्वीच करून ठेवला आहे. त्याला घटकाभर

ब्रह्मस्थितीचाच अनुभव दिला म्हणजे सहज त्याचा माझ्या शक्तीवर विश्वास बसेल.

**पिलंभट**– पण ती ब्रह्मस्थिति कशी दाखविणार?

**वसंत**– हें पाहिलेंत गुंगी येण्याचें औषध ? त्यांना जरा छां छू करून याच्या वासानें घटकाभर गुंगी आणिली म्हणजे ताबडतोब त्यांची अक्कल गुंग होईल कीं नाहीं ?

**पिलंभट** - जरूर ! या नुसत्या कल्पनेनेंच माची अक्कल गुंग झाली आहे.

**वसंत**– हं, तुम्हीं मात्र अक्कल गुंग होऊं देऊं नका; उलट अगदीं सावध रहा; आणि मीं पहिली टाळी वाजविली कीं रमाबाईंना त्या दारानें माधवरावांच्या खोलींत सोडा. राहील सारें नीट लक्षांत ?

**पिलंभट** - अगदीं. आतां एकदां माझ्या डोक्यावर आपला हात ठेवा म्हणजे मला चांगली तरतरी येईल.

**वसंत**-- नको; डोक्यावर माझा हात ठेवण्यापेक्षां तुमच्या हातांवर मी गुरु असूनहि गुरुदक्षिणा ठेवितों म्हणजे तर खरी तरतरी येईल. हा विवाह जमवून आणून त्याला आतां मान्यता मिळवून देणें देवा, आतां तुझ्या हातीं आहे.

(राग-- काफी ताल-- त्रिवट.)

मान्यता मिळो या जगीं मद्विवाहा ॥धृ०॥<br>
सात्त्विक शुद्ध प्रेम मम होवो स्वजनांप्रति सुखवावया ॥<br>
विनवी तुजला मी जगदीशा ॥ योग्यपथा लाभावया ॥१॥

[त्याला कांहीं रुपये देतो. दोघे जातात.]

[पडदा पडतो.]

## प्रवेश तिसरा

[पात्रें : अण्णासाहेब, यशोदाबाई, मधुकर, वेणु, माधव.
अण्णासाहेब आजाऱ्यासारखे उठून बसले आहेत.]

**अण्णा**– (कण्हत) आई आई, शेवटीं प्रकृतीचें मान या थरावर येऊन पोंचलें ! तरी मी रोज एकेकाच्या कानींकपाळीं ओरडत होतों कीं, बाबा रे, खाण्यापिण्याचा नीट बंदोबस्त ठेवा, सध्यां दिवस बरे नाहींत.

**वेणु**– अण्णा, खाण्यापिण्याचा काय संबंध या दुखण्याशीं ? हें वाऱ्यासारखें दुखणें !

अण्णा– खुळी पोर कुठली ! खाण्यापिण्यानें तर तर सारें होतें. वाग्भटानेंच रडून ठेवलें आहे ना कीं, 'सर्वेषामेव रोगाणां निदानं कुपिता मलाः' एरवीं माणसाला कांहीं व्हावयाचें नाहीं. हीं तुमचीं पक्वान्नें शेवटीं मला मात्र नडलीं !

वेणु - अशीं पक्वान्नें तरी कोणतीं केलीं ? येऊन जाऊन कधींमधीं सणासुदीला घरांत कांहीं गोडधोड झालें असेल तेवढेंच ! पण तेवढ्यानें हें दुखणें आलें असें कसें म्हणतां, अण्णा ? या दुखण्याचा आणि खाण्यापिण्याचा काय संबंध ?

मधुकर– आणखीं अण्णा, या दुखण्यालासुद्धां आतां इतकें भिण्याचें कारण नाहीं. कारण एक तर तुम्हांला आज पांच दिवस झाले. ज्याअर्थी या पांच दिवसांतहि या दुखण्यानें उग्र स्वरूप धारण केलें नाही, त्याअर्थी हा अगदीं माइल्ड टाइपचा अटॅक असला पाहिजे.

माधव– अरेरे, मधु, काय बोलतोस हें! अरे रोगांतसुद्धां भेद पाडतोस ! हा लहान, हा मोठा असें कधीं मनांतसुद्धां आणू नये. 'नोच्चार्थो विफलोपि दुपणपदं दूष्यस्तु कामो लघुः' !

यशोदा– माधवा, तूं गप बैस पाहूं ! राहूं दे तें तुझें पुराण ! मेल्यांनों, आजारी माणसाच्या जवळ असें वडबडतांना थोडा विचार करावा !

अण्णा– अगदीं खरें. मला वात झाल्यासारखें वाटत आहे. खूप मोठ्यांदा ओरडावेंसें वाटतें आहे. अग, माधवा, मधु काय करूं ? मला भ्रम झाल्यासारखें वाटायला लागलें आहे ! आऽऽ ! (अंग टाकून अंथरुणावर पडतो. सर्व धरतात.)

मधुकर– (स्वगत) तुम्हांलाच काय अण्णा, इथें सर्वांनाच भ्रम झाला आहे !

यशोदा– (पदराचा अंगारा सोडून) अंबाबाई, आतां तू आमची पाठीराखी आहेस. मला क्षमा कर ! आई, तुझा गोंधळ या दुखण्यांतून उठल्याबरोबर मी घालीन ग ! (दुसरी मंडळी तोंडांत औषध घालतात.)

अण्णा– (एकदम उसळून) माझी आई, कां उगीच गोंधळ घातला आहेस ! तुझी अंबाबाई कशाला पाहिजे इथें ? हा बघ मी उठून बसलों ! मला कांही होत नाहीं आतां ! आतां घाल गोंधळ पाहूं कसा घालतेस तो !

(उठून बसतात.)

**यशोदा**– आई अंबाबाई... (असे म्हणून हातावर अंगारा घेऊन चोहोंकडे फुंकते.)

**अण्णा**– कां ग ? घाल कीं गोंधळ ! म्हणे गोंधळ घालीन ! घाल गोंधळ !

**यशोदा**– मधु, माधवा, अरे बाबांनों जा रे कुणीतरी त्या पिलंभटाला तरी घेऊन या ! मला कांहीं हें चांगलें चिन्ह दिसत नाहीं ! हा गोंधळ—गोंधळ बरें हा ! तेव्हांच म्हटलें मीं कीं दिवसगत लावूं नका ! पण माझें ऐकतें कोण ?

**अण्णा**– अग, का उगीच गोंधळ घालते आहेस ?

**यशोदा**– पाहिलेंस वेणु, आतां म्हणत होते, कीं गोंधळ घालें ! जा बाई, देवी पुढचा थोडा अंगारा तरी घेऊन ये ! जा !

**वेणु**– अग आई, अण्णांना आतां बरें वाटत आहे !

**अण्णा**– काय बरं वाटतंय ! हा गोंधळ चालला आहे तो मला बरा वाटतो आहे !

**यशोदा**– अग पोरी, जा. उगीच बोलत उभी राहूं नकोस ! अरे मधु, माधवा, तुम्हांला त्या पिलंभटाला मीं बोलवायला सांगितलें आहे ना ? मग असे तोंडाकडे काय पहात उभे राहिलां आहांत ?

**अण्णा**– ए, माझ्याकडे पहा पाहूं तूं जरा आतां ! तू काय चालविलें आहेस हें ! तुझ्या या गोंधळानें मात्र माझें डोकें ठिकाणावर राहील. असें कांहीं मला वाटत नाहीं ! आतां तूं जर बडबड केलीस किंवा त्या अंबाबाईचें नांव काढलेंस तर पहा !

**यशोदा**–(कपाळाला हात लावून मट्टदिशीं बसते.) अगबाई, तरी मला वाटलेंच होतें. आईचें नांवसुद्धां नकोसें वाटूं लागलें हें कांहीं ठीक लक्षण नाहीं ! आतां काय करूं ? ए मधु, माधवा, जा– (केंविलवाणी होते.)

**अण्णा**– कशाला ? ए मधु, माधवा—

**यशोदा**– (त्याच्या कानांत सांगते) बाबांनो, तुम्हांला आतां माझी शपथ आहे येथें थांबाल तर. अरे, त्यांची प्रकृति अशी झालेली आहे. आणि माधवा, तू हंसतो काय आहेस असा ?

**माधव**– अग आई, 'वादे वादे जायते तत्त्वबोधः' अग हा वाद म्हणजे सर्व विषयांचें मथन ! यांतून जें सार निघेल त्याचेंच एक तत्त्व तयार होईल आणि पुढें तेंच जगाच्या उपयोगी पडेल !

**मधुकर**– दादा, तूं तरी असा गोंधळ काय चालविला आहेस! तूं त्या पिलंभटाकडे जा, मी दुसऱ्या एखाद्या डॉक्टरला घेऊन येतों! तूं प्रथम चल पाहूं माझ्याबरोबर! (त्याला आपल्याबरोबर घेऊन जावयाला निघतो. अण्णा मोठमोठ्यानें मधु, माधवा म्हणून ओरडतात यशोदा त्यांना जा जा म्हणून सांगत असतें– असा कांहीं वेळ गोंधळ चालतो. नंतर दोघेहि जातात.)

**अण्णा**– आतां काय सांगूं तुला! अग मला खरोखरीच आतां बरें वाटत आहे.

**यशोदा**– एकदां बरें वाटतें आहे म्हणायचें आणि पांचच मिनिटांनीं एकदम उसळायचें!

**अण्णा**– अग आतां प्रकृति माझी चांगली आहे. पण त्याला कारण तुझी अंबाबाई नसून त्या पिलंभटानें आज सकाळीं हिमालयांतील एका महान भिषग्वर्याचें औषध आणून दिलें; त्याचा हा परिणाम आहे, समजलीस? आणि हेंच मी मघांपासोन सांगणार होतों. पण माझें ऐकतें कोण? इथून तिथून सारा एकच गोंधळ!

**यशोदा**– कुणाच्या हाताला का होईना, यश मिळालें म्हणजे झालें! कुणाच्या रूपानें देवी उभी राहील कुणी सांगावें! आणि म्हणूनच मीं त्या पोरीला अंगारा आणायला पाठविली. मीं आज सकाळीं त्या पिलंभटाचा देव खेळविला.

**अण्णा**– अग तुझें हे देव खेळविणें पुरे कर पाहुं आतां. असे खेळखंडोबा करून रोग का कुठें बरें व्हायचे असतात? हे अंगारे, धुपारे– (वेणु अंगारा आणते)

**यशोदा**– (तिच्या हातांतून अंगारा घेऊन त्यांच्या कपाळाला लावते व चोहींकडे फुंकते.)

**अण्णा**– का ग, तूं देवाला असें पोरासारखें ग कां खेळवीत असतेस? इतकीं वर्षें मी आपलें रोज ऐकतों आहें, आज अमक्याचा देव खेळविला, उद्यां तमक्याचा देव खेळविला, आज अमक्यानें अंगारा दिला, उद्यां तमक्यानें मंतरलेला ताईत दिला. अशी एक ना दोन! त्या देवाचें हे असें खेळणें करून तूं या वयांत जो हा पोरखेळ चालविला आहेस, त्याला तुला आतां काय म्हणावें तेंच समजत नाहीं. बरें, मी नशीब समजतों कीं तुला लिहावयाला वाचावयाला येत नाहीं. नाही तर या अलीकडच्या सिद्ध मांत्रिकांच्या आणि ताईतांच्या जाहिरातींनी आमचें घर म्हणजे एक मोफत वाचनालय तूं बनविलें असतेंस, आणि ताइतांच्या तोडग्यांनीं आपल्या घराला धर्मशाळेची कळा आणली असतीस!

**यशोदा**– वेणु, पाहिलास मघांच्या बोलण्याला आणि आतांच्या बोलण्याला कांहीं तरी मेळ ! हा सारा त्या पिलंभटाच्या अंगाऱ्याचा प्रभाव बरें ! खरेंच सांगतें, असें बोलूं नये. त्या पिलंभटाचे गुरु आतां आले आहेत येथें. त्यांनीं आज सकाळीं हा अंगारा देऊन मला कितीतरी चांगल्या गोष्टी सांगितल्या ! हो—त्यानें आणखीं आपल्या गुरूच्या पडताळ्याची एक गोष्ट सांगितली आहे. तिचा जर आपल्याला प्रत्यय आला म्हणजे मग तरी आपण माझ्या या देवीवर विश्वास ठेवाल ना ?

**अण्णा**– म्हणजे त्या पिलंभटाच्या गुरूकडून का आलेला हा अंगारा आहे ? अग, त्यांचेंच तर औषध मीं आज सकाळपासून सुरू केलें आहे. त्याच्या त्या हिमालयांतील वनस्पतींनी तर माझ्या प्रकृतींत हा एकदम आज हा असा फरक पडला आहे. नाहीं तर अशा प्लेगासारख्या भयंकर रोगानें पछाडलेला रोगी कधी जगायची आशाच करायला नको !

**यशोदा**– खरें ना पण हें ? आपलासुद्धां त्यांच्यावर विश्वास आहे ना ! मग कां बरें उगाच मघांशीं त्या अंगाऱ्याला आपण नांवें ठेवलींत ?

**अण्णा**– अग पण हा गुण त्याच्या औषधांचा असेल !

**यशोदा**– त्यांनीं पडताळा पहाण्यासाठीं आणखीं असें सांगितलें आहें कीं तुमच्या मुलीचें पहिलें लग्न मोडेल आणखीं—

**अण्णा**– आणखीं काय ?

**यशोदा**– आणखी तिचा एका महाविद्वान पुरुषाशीं लग्नाचा योग आहे. आणि ही गोष्ट या चार दिवसांत घडून येईल.

**अण्णा**– आश्चर्य आहे ! बाकी त्याच्या सांगण्याप्रमाणें तो जरी विद्वान असला आणखीं त्याला वैद्यकाचीं माहिती नसली तर मी पोरीला तिथें मुळींच देणार नाही. बरें, तो माधव त्या पिलंभटाला आणायला गेला होता, तो तिकडेच रंगला वाटतें. (माधव येतो.)

**माधव**– अहाहा, काय तें तेज, काय ती मुखमंडलावरची शोभा ! अण्णा, काय सांगू तुम्हांला, आज माझा आनंद अनावर झाला !

**अण्णा**– तुझा आनंद अनावर झाला आहे, पण माझा राग आतां अनावर झाला आहें. कायरे हें, अरे, तुला त्या पिलंभटाला बोलवायला धाडलें होतं ना ?

**माधव**– अहाहा ! धन्य तो पिलंभट! धन्य तें त्याचें घर ! आणि त्रिवार धन्य

ते त्याचे सद्गुरु! अण्णा, तुमचा राग तर माझा आनंद! केवळ भेद! मऊ मेणाहुनी आम्ही विष्णुदास! वारे वा! कशाला राग, कशाला लोभ!

**यशोदा**– बाळ, तुला आनंद व्हायला झालें तरी काय? त्या पिलंभटाच्या गुरूनें कांहीं चमत्कार केलान् का?

**माधव**– चमत्कार! काय सांगूं चमत्कार! मी गेल्यावर पहातों तों त्या योगींद्राची समाधि लागलेली! त्या स्थितीतच मीं त्याच्या चरणावर मस्तक ठेवलें, तों ते एकेक सूत्रावाक्य बोलूं लागले. खरेंच आहे– परित्राणाय साधूना विनाशयच दुष्कृतां, धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगेयुगें!' काय ती गंभीर-वाणी! अण्णा, आई, आज तुमचा माधव तुम्हांला निराळा दिसत असेल. त्यांनीं माझ्या मस्तकावर हात ठेवला, तोंडावरून हात फिरविला मात्र, तों एकाएकीं मी हें जग सोडून–

**यशोदा**– काय झालें बाळ?

**अण्णा**– काय झालें माधव? तूं एकाएकीं असा गहिंवरून कां आलास?

**माधव**– अहाहा! तें चिन्मय स्वरूप, तो आनंद, तें ध्यान, 'ब्रह्मानंदी लागली टाळी, कोण देहातें सांभाळी, तेथें कोण देहातें सांभाळी.' ज्यावेळीं चिकित्सक बुद्धि नष्ट पावून, जिज्ञासा जिथें संपते तिथेंच असे उद्गार बाहेर पडतात! 'कोण देहातें सांभाळी, तेथें कोण देहातें सांभाळी.' (जोरानें टाळ्या पिटूं लागतो. अण्णा गोंधळांत पडतात. कांहीं वेळानें अंथरुणावर जाऊन रडतात.)

**यशोदा**– अगबाई! पुन्हां असें कशानें झालें? अरे माधवा, जा बाबा त्या गुरू महाराजांना तरी इकडे घेऊन ये!

**माधव**-- इकडे तिकडे हा भेदच आतां राहिला नाहीं! अहाहा, काय ती मूर्ति! काय ते रूप! काय तें चेहऱ्यावरचें तेज! अहं ब्रह्मास्मि (ध्यान लावतो.)

**यशोदा**-- अगबाई, आतां करूं तरी काय? हे इकडे निपचित, याची इकडे समाधि. अग वेणु, यमु, अग कुणी तरी इकडे या! (त्या दोघी येतात.) बाई, जा तो अंगारा तरी घेऊन ये. आणि तो मधु कुणीकडे गेला? त्या पिलंभटाकडे कुणाला तरी धाड पाहूं! (पिलंभट येतो.)

**पिलंभट**-- धाडतां कशाला बाईसाहेब, माझ्या गुरुमहाराजांनी अंतर्ज्ञानानें हें सर्व ताडलें आहे. आतां इतक्यांत ते इकडे येतील. मधुकरहि त्याचेबरोबर आहेत! श्री मारुतीला तुम्हीं अकरा अभिषेकांचा नवस बोला. इतक्यांत गुण!

**यशोदा**--[ देवाला नमस्कार करून मनांत कांहीं पुटपुटते व पुन्हां नमस्कार करते. ] [ मधुकर बैरागी वेषात वसंताला घेऊन येतो. ]

( भजन )

**वसंत**--

भजन बिना एक जल गयो जिवना ॥ धृ०॥ पर्वत सुना
एक विरछ सुना, बिरछ सुना एक पात विना ॥ १ ॥

**माधव** -- अहाहा, हे चित्स्वरूप, महत्मंगल मायावतारी--

**वसंत**-- [ माधवाचे मस्तकावर हात ठेवून त्यास ] सावध हो बाळा, सावध हो. अशी वारंवार समाधि लावून त्या चित्शक्तीला वारंवार त्रास कां देतोस? अशानें वारंवार दर्शन दुर्लभ होईल. [ सर्व मंडळी त्याच्या पायांवर डोकें ठेवतात. माधव सावध होऊन त्याचे पाय धरतो.]

**माधव**-- गुरुमहाराज--

**पिलंभट**-- माधवराव, थोडे थांबा. अगोदर अण्णासाहेबांच्या प्रकृतीकडे आपल्याला लक्ष पोंचविलें पाहिजें. [ त्याला अण्णांच्या पलंगाजवळ नेतात. तो त्यांची नाडी पाहून थोडे दूध आणावयाला सांगतो. दूध घेतल्यावर ते सावध होतात.]

**अण्णा**– स्वामीमहाराज– [असें म्हणून उठावयाला लागतात. माधव, मधु, पिलंभट भक्तजनांसारखे आ पसरून बसतात.]

**वसंत**– महाराज, आपल्याला क्षीणता आलेली आहे. आपण ही तसदी घेऊं नका ! रोगाचें असें आहे की, त्याला नेहमी विश्रांतीची आवश्यकता असते. त्याला उगीच छेडणे चांगलें नाहीं. बरें, सकाळी दिलेलें औषध याना किती वेळां दिलेंत ?

**यशोदा**– चार वेळां. [तो परीक्षेला सुरुवात करतो ]

**अण्णा**– त्याच्यापासून मला थोडें घेरी आल्यासारखे वाटतें !

**पिलंभट**– योजनाच तशी आहे !

**अण्णा**– ओकारी होईल असें वाटतें !

**पिलंभट**-- योजनाच तशी आहे !

**यशोदा**– घटकेंत घाम येतो, तर घटकेंत थंडी वाजल्यासारखे होतें !

**पिलंभट**– खरें ना पण ? योजनाच तशी आहे !

**यशोदा**– मध्येंच भ्रम झाल्यासारखे करतात !

**वसंत**– सांग योजनाच तशी आहे म्हणून !

**अण्णा**– एकदां खूप मोठ्यानें ओरडावेंसें वाटतें !

**पिलंभट**– योजनाच तशी आहे !

**अण्णा**– घटकेंत अगदी शांत पडावेंसें वाटतें !

**वसंत**– योजनाच तशी आहे.

**मधुकर**– अशी योजना करण्याचें कारण काय गुरुमहाराज ? (हंसतो.)

**वसंत**– त्याचें कारण असें कीं, उष्ण आणि शांत असे दोन प्रकार नेहमीं प्रकृतीत असतात, त्यांपैकीं एकाला कधी छेडूं नये, एकदा याला, एकदां त्याला असें दोघांनाहि छेडून प्रकृतीला आपल्या ताब्यांत आणायची आणि मग ज्याच्यावर स्वार व्हायचें असेल त्याच्यावर योजना करायची म्हणजे दुसऱ्याचा कांहीं अंमल चालत नाहीं.

**अण्णा**– अहाहा, काय हें ज्ञान, काय ही योजना, काय ही चिकित्सा !

**वसंत**– असें पहा, तुम्ही निसर्गाला सोडून नेहमीं वर्तन करतां. त्यामुळें अशा रोगांना थारा मिळतो ! दिवस, रात्र, उन्हाळा, थंडी, आग, पाणी, स्त्री, पुरुष या योजनाच मुळीं निसर्गसिद्ध आहेत, परंतु तुमचें वर्तन मात्र नेहमीं नियमबाह्य. आतां याच माधवरावाचें उदाहरण पहा, हा तरुण पुरुष, स्त्रीला सोडून– जाऊं द्या, एकंदरींत काय कीं निसर्गाच्या विरुद्ध वर्तन कधीं करूं नये. निसर्गाला नेहमीं प्रसन्न ठेवलें पाहिजे. (सर्व भक्तिभावानें डोलतात.)

**मधुकर**– पण गुरुमहाराज, आपण तर आजपर्यंत कडकडीत ब्रह्मचर्यांत–

**पिलंभट**– (मधुकराला दाबतो.) अहां मधुकर–

**वसंत**– अरे थांब पिलंभट; अहो मधुकर, आम्ही पण कांहीं दिवसांनीं या आश्रमाचा त्याग करून तुमच्या आश्रमांत येणार आहों. कारण आम्हांला तशी आज्ञा आहे. ज्याच्या आज्ञेनें आमचा जन्म झाला, ज्याच्या आज्ञेनें आम्ही आजपर्यंत या ज्ञानपर्वतावर आरूढ झालों, त्याच्याच आज्ञेनें या जगाच्या रहाटीकडे लक्ष देऊन आम्हांला वर्तन केलें पाहिजे.

**माधव**– योग्यच आहे. " यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः "

**वसंत**– मग तुमचें वर्तन असें कां ? राहूं द्या आतां हा विषय ! महाराज, आज मी आपल्या प्रकृतीचें निदान करून एक वनस्पति देतों तिचें तीन वेळां पोटांत सेवन करा व पायाला लावण्याला एका वेलीचा रस देतों तो लावा. उद्यां सकाळीं आपली कांहीं तक्रार रहाणार नाहीं. पिलंभट, मातोश्रींना तो अंगारा देऊन तो अष्ट दिशांनीं नीट फुंकरायला सांग. (अण्णा मधुकराच्या कानांत कांही सांगतात. मधुकर तबकातून कांहीं रुपये आणून त्यांचेपुढें ठेवतो. वसंत तिकडे पहातसुद्धां नाहीं )

**माधव**– मी दर्शनासाठीं केव्हां येऊं ?

**वसंत**– तुम्हीं स्नान करून शुचिर्भूत अंतःकरणानें आज सायंकाळीं आमचेकडे या म्हणजे तुमच्या सर्व प्रश्नांचा आम्ही उलगडा करूं. (सर्वजण पायांवर डोकीं ठेवतात.)

**पिलंभट**– महाराज, हे–(असें म्हणून रुपयांचें ताट त्याच्यापुढें करतो.)

**वसंत**– (उसळून) अरे, तूं इतके दिवस आमच्या संगतींत घालवून पुन्हां आम्हांला या मोहांत फसविण्याचा प्रयत्न करतोस ! ते तूं घे, नाहींतर तिकडे टाकून दे. आम्हांला काय करायचें आहे ! (पिलंभट खूष होतो. 'जय-गुरु महाराज की जय ' म्हणून सर्वजण ओरडतात. वसंत पूर्ववत् भजन करीत जातो.)

[पडदा पडतो.]

## प्रवेश चौथा

**तात्या**– बरें का देशपांडे, रघुनाथानें ऐनवेळीं पुढें बोलावल्याबरोबर पुढें व्हायचें आणि बाळाभाऊनें फॉर्म लिहिल्यास उत्तमच, नाहीं तर तुम्हीं फॉर्म लिहून त्यावर त्याची सही घ्यायची ! आतां कांहीं वेळानें ते हमाल तो मखंपणानें भरलेला पेटारा घेऊन येतील. सावध रहा ! सहीची मात्र सावधगिरी ठेवा आं !

**देशपांडे**– सही का आंगठा ?

**तात्या**– उत्पन्न कमी झालें म्हणजे मालक दाखवितील– माझी आई, मी सांगतों तें एका ! या कोटच्या कांहीं वेळ ठेवा बाजूला आणि शहाणपणानें काम पार पाडा !

**देशपांडे**– पार कीं चबुतरा ?

**तात्या**– अरे गृहस्था, आपल्या मंडळींत कुणाला इंग्रजी येत नाहीं म्हणून मुद्दाम तुम्हांला बरोबर घेतलें, पण तुम्ही आपल्या या कोटचाची तलवार चालवून ऐनवेळीं माझा गळा उतरणार असें मला आता वाटूं लागलें आहे.

**देशपांडे**– नाहीं, नाहीं. तात्या, गळा की जानवें रे ?

**तात्या**– अहो, कांही वेळ तरी या कोटचांना खळ पडूं द्या!

**देशपांडे**– खळ की सरस ?

**तात्या**– तुम्ही कुणाचाहि सहज कराल विरस ! काय त्रासदायक गृहस्थ आहांत ! अहो थांबा, तो पेटारा आला वाटतें बाळाभाऊ इतक्यांत येईल. थोडा वेळ तरी तुमच्या विटा बंद ठेवा आणि सीरियसली कामाला लागा !

**देशपांडे**– विटा की दगड !

**तात्या**– (त्याच्या पाठीवर हात टाकून) आतां निराळा कशाला ! अहो कोटचाधीश, तुम्हांला हात जोडतों

**देशपांडे**– ए तात्या, थांब जरा, कोटचाधीश कीं गोटचाधीश?

**तात्या**– देशपांडे, आतां हे तुमचे पाय धरतों, आणि विनंति करतों कीं सांगतों तेवढें काम व्यवस्थित करा. नाहींतर लोकांची थट्टा करतांना माझी थट्टा होऊन शिवाय जगांत तोंड दाखवायला जागा रहाणार नाहीं.

**देशपांडे**– (स्वगत) जागा कीं निजलेला ?

**तात्या**– तिकडे तोंड करून कांहीं पुटपुटलांतच ! काय हा कोटचांचा मोह !

**देशपांडे**– मोह की माया ?

**तात्या**– असे वारंवार उचंबळून काय येत आहांत ? आणखीहि एक भीति वाटते कीं, ते दोघे बोलण्याच्या भरांत आले, आणि तुम्हांला एखादी कोटी आठवली म्हणजे याल एकदम उचंबळून आणि सर्व कारस्थान कराल

उघड ! (देशपांडे कोटी करावयास पहातो. तात्या त्याचें तोंड दाबतो.) गप, अगदीं गप ! गिळा ती कोटी आंतल्या आंत. मला काय होतें आहे तें तरी पहायचें आहे ! मी तिथें जवळच आहें. आलीच ती स्वारी. अगदीं कोटीची उसळीच आली तर तिथें माझ्या कानांत येऊन सांगा. पण उघडपणें तेवढी तार लिहून हातीं येईपर्यंत तरी खुलून येऊं नका. (त्याला दाबतो.) आला चेहरा खुलून ! पण नका ! नका करूं ती कोटी. जाऊं द्या वायां. टाका गिळून. हं चला व्हा पुढें, लागा कामाला, चला. (पडद्यांतून " बधिन स्वप्नीं जरी तिला " असें गाणें ऐकूं येतें.) तो आला बघा आपला हीरो ! चला व्हा चालते इथून या (बाळाभाऊ डोळे झांकून येतो.) या तुम्ही—आं, स्वारी कोणत्या नाटकांतल्या कोणत्या अंकांतल्या कोणत्या प्रवेशांत आहे बरें ?

**बाळाभाऊ**– बधिन स्वप्नीं जरी तिला, नये झोंप मुळीं मला ! अहाहा, भगवान कामदेवा हे भगवती महाश्वेते पावन करि हा स्कंद देश तुज वाहुनि नेतों सखये.

**तात्या**–(स्वगत) शापसंभ्रमांतील सहाव्या अंकांतील वैशंपायनाचा प्रवेश चालला आहे. ठीक आहे. आतां भरतवाक्य म्हणायची वेळ अगदीं जवळ आल्यासारखी वाटते.

**बाळाभाऊ**– (तेच चरण दोनदोनदां म्हणतो.) पुढें काय बरें... (आठवतो.)

**तात्या**– (पाठीमागून येऊन हळूच) हे चतुष्पाद प्राण्या, पुढचे चरण प्राम्टींग करूं का ?

**बाळाभाऊ**– प्राम्टींग कशाला ? आतां नोकरापासून तो मालकापर्यंत सर्वांना आपापल्या नकला पाठ असाव्या लागतात. ती प्राम्टींगवर कामें करण्याची जुनी चाल आतां बदललेली आहे.

**तात्या**– अहो अलीकडे तुम्ही तर पदांच्यासुद्धां चाली बदलल्या आहेत. आतां हा वैशंपायन कोणत्या कांटेरी वेलीला जाऊन आलिंगन देऊन सावध होणार कांहीं कळत नाहीं. हां, ही कोपऱ्यावरची पोष्टाची पेटी ठीक आहे. (त्याचा पाठीमागून हात धरून त्याला पेटीजवळ नेतो.)

**बाळाभाऊ**– वायां दवडिसी काल कां असा !

**तात्या**– (त्याला जागें करून) बाळाभाऊ, येथें भगवती महाश्वेताहि नाहीं, तुम्हांला त्या सुखस्वप्नांतून जागृत करणारी कांटेरी वेलहि नाहीं, इथें ही पोष्टाची पेटी आहे.

**बाळाभाऊ**– (पाहून तोंडाची पोष्टाची पेटी करून आश्चर्यानें) तात्या, असें कसें रे झालें ?

**तात्या**– तें त्या भगवान कामदेवाला विचारा.

**बाळाभाऊ**– तात्या, तूंच माझा कामदेव–

**तात्या**– आं ! बाळाभाऊ, तुम्हांला वेडबीड तर लागलें नाहीं ना ?

**बाळाभाऊ**– आतां काय बाकी आहे ? तात्या, खरेंच सांग, तिची माझी भेट केव्हां होणार रे ? पळघडी घडी दिन वाटतसे. किंवा असें म्हण पाहिजे तर पाहून घेईन एकवार मी माझी प्राण–

**तात्या**– भय्या, आतां अगदीं घटका भरत आली आहे. थोडी कळ काढा !

**बाळाभाऊ**– कळ काढा कशी ? अरे दोस्त, आतां अगदीं अशक्य झालें आहे. मन किती उताविळ घेत–

**तात्या**– अहो बाळाभाऊ, हीं दुसऱ्या नाटकांतील पदें म्हणण्यापेक्षां तुम्ही बोलतां बोलतां तुमच्या त्या प्रियसुंदरीला, त्या सरोजिनीला तुमच्याच वैद्यक नाटकांतील चारदोन पदें ऐकवा ना ! तिला काव्याचीहि थोडी गोडी असल्यामुळें ती अगदीं गारीगार होऊन जाईल तुमचीं पदें ऐकून !

**बाळाभाऊ**– अरे मित्रा, ही योजना मा मघांशीं त्या पेटाऱ्यांतच करून ठेविली आहे. अरे, त्या शिवाजीराजानें त्या औरंगजेबाच्या हातावर तुरी देण्यासाठीं जशी सारी योजना त्यानें त्या पेटाऱ्यांतून जाताना केली त्याप्रमाणें मीहि मघांशीं पेटाऱ्यांतून येतांना तिला वश करणाऱ्या कितीतरी युक्त्या शोधून ठेवल्या आहेत

**तात्या**– खरेंच, युक्त्यांचा भरणा अगदीं जय्यद तयार ठेव. सकाळीं नाटकें सिनेमाप्रमाणें डोळ्यांसमोर नाचलीं पाहिजेत, नाहींतर त्या शिवाजीनें औरंगजेबाच्या हातावर जशा तुरी दिल्या तसे तुम्हांला मूग गिळून बसायची वेळ यायची. बरें पण यार, तुम्ही या काव्याच्या मिशा काढल्यांत अशी जर दाढी काढली असतीन तर सोंग जरा उचलून दिसलें असतें.

**बाळाभाऊ**– अरे, तुझ्या त्या रंगपट आणि कपडेपट मास्तरनें तात्यांनीं आम्हांला एवढेंच द्यायला सांगितलें आहे, असें सांगितल्यामुळें माझा अगदीं नाइलाज झाला. नाहींतर दोस्त, एवढे सोंग सजविल्यावर मी तेवढी खुलावट करायला कसा विसरलों असतों ?

**तात्या**– बाळाभाऊ, झालें तें ठीकच झालें ! नाहींतर पिऊनि हें अधरामृत तें सखयेच्या ठिकाणीं उगीच या दाढीमिशांनीं घोटाळा केला असता हो, ऐनवेळीं गळून पडल्या असत्या तर ? जें कांहीं झालें तें उत्तमच झालें. बरें आतां एकदां हीरोसारखे नीट उभे रहा पाहूं ! हां, ठीक आहे. (कांहीं साफसुफी व डागडुजी करतो) हं, कोणतें पद म्हणायचें तें म्हणा. हेंच तुमचें ते पवित्र प्रेममंदिर.

**बाळाभाऊ**–(आनंदानें)अहाहा, या मंदिराला सरोजिनीविलासमंदिर हें नांव किती तरी उत्तम शोभतें आहे. अहाहा, येथें माझ्या येण्यासाठींच की काय ही गडबड उडाली आहे. (एकदम आठवल्यासारखें करून) तात्या, माझ्या नाटकांत असाच एक प्रसंग आला आहे.

**तात्या**– कुणावर ? तुमच्यावर, कीं त्या नायिकेवर, की त्या बिचाऱ्या

प्रेक्षकांवर ?

**बाळाभाऊ**– दोस्त, अशा प्रसंगींसुद्धां थट्टा करतोस ?

**तात्या**– हो खरेंच कीं ! माझ्या लक्षांतच नव्हतें, तुमच्या नाटकांत आजारीपणांत, शोकाच्या प्रसंगांत, मृत्यूच्या प्रसंगीं थट्टा केलेली असेल !

**बाळाभाऊ**– अरे तात्या, तसें नव्हे, पण माझ्या नाटकांत नायिका मदनतापानें आजारी पडली आहे, त्याच्यावर नायकानें उपाययोजना केली आहे आणि नंतर पुढें तिला बरें वाटूं लागल्यावर नायक तेथें गेला आहे तिथलें हें पद आहे तेंच म्हणतों–

पद :– (चाल– परम सुवासिक.)

सकल गुणावह औषधी कोणी। सौकर्यें ठेविली भारी ।। यशस्वी तैलें वातहारकही। ठेविति तिच्या शेजारीं ।। खिडक्यांचीं कागदांचीं दारें। (तात्या, त्या खिडक्यांच्या कांचा फुटलेल्या असल्यामुळे अगदी नॅचरल वर्णन केलें आहे बरें.) मधुनि मधुनि कुणि बंद करी ।। (कारण वारा फार जोराचा होता व खिडक्यांना बोलट नव्हते.) उष्णही पाणी थंड करोनी। ठेविलें सखिच्या शेजारीं ।। नानापरीचे काढे निकाढे। शिशामधुनि हो कोणी भरी ।। कपाळशुळा लेप कराया। सुंठ वाटिति गंधापरी ।। (तात्या, इथें मात्रादोष अगदी अपरिहार्य आहे.)

**तात्या**– खरें म्हणाल तर तुम्ही वैद्यकविराज असल्यामुळें तुमच्या मात्रावर मात्र त्रैलोक्यचिंतामणीचीसुद्धा मात्रा चालण्यासारखी नाहीं हेंच खरें.

**बाळाभाऊ**– पथ्या कुपथ्या संभाळाया। सर्व सिद्धता परोपरी ।।
वाटे रुग्णालय हें करिलचि। वैकुंठाची बरोबरी ।।

**तात्या**– म्हणजे नायिका तिथपर्यंत जाऊन पोंचली का ? मला वाटतें, तुम्ही पूर्वीच्याच नाटकांतील पद म्हणाल तर तिला अधिक बरें वाटेल. बरें, हीरोमहाराज, आतां आपली वेळ भरली. आपण चला पाहूं आंत !

**बाळाभाऊ**– बरें तात्या, येऊं आतां ! भय्या, तुझा आशीर्वाद पाहिजे.

[ तो नमस्कार करतो. ]

**तात्या**– वा वत्सा, तुजप्रत कल्याण असो ! [ जातो. ]

**बाळाभाऊ**– हे शिवाजी छत्रपते, तुझ्या नांवाचा वेळीं अवेळीं कैक वक्त्यांनीं आणि कवींनीं वाटेल तसा उपयोग करून टाळ्या मिळविल्या आहेत; आज मीं तुझ्याप्रमाणेंच बुरडी पेटाऱ्यांतून येथपर्यंत मजल गांठली आहे व पुढची मजल मी तुझ्या पोषाखावरच गाठणार आहें, तरी गायीप्रमाणे या गरीब ब्राह्मणावर दया करून आपली गोब्राह्मणप्रतिपालक ही पदवी सार्थ कर एवढीच विनंति आहे. [ जातो. पडदा उघडतो. ]

**रघुनाथ** – (चाहूल घेऊन) स्वारी आली वाटतें ! आतां करावी पदाला सुरुवात. उगीच कां काता (तो येत नाहींसें पाहून) असें किती वेळ मला

तिष्ठत ठेवायचें ?

**बाळाभाऊ**– हें स्वगत पद आहे, आतां पुढें कसा होऊं ?

**रघुनाथ**– (आल्याशींच) माणसानें किती वेळ वाट पहावी कुणास ठाऊक !

**बाळाभाऊ**– सुंदरी असा तुझा अपराधी ! बरें आतां मौन सोडा कीं.

**रघुनाथ**– काय म्हणून ? (मधून मधून देशपांडे पुढें सरसावतो. पण तात्या त्याला दाबतो. )

**बाळाभाऊ**– काय म्हणून म्हणजे हा प्रेमाचा भिकारी तुजजवळ प्रेमाची भीक मागतो म्हणून !

**रघुनाथ**– ती भीक मजजवळ कशाला मागतां ? आणखीं कुणाजवळ– त्या वेणूजवळ मागा !

**बाळाभाऊ**– नको नको, लाडके, त्या वेणूचें नांवहि काढूं नकोस !

**रघुनाथ**– का ? बायकोचें नांव घ्यायला लाज वाटते ?

**बाळाभाऊ**– कां माझी अशी थट्टा करतेस ! सखे–

**रघुनाथ**– दुसऱ्याच्या मुलीला सखे लाडके, म्हणायला लाज नाहीं वाटत ?

[ रागावते. ]

**बाळाभाऊ**– अहाहा, अति कोपयुक्त होय परी मुखवितें मला सखे हा राग सोड आणि मजवर सदय हो ग.

**रघुनाथ**– मला मुकाट्यानें इथून जाऊंद्या कशी ! हें काय बाई, एखाद्या मुलीला उगीच अडवणं म्हणजे काय ? चला, सोडा वाट, जाऊंद्या मला !

**बाळाभाऊ**– देईन, जाऊं देईन.

**रघुनाथ**– केव्हां ?

**बाळाभाऊ**– पिऊनि अधरामृत तें सखये.

**तात्या**– (स्वगत) शाबास पठ्ठे !

**रघुनाथ**– (स्वगत) स्वारी आतां अगदीं बेतावर आली आहे. आतां करावी सुरुवात (उघड) चला. चालतं होता कीं नाहीं मुकाट्यानें इथून, का करूं आरडाओरडा ?

**बाळाभाऊ**– करूं का त्या लोकप्रिय पदाला वन्समोर ? सुंदरी, तुजविण गमे वृथा संसार–

**रघुनाथ**- हे खरें ?

**बाळाभाऊ**– अगदीं खरं ! तुझ्यासाठीं काय करूं तें सांग–

**रघुनाथ**– त्या वेणूला प्रथम सोडून द्या !

**बाळाभाऊ**– तिला मीं केव्हांच सोडली आहे !

**रघुनाथ**– तिची वडील माणसें पण अद्याप आपल्याच विश्वासावर आहेत.

**बाळाभाऊ**– मग त्यासाठीं मी काय करूं तें सांग. मतंगजाचो धुंदी हरुनी—

**रघुनाथ**– त्याना आताच्या आतां तुमच्या मुलीशीं मला लग्न कर्तव्य नाहीं

म्हणून एक पत्र लिहा आणि तशाच अर्थाची एक तार करा !

**बाळाभाऊ**– हें सगळें करतों पण—

**रघुनाथ**– अडखळूं नका. काय तें स्पष्ट बोला !

**बाळाभाऊ**– तसेंच तूं मला एक आपल्या लग्नाचें निश्चित ठरल्याचें लिहून दे.

**रघुनाथ**– मी तुम्हांला एक प्रणयपत्र देतें म्हणजे झालें.

**बाळाभाऊ**– हो ! मग कांहीं हरकत नाहीं. (स्वगत) हो, मीहि पण पक्क्याच गुरूचा चेला आहें.

**रघुनाथ**– (त्याच्यापुढें लिहावयाचें सामान आणून ठेवतो व आपणहि लिहावयाला लागल्याचें निमिष करतो. तो लिहूं लागतो. रघुनाथ सौभद्रांतील अर्जुनाची प्रणयपत्रिका वाचतो. तो दोन कागद लिहून देतो व तार मोठ्यानें वाचतो. I dont wan't your Venu. Arrange her any-where–Balabhau. ती देशपांड्यांना हांक मारते. देशपांडे गड्याच्या वेषांत येतो. तात्यांच्या हातीं ती तार देते. बाळाभाऊ पैसे देतो. तो जातो.)

**रघुनाथ**– ही माझी प्रणयपत्रिका.

**बाळाभाऊ** - ( वाचूं लागतो. ) श्रीमत्सकल–गुणैश्वर्यमंडित मत्प्राणवल्लभ बाळाभाऊ यांच्या चरणकमलीं ही गीतिद्वारा विज्ञापना. सखे या हतभाग्याला हीं विशेषणें शोभत नाहीत !

**रघुनाथ**– तसेंच आतां दुसरें असें कीं, मी इथें बापाच्या कचाटींत आहें. तर माझी सोडवणूक करणें.

**बाळाभाऊ**– आतां तें सर्व माझ्याकडे लागलें.

**रघुनाथ**– तसेंच मला दागदागिनाहि कांहीं नाहीं व खर्चायला पैसेहिपण नाहींत.

**बाळाभाऊ**– तूं इतकी रसिक आहेस म्हणून तात्यानें वर्णन केलन् पण तूं तर सर्व प्रोजमध्यें चालविलें आहेस. असें कां ? सुरस संगीत येत असून नीरस प्रोज कशाला ?

**रघुनाथ**– आतां काय म्हणू ? मी तप्त जरी मदनशरें विनय सोडूं का ! पण मघांशीच तुम्हीं पिऊनि हें अधरामृत हें पद म्हणून टाकलें असल्यामुळें मला आतां त्याच्या पूर्वीचें पद म्हणतां येईना. आतां वाटल्यास हें म्हणतें– कधीं करिती लग्न माझें.

**बाळाभाऊ**– सखे, तूं आतां या गोष्टीची चिंता कां वाहतेस ? भूमि, जल, तेज, पवमान—

**रघुनाथ**– बहुत छळियलें नाथा व्यर्थ शिणविलें. [ देशपांडे येतो. ]

**देशपांडे**– शिवाजी महाराजांच्या स्वरूपांत असलेले विक्रांत काका, आणि सरोजिनी काकी या उभयतांच्या चरणीं हा बालक वंदन करीत आहे.

**बाळाभाऊ**– वत्सा, ये. या प्रसंगीं मला कडकडून आलिंगन दे.

[ आलिंगन देतो. ]

**देशपांडे**– अहो, हें आलिंगन कीं हा गळफांस ? [ तात्या येतो. ]
**तात्या**– परम सायासानें पत्नी मिळविलेल्या माझ्या मित्राचा विजय असो.
**देशपांडे**– विजय कीं पराजय ?
**तात्या**– (बाजूला) देशपांडे, गप बसा. आतां इतक्यांत गणपतराव हा सर्व प्रकार पहावयाला येत आहेत. थोडी तरी गंमत त्यांच्या दृष्टीस पडली पाहिजे.
**बाळाभाऊ**– तात्या, तुझ्या उपकाराची फेड कशी करूं ?
**देशपांडे**– चक्रवाढ व्याजानें करा !
**बाळाभाऊ**– बरें तात्या, हा लग्नसमारंभ उघडपणें कधीं उरकायचा ?
[ गणपतराव येतात. ]
**गणपतराव**– हा भगिनीचा कर मी तव करी विक्रांत घे दिधला !
**बाळाभाऊ**– अत्यादरपूर्वक मी त्याचा स्वीकार पहा केला !
**तात्या**– नांदा सौख्यभरें.
**देशपांडे**– शोभो कुलतव सत्वकुमरें. (बाळाभाऊ व गणपतरावाकडे पाहून. )
**बाळाभाऊ** –(आश्चर्यानें) अरे, हे तर गणपतराव–
**गणपतराव**– अहो मग हें कोण आहे ?
**देशपांडे**– अहो, ही त्यांची सरोजिनी
**बाळाभाऊ** - होय गणपतराव, या माझ्या प्रियमित्र तात्याच्या परिश्रमानें मिळविलेली ही माझी प्रियसखी—
**गणपतराव**– बाळाभाऊ, ( रघुनाथाच्या डोक्यावरचा पदर काढतो. ) ही तुमची लाडकी सरोजिनी.
**बाळाभाऊ** - म्हणजे हा तर रघुनाथ–
**देशपांडे**– अहो आतां तो सनाथ तुम्ही अनाथ ! आणि म्हणूच आम्ही तुमचे दिनानाथ !
**बाळाभाऊ**– म्हणजे तात्या, सरोजनी—
**तात्या**– आतां तुम्ही मूकनायक !
**बाळाभाऊ**– आहे काय प्रकार हा ?
**गणपतराव**– बाळाभाऊ, हा एका नाटकाचा शेवट. नाटकांत होणारे सर्व प्रकार यांत झाले. कोरस झाल्यानंतर जशी सुभद्रा सुभद्रा रहात नाहीं, व अर्जुन अर्जुन असत नाहीं तसेंच यातहि झालें. बाळाभाऊ, या नाटकाच्या नादामुळें तुमच्या आयुष्याचेंहि हें प्रहसनाच्याऐवजीं एक नाटक झालें त्याबद्दल आतां खेद करूं नका ! आणि नाटकाचा नाद नाटकापुरताच राहूं द्या ! इतर व्यवहाराशी त्याचा संबंध आणू नका !
**बाळाभाऊ**– तुम्हांला सर्वांना बोलायला तोंड आहे पण मला बोलायला मात्र तोंडच नाहीं.

तात्या-- मग आतां हा प्रवेश येथेंच संपावयाचा का ?

बाळाभाऊ-- वाटल्यास तूं हा प्रवेश संपीव पण मी आपल्या आयुष्याला येथून सुरुवात करणार !

सर्वजण-- तथास्तु ! [ पडदा. ]

## प्रवेश पांचवा

वेणु-- खरेंच वहिनी, मला एकेका गोष्टीचें आश्चर्य वाटूं लागलें आहे !

यमुना-- वन्सं, आश्चर्य कसलें त्यांत ? तुम्हीसुद्धां आतां थोड्याच वेळांत एक आश्चर्याची गोष्ट होऊन बसाल.

वेणु-- काय ग वहिनी, हा माधवदादावर जो एवढा परिणाम झाला त्याला कारण काय त्या गुरुमहाराजांचें योगबलच का ग ?

यमुना-- मला नाहीं वाटत ! वन्सं, खरेंच सांगूं का आतां; बोलायची गोष्ट नाहीं, पण मला तर तो साधु अगदीं ढोंगी दिसतो ! त्यानें थोरल्या भाऊजींच्यावर आपल्या बोलण्यानें प्रथम जाळें पसरून त्यांना मोह पाडला ! अहो, सकाळीं भाऊजी त्या पिलंभटाला बोलवायला आले त्यावेळीं त्या अंधाराच्या खोलींत रमाबाईंना त्याच्या ओझरत्या दृष्टीस पडल्या व त्यांना एकदम समाधि उतरावयाला सांगून तुमच्या सर्व प्रश्नांचा रात्रीं उलगडा करतो असें त्यानें सांगितलें. झालें, सकाळीं ज्या ओझरत्या बाई भाऊजींच्या दृष्टीस पडल्या त्याचा त्या भोंदू साधूनें तुम्हांला देवीचा साक्षात्कार झाला आहे, आतां मी सांगतों त्या मार्गानें जा– अशी भाऊजींना आज्ञा केली ! झालें, भाऊजी काय, लागले त्यांच्या पाठोपाठ जायला.

वेणु-- पण वहिनी, तुला हें सारें सांगितलें कोणी ?

यमुना-- कुणी म्हणजे ? तिकडे पहिल्यापासूनच त्या साधूच्या ढोंगीपणाबद्दल संशय होताच.

वेणु-- त्या रुक्मिणी कृष्णापासून जरी इतिहास पाहिला तरी तुम्हां वहिनी-दासांना एकच ओळा कां ग ! मी म्हणतें, होय; तो भोंदू असेल, पण त्याच्या भोंदूपणानें दादाच्या डोक्यांतलें वेड तर गेलें हें काय थोडें झालें ? त्याला असा आपल्याशीं भोंदूपणा करण्याचें काय कारण ?

यमुना-- ( तिच्या पाठीवरून हात फिरवून ) सांगेन. सांगेन बरें वन्सं. त्या रुक्मिणीप्रमाणें मीहि ऐनवेळीं सांगेन. (पडद्यांत, ‘नारायण नारायण.’) बरें वन्सं, पिलंभट मागच्या दारीं आहेतच. मला तिकडून आतां घरीं येऊन जा म्हणून सांगणें झालें आहे. मी आतां जाऊन येतें हो !

वेणु-- आणि मी येथें एकटी नाहीं बाई रहायची !

यमुना-- तुम्ही एकट्या कशा बरें ? बाई आणि थोरले भाऊजी आहेतच.

आपल्या पिलंभटाच्या घरीं कसलें आलें आहे भय ! आम्हीहि आतां येतोंच.
[ ती जाते. पड्यांत 'नारायण, नारायण, नारायण.' ]

**वेणु**-- हा काय घोटाळा आहे ! हा गुरुमहाराज आमच्याविषयीं इतक्या काळजीनें खटपट कां करतो ? बरें, मधुदादा आणि आमची वहिनी त्याला एकीकडून भोंदू समजतात व एकीकडे माधवदादाच्या आणि रमावहिनीच्या भेटीला कारण त्यालाच होऊं देतात, व आपण लांब रहातात. आणि सगळ्यांत आश्चर्याची गोष्ट ज्या माधवदादानें आज आठ वर्षांत रमावहिनींचें तोंडहि पाहिलें नव्हतें तोच तिच्या दर्शनाला उत्सुक ! ( पड्यांत 'नारायण, नारायण' ) या कादंबरीकारांनीं आणि नाटककारांनीं तर एकेक रामायण असें रचून ठेवलें आहे कीं आमच्यासारख्या कुमारिकांना प्रत्येक क्षणीं काय करावें याची पंचाईत पडावी. हे सर्व मेले एखाद्या कुमारिकेच्या जिवावर उठून खुशाल वाटेल तशीं पानेंच्या पानें खरडून काढतात. देवा लक्ष्मी नारायणा—

( पद–राग– कानडी, ताल– त्रिवट. )

कृष्णनाथ ! जीवा नुलंघवे । संभ्रमाब्धी हा बुद्धो चले ॥ धृ० ॥
वेणू नादवोनि, जगा गुंगवोनि, गाऊनि गीता, गीता तेंच सांगा ॥१॥
नाथ नाथ ॥०॥ (पड्यांत 'नारायण, नारायण.' वसंत बाहेर येतो.)

**वसंत**-- कां, काय चाललें आहे ? आणि आमच्या दुसऱ्या भगिनी कुठें गेल्या? नारायण, नारायण !

**वेणु**-- (स्वगत) आतां यांच्याशीं बोलूं का नको ? बोलावेंच. अशा परोपकारी पुरुषाशीं; त्यांतून विरक्त पुरुषाशीं बोलायला काय हरकत आहे ?

**वसंत**-- आमच्यासारख्यांशीं आपल्याला बोलायची शंका आल्यासारखी दिसते. ठीक आहे. ( तो जाऊं लागतो. )

**वेणु**– नाहीं, तसें नाहीं पण–

**वसंत**– पण काय ? कसली शंका आली तें स्पष्ट विचारा !

**वेणु**– शंका नाहीं ! अपरिचित माणसांशीं बोलतांना आमच्यासारख्या कुमारिकांना थोडा विचार करावा लागतो.

**वसंत**– आमच्यासारख्यांना सर्वच परिचित व सर्वच अपरिचित. नारायण, नारायण ! आमच्या आश्रमांत आम्हांला असा भेदभाव ठेवतां येत नाही! तुमच्या वहिनीचा किंवा दादांचा कधी परिचय होता ! परंतु जगाच्या कल्याणासाठीं, तुमच्या कल्याणासाठीं आम्हांला अशा ओळखी करून घ्याव्या लागतात. आणि इतकें प्राणिमात्राशीं तदाकार झाल्यांवाचून आज तुमच्या बंधूची आणि तुमच्या वहिनीची ओळख आम्हांला त्यांना परस्परांना पटवून देतांच आली नसती !

**वेणु**– या सर्व गोष्टी आपण योगबलानें करतां ?

**वसंत**– होय. या गोष्टी आम्ही योगबलानेंच करतों. बरें, आतां एक आपल्याला योगसामर्थ्याचा चमत्कार दाखवितों. सध्यां ऋतु कोणता आहे ?

**वेणु**– हेमंत.

**वसंत**– खोटें ! नारायण ! तुमच्या मनांत ऋतु कोणता आहे ?

**वेणु**– हा काय बाई प्रश्न ! मनांत आणखीं बाहेर असे दोन निरनिराळे का ऋतु असतात ?

**वसंत**– हा प्रश्न जो आश्चर्यानें मलाच विचारलांत तोच आंतल्या आनंदित मनानें आपल्याशींच सोडवून पहा बरें जरा !

**वेणु**– हें काय बाई वागणें.

**वसंत**– गोंधळून जाऊं नका ! बाईसाहेब, आपलें ऋतुमान आतां बदललेलें आहे. मी सांगतों आपल्या मनांतील ऋतूचें नांव ! सांगूं ? बाईसाहेब, आपला आतां वसंत ऋतु चालला आहे. खरें आहे ना हें ?

**वेणु**– हें काय हें. हेमंत ऋतूला उगीच भलतांच ऋतु आहे असें मी कसें कबूल करणार ?

**वसंत**– बाईसाहेब, आपल्या आंतल्या मनानें तें कबूलहि केलें आहे. आपल्या पंचेंद्रियांना, आपल्या पंचांगांना वसंतावांचून आतां दुसरा आवडता ऋतूच नाहीं. आणि आपली ही पंचांगकमेटी पूर्वीचें ऋतुमान नाकबूल करून एका वसंत ऋतूलाच आपली संमती देईल. आपल्या पंचांगकमेटीचा हा निकाल आपल्याला आतां मान्य केलाच पाहिजे.

( **पद–राग**– देस. **ताल**– त्रिवट. )

सुंदर सुखद आहे हा, करि अति प्रियकर, हो मम मन सुखकारी,
वसंत पसरि सुगंध हा ।। धृ० ।। निजचापा, स्मरचापा, योजुनि का
हा करी त्याच करीं या तव शरिरीं शोभा सारी, खुलवि भुलवि
पहा हा ।। १ ।।

( पड्यांतून पिलंभट ' वसंत, वसंत ')

**वेणु**– वसंत, वसंत !

**वसंत**– होय बाईसाहेब, आपल्याला वसंतावांचून आतां दुसरें कांहीं ऐकायलाहि येणार नाहीं, आणि वसंतावांचून दुसरें कांहीं दिसणारहिपण नाहीं. आतां चोंहीकडे वसंत. ( पिलंभट आंतून येतो. वेणू लाजते. )

**पिलंभट**– वसंत, अहो वसंत.

**वसंत**– काय पिलंभट, इतक्या घाईघाईनेंसें आलांत !

**पिलंभट**– तसें कांहीं काम नाहीं गुरुमहाराज.

**वेणु**– हें काय, एकदां गुरुमहाराज आणि दुसऱ्यानें–

पिलंभट– मी मध्येंच आल्याबद्दल महाराजांची क्षमा मागतों.

वसंत– त्यांत क्षमा मागण्याचें कारण नाहीं. आम्ही माधवराव व रमावहिनी यांचें जे सख्य केलें तें आम्ही आपल्या योगसामर्थ्यावरच केलें किंवा कसें असा यांनी प्रश्न केला ! तेव्हां म्हटलें यांनाहि कांहीं चमत्कार दाखवावा.

पिलंभट– छे : छे : ! वेणुताई, महाराजांचे चमत्काराबद्दल यत्किंचितसुद्धां संशय घेऊं नका बरें ! तसे महाराज फारच चमत्कारिक आहेत.

वेणु– पिलंभट, तें राहूं द्या ! तुम्ही मघाशीं कोणाच्या नांवानें हांका मारल्यात ?

पिलंभट– कुणाच्या म्हणजे ? ( तिच्याकडे व त्यांच्याकडे पाहतो. )

वेणु– पिलंभट, असें इकडे तिकडे काय पहातां ? खरें काय असेल तें झटदिशीं सांगा !

( वसंत त्याला मानेनें सांग म्हणून सांगतो. )

पिलंभट– वसंताच्या नांवानें.

वेणु– ते इथें कधीं आले ? आणि अद्याप आम्हांला कुणालाच कसें कळलें नाहीं?

वसंत– अशा कांवऱ्याबावऱ्या होऊं नका. वसंताला येथे येऊन कितीतरी काळ झाला आहे. आपल्या डोळ्यांना तो दिसला नाहीं यांत आपला अपराध नाहीं. बरें, आतां आम्ही आपल्या योगबलाचें सामर्थ्य आपल्याला दाखवितों. आपण डोळे मिटून त्रिवार आपल्या आवडत्या माणसाचा आणि देवाच्या नांवाचा नामोच्चार करा.

पिलंभट– वेणुताई, ते सांगतात तसें करा आणि मग डोळे उघडून पहा चमत्कार. ( वेणु डोळे झांकते. पिलंभट एक, दोन, तीन असें म्हणतो. वसंत खऱ्या रूपांत प्रगट होतो. ) ताईसाहेब, उघडा डोळे–

( वेणु डोळे उघडून पहाते व आश्चर्य पावते व मागाहून लाजते. )

वसंत– काय ? पटला चमत्कार ? उघडले डोळे ?

वेणु– दुसऱ्याची डोळेझांक करून भलतींसलतीं सोंगें घ्यायचीं, चमत्कार करायचे आणि मग पुन्हां दुसऱ्यालाच डोळे उघडले का म्हणून विचारायचे. मग त्या बाळाभाऊला नाटक्या म्हणून कशाला उगीच हंसायचें !

वसंत– अरे, खरेंच,– तो आपला या बाबतींतील प्रतिस्पर्धी नाहीं का ? तेव्हां आमचे दोष त्याच्याशीं तुलना करून दाखविलेच पाहिजेत. एरवीं या नाटकाला रंग कसा येणार !

पिलंभट– वसंतराव, तुमच्या त्या जुन्या नाटकांतल्या विदुषकाप्रमाणें मी आपला पिलंभट उगीच मध्यें लुडबुडतो आहें !

वसंत– अरे खरेंच, तुम्हीं मला कां हांक मारलीत तें विचारायला विसरलोंच.

पिलंभट– तुमचें प्रेमसंभाषण एकदां पुरें होऊं द्या. कारण नाटकांत त्याला अडथळा मुळींच नसतो.

**वेणु**– पिलंभट, काय हें ! भलतीच थट्टा मला नाहीं हो खपायची !
**वसंत**– कारण चांगली थट्टा इकडे बाजारांत फार स्वस्त मिळते.

( मधुकर व यमुना येतात. )

**मधुकर**– वसंत, तूं काय हा बाजार मांडला आहेस ?
**पिलंभट**– आमच्या गुरुमहाराजांनीं वेणुताईंना एक योगसामर्थ्याचा हा चमत्कार करून दाखविला !
**यमुना**– काय वन्सं ! आतां करें काय ? कृष्ण-रुक्मिणीचे दाखले देतां का ?
**वेणु**– वहिनी, पायां पडूं का आतां तुझ्या !
**यमुना**– आतां इतक्यांत कशाला ? आतां एकदम लग्नांतच पडा म्हणजे झालें!
**वसंत**– बरें, तूं कां आलास आतां ?
**मधुकर**– तुला विरस – घाबरूं नकोस -- तुझ्या या आतांच्या भेटीचा विरस करायला ! चला आतां, आपण सर्वजण दादाकडे जाऊं आणि त्याला आपल्या या कटांत घेऊं ! चला, आतां विलंब करूं नका म्हणजे उद्यांचा बार कसा उडवायचा तें सर्वानुमतें ठरलेलें बरें ! चला सुभद्राताई आणि अर्जुनमहाराज, आतां अगदीं थोडा अवधि राहिला आहे.
**वसंत व वेणु** -- वा : कृष्णा ! ( वेणु व यमुना यांशिवाय सर्व जातात. )
**यमुना** -- वन्सं, तुम्हांला सर्व बाबतींत विजय मिळाला आणि माझा शब्द खरा झाला याबद्दल मला आनंद झाल्याशिवाय कसा राहील ? वन्सं --

( पद -- राग -- केदार. ताल -- त्रिवट. )

करि संसार सुखवि विजया ।। वरूनी विजया मिळवुनि विजया.
रमणिरमण मग व्हा आनंदित, नाम सार्थ हो विजया ।। ध्रु० ।।
स्मरलें वचना, -- पुरवुनि वचना ? सुटलें देऊनि करीं कर या ।। १ ।।

( पडदा पडतो. )

## प्रवेश सहावा

**मधुकर** -- काय ? पुढें मग काय करायचें ठरविलें आहे आतां ?
**पिलंभट** -- करायचें काय आहे त्यांत ? बहुतेक किल्ला आपण सर करीत आलोंच आहोंत. आतां एवढा शेवटचा वार उडवायचा आणि एकदम प्रयोजनांच्या पंक्ती ठोकायच्या !
**मधुकर** -- पण पिलंभटजी, एकेक दुवा ढकलतांना फार सावधगिरी घ्या बरें. नाहीं तर त्याचीच शृंखला होऊन आपल्या हातीं पडायची.
**पिलंभट** -- आपल्या हातीं शृंखला पडण्यापेक्षां तुमच्या कल्पनेप्रमाणें माधवरावांच्या पायांत पुन्हां रमाबाईची शृंखला पडून त्याचें सगळें सुरळीत झालें हें काय यांत थोडें झालें ? तसेंच एकदां वसंतरावांच्या पायांत वेणुताईंची शृंखला पडली कीं आपण सर्व जबाबदारींतून मुक्त झालों. अहो, आतां

एकट्या रमाबाईंचे नवसांचीं उदकें सोडायचीं म्हटलीं तर मला एक वर्ष बाकीच्या सर्व मिळकतीवर पाणी सोडावें लागेल. नंतर तात्यासाहेबांच्या ग्रहांचीं दानें, आईसाहेबांचीं देणीघेणीं निराळीं आहेतच.

**मधुकर** -- पिलंभट, तें राहूं द्या तूर्त; आपण मग त्यांची बेरीज करीत बसूं ! सध्यां आतां असें करा-- दादा आपल्या कटांत आपण घेतलाच आहे. तो आणि तुम्ही अण्णांना, तात्यांना आणि आईला असा गळ घाला कीं कांहीं झालें तरी, अण्णांना आजारांतून उठविल्याबद्दल, दादाला गुरुपदेश केल्याबद्दल, आईच्या अंगाऱ्याधुपाऱ्यांना यश दिल्याबद्दल, आपली वेणु त्यांना द्यावी. सकाळीं तात्यांच्या दृष्टीखालून पत्रिका गेली असल्यामुळें ते कांहीं नाहीं म्हणायचे नाहीत. दादा तुम्हांला भरीला भर घालायला आहेच. शिवाय आज सकाळच्या बाळाभाऊच्या तारेनें तर मजाच केली आहे. त्या नाटकांतल्या तात्याचे मात्र कसे उपकार फेडायचे एवढेंच पहायचें आहे !

**पिलंभट**– कां ? त्याची एवढी काळजी कसली ! नाहीं तरी हे ' अलीकडचे ' नाटकवाले आम्हां सत्वशील ब्राह्मणांना दरवाजांतसुद्धां उभं करीत नाहींत. तेव्हां आपण वेणुताईच्या लग्नानिमित्त त्या तात्याचा एक खास प्रयोग करावा आणि त्या दिवशीं सर्व गोब्राह्मणांना, सब्राह्मणांना, मुंज्यांना नाटकाचें अगदी मुक्तद्वार ठेवावें आणि त्याबद्दल त्याला चांगलीशी बिदागी द्या म्हणजे झालें. सर्वचजण आपल्याला आनंदानें दुवा देतील.

**मधुकर**– म्हणजे गाई– बैलसुद्धां ! मग आपण त्यांचा पांजरपोळांतच खेळ करवूं म्हणजे झालें. बरें आतां विषयांतर करूं नका. मी तुमच्या गुरुमहाराजांना घेऊन येतोंच. चला लागा कामाला.

(पद– राग-- अडाणा. ताल– झपताल.)

या करूं झडकरी भरतवाक्या अतां ।। स्वजनसंदेह जे जाऊं
विलयाप्रती ।। लाभुं आनंद तो, त्यापरी मान्यता ।।धृ०।। दाऊनी
सत्पथा करूं प्रपंचासी ह्या, नटवि या नाटका सूत्रधारा अतां ।।१।।

**पिलंभट**– पण गुरुदक्षिणेच्या वेळीं मात्र या पिलंभटाला विसरूं नका. (तो जातो.) काय गंमत आहे पहा. पूर्वी घरावर सोन्याचीं कवलेंच घालायची माझी इच्छा होती. पण आतां हातीं माती घेतली तर त्याचेंसुद्धां सोनें म्हणजे, आईसाहेबांच्या कृपेनें राखेचेंसुद्धां सोनें होऊं लागलें आहे. आणि त्यांच्या घरांतील सोन्याची मात्र राख होऊं लागली आहे. इतकेंच काय पण परवांपासून या राखेपासून उत्पन्न होणाऱ्या कमाईवर एक चांगलीशी राखसुद्धां ठेवून दिली आहे. आतां एकदां त्या बैरागी वसंताला त्या राखेच्या ढिगाऱ्यांतून बाहेर काढला म्हणजे मग त्याच्या लग्नाची तयारी आहेच. अरे, या पहा आईसाहेब आल्या वाटतें !

**यशोदा**– पिलंभट, सकाळीं तुमच्या देवानें वेणूच्या लग्नाच्या बाबतींत सांगितलेलें खरें कसें होणार? अहो मामंजीचें पत्रिकेचें जमलें पाहिजे, तिकडची वैद्यकाची खात्री झाली पाहिजे, आणि माझा तर निश्चय आहे कीं देवानें सांगितल्याप्रमाणें मुलगा आला तरच वेणूला तेथें द्यायची ! हें सगळें जमायचें कसें !

**पिलंभट**– आईसाहेब, देवाचा कौल आणि आमच्या गुरुमहाराजांचा होरा हीं कधीं चुकायचीं नाहींत. (आठवल्यासारखें करून.) आहा, आहा, आईसाहेब; माझ्या मनांत आली आहे आपली एक कल्पना ! सांगू का ? रागावणार नाहीं तुम्ही ?

**यशोदा**– सांगा पिलंभट ! तुझ्यावर कशी रागावेन ? तुम्ही भलतेंसलतें कधींच सांगणार नाहीं.

**पिलंभट**– आज सकाळीं माझ्या देवानें सांगितल्याप्रमाणें अगदीं हुबेहूब वर्णन आहे आणि आपल्या सर्व गोष्टी त्यांत सिद्धीला जाण्यायोग्या आहेत.

**यशोदा**– सांगा, सांगा पिलंभट. मग उगीच उशीर कां करतां आतां ?

**पिलंभट**– आपल्या सर्वांवर उपकार केलेले व आपणां सर्वांना माहीत असलेले आमचे गुरुमहाराज.

**यशोदा**– अगबाई, खरेंच ! पिलंभट, ही गोष्ट ते कबूल करतील का हो ?

**पिलंभट**– तें सर्व आईसाहेब, आतां आपल्या हातीं आहे! त्यांच्या पूर्वाश्रमाची हकीकत मीं परवा तुम्हां सर्वांना सांगितलीच आहे. बरें, ते गृहस्थाश्रमाचा स्वीकार करतील किंवा नाहीं याबद्दल काय ती शंका, पण परवां त्यांनीं माधवरावांशी बोलतां बोलतां सांगितलेंच आहे कीं मीहि लवकरच तुमच्या आश्रमाचा स्वीकार करणार आहें; कारण निसर्गाचे विरुद्ध मी कधींहि जाणार नाहीं. आणि याच गोष्टीची मला आतां एकाएकीं आठवण होऊन मी एकदम सुतानें स्वर्गाला गेलों. [माधव येतो.]

**माधव**–अहो पिलंभट, तुम्ही सुतानें स्वर्गाला गेलां असाल पण मला मात्र असें वाटूं लागतें कीं हें स्थळ जर आणच्या वेणूला मिळालें तर आम्हांला मात्र स्वर्ग दोन बोटें राहील. आतां तुम्हांला वाटल्यास तुम्ही स्वर्गाला जा. काय आई, तुला कसें वाटतें ?

**यशोदा**– अरे माझें म्हणणें काय असणार ! ज्यांनीं तुला पुन्हां आमच्यांत आणलें, त्यांच्या प्रकृतीला उतार पाडला— [अण्णासाहेब येतात.]

**अण्णा**– अरे माधवा, हिच्या अंबाबाईच्या अंगाऱ्यांनीं नाहीं अं मला बरें वाटलें, तर त्या सिद्धाचीं औषधें माझ्या उपयोगी पडलीं. काय रे त्याचीं तीं औषधें ! काय ती चिकित्सा ! काय एकेक वनस्पति !

**माधव**– तसेंच त्याचें योगसाधनहि अण्णा जबर आहे हो !

**अण्णा**– अरे हें उघडच दिसत आहे. ज्यानें तुला आम्हांला परत दिला त्याच्या योग्यतेबद्दल कोण शंका घेईल ? त्यांची ती शरीरयष्टि, ती कांति, तें वैद्यकाचें ज्ञान हीं पाहिलीं म्हणजे असें वाटतें, अग ऐकलें का— बरें का माधवा, परवां त्यांचें पूर्वचरित्र ऐकून तर मी अगदीं रोज देवाजवळ प्रार्थना करूं लागलों कीं? सांगूं का...

**पिलंभट**– (स्वगत) सावज आलें जाळ्याच्या तोंडाशीं. (उघड) अण्णासाहेब, त्यांच्या कांतीबद्दल आणि शरीरयष्टीबद्दल बोलूंच नका ! माधवराव तुमच्या आमच्यासारख्या चौघांना भारी आहेत बरें !

**यशोदा**-- आणि प्रत्येक भाकीत तरी किती साक्षात्काराचें !

**माधव**-- आणि अण्णा, बुद्धि आणि विद्या अगदीं हात जोडून त्यांच्यापुढें उभ्या आहेत.

**अण्णा**-- बरें मी सांगतों तें ऐकतां का? माझ्या मनांत आलें आहे कीं आपल्या वेणूला—

**पिलंभट, माधव, यशोदा**– असें स्थळ असावें.

**अण्णा**-- अगदीं बरोबर ! परवां त्यांच्या पूर्वाश्रमांतील हकीकत ऐकल्यापासून तर माझ्या या कल्पनेला अंकुर फुटला. अरे माधवा, घरचे ते म्हणे चांगले आहेत, शिवाय कुलशीलवान आहेत. घरीं बहीण-भावंडें आहेत. शिवाय हे बी. ए. झालेले. तुझ्यासारखेंच त्यांचें असेंच कायसें झालें आहे आणि ते या मार्गाला लागले. आतां त्यांचा हा प्रकार लग्नाचे पूर्वी झाला, आणि तुझें लग्न झालेलें होतें एवढाच फरक. शिवाय त्यांनीं आपल्या घरावर केलेल्या या सर्व उपकारांच्या भरतीला त्यांना आणखीं या उपकाराबद्दल जर आपण सर्वांनीं गळ घातली तर मला नाहीं वाटत ते नाहीं म्हणतील ! का हो पिलंभट, हें जमणें शक्य आहे का हो ?

**पिलंभट**– तें सर्व जमेल, पण तात्यासाहेबांचें पत्रिकेशीं जमलें पाहिजे. शिवाय मधुकर—

**अण्णा**– अहो, त्या पोराला काय कळतें आहे त्यांत ? आतां तात्यांना आपण सर्वांनींच जर गळ घालून सांगितलें तर ते मला वाटतें, एखादा ग्रह-उपग्रह शोधून काढतील आणि या लग्नाला संमति देतील.

**पिलंभट**– शिवाय काल आमचे गुरुमहाराज याहि विषयावर त्यांच्याशीं दोन घटका बोलत होते. त्या वादांत विषय लग्नाचाच होता. एखादे वेळीं नवऱ्यामुलीला जर वडील माणसांचे ग्रह नडूं लागले तर काय करायचें ! त्याला तोड कोणती ! गुरुमहाराजांनीं शेवटीं तात्यांना असें पटवून दिलें कीं, जर एखादा उग्रग्रह एखाद्या लग्नाला आडवा येत असेल तर या ग्रहाचीं ब्राह्मणांना दानें देऊन शांति केली म्हणजे झालें. [तात्या येतात.]

**तात्या**-- अरे पिलंभट, आज सकाळीं सहज कुतूहलानें तुमच्या त्या गुरुमहाराजांची जी पत्रिका मी पहावयास मागितली ती पाहून तर आश्चर्य वाटलें. अरे, आपल्या बाळाभाऊंच्या पत्रिकेशीं या पत्रिकेचें किती साम्य ! वरें का अण्णा, आपला बाळाभाऊच. मात्र वुद्धीच्या, विद्येच्या आणि द्रव्याच्या ग्रहांत काय तो फरक, नाहींतर अगदीं एक.

**माधव**-- फारच थोडा फरक. हिंदुस्थान आणि इंग्लंड, किंवा चारुदत्त आणि शकार

**पिलंभट**-- ते ग्रह बाळाभाऊपेक्षां चांगले आहेत कीं वाईट आहेत ?

**तात्या**-- अरे हें काय विचारतोस पिलंभट ? अरे हे ग्रह असे आहेत कीं एकेक ग्रह म्हणजे हिरा आहे हिरा ! आणि पिलंभट, तूं कांहीं म्हण. या कुंडलीला याच वर्षी लग्नाचा योग आहे पिलंभट, आपल्या हिंदुस्थान देशाचे आणि बाळाभाऊचे ग्रहसुद्धां एवढी चार वर्षांची मंगळाची पीडा संपली म्हणजे उत्तम आहेत हो !

**अण्णा**-- तात्या, आतां या चार वर्षांची वाट पहात बसण्यापेक्षां आपल्या वेणूला--

**तात्या**-- अरे समजलों, या लग्नाला माझ्याकडून अगदीं बिलकूल हरकत नाहीं. अगदीं छत्तीस गुण जमत आहेत. फार गुणी मनुष्य आहे.

**पिलंभट**-- नाहीं तर कांहीं दानें किंवा शांति करायची असेल तर सांगा. प्रथमच करून टाकूं. हो-- मागाहून नको. (स्वगत) कारण हें सगळंच ठरल्याप्रमाणें सुयंत्रित होत चाललें. मग आमची शांति ?

**माधव**-- (स्वगत) मधूच्या सांगण्याप्रमाणें अगोदर या ग्रहाला शांत ठेविला पाहिजे. ( उघड ) हें पहा पिलंभट, जें काय करायचें तें सर्व करूं बरें ! (बाजूला) काळजी करूं नका !

**पिलंभट**-- (बाजूला) हो वेळेवर सुचविलेलें बरें. मागाहून आम्हांला कोणी विचारायचें नाहीं म्हणून म्हणतों.

**तात्या**-- छे: छे: ! दानांची मुळींच जरूर नाहीं. शंभर मार्कांचें स्थळ आहे. पण काय रे अण्णा, तूं त्यांना या बावतींत विचारलें आहेस का ?

**अण्णा**-- आम्हीं असें ठरविलें आहे कीं आपण सर्वांनी वेणूला त्यांच्या पदरांत टाकावी. ते कांहीं आपणां सर्वांचाच शब्द मोडायचे नाहींत [ पडद्यांत नारायण, नारायण. यशोदा, रमा, यमुना वेणूला आणून उभी करिते. ]

**वसंत**-- पद

ही एक आस मनि उरलि ।। कन्हय्या ! वजाव बजाव मुरली ।। ध्रु० ।। अणुरेणुही देहीं स्वैर ।। भिन्नता विसरली वैर ।। अब नंदलाल ! कर खैर ।। प्रेमाची दुनिया उरली ।। कन्हय्या ! बजाव ।। १ ।। उलगडति पीळ

हृदयाचे ॥ जणुं सुटति बंध देहाचे ॥ कीं जीव देहभर नाचे ॥ कुणिकडे राधिका भकलि ॥ कन्हय्या ! ॥ २ ॥ (गोविंदाग्रज)

( सर्वजण त्यांच्या पायांवर मस्तक ठेवितात. )

**अण्णा**– आम्हांला सर्वांकडे पाहून स्वामींनीं या मुलीला पदरांत घ्यावी.

**वसंत**– म्हणजे म्हणतां काय तुम्हीं ?

**तात्या**– आम्हां सर्वत्रांची अशी इच्छा आहे कीं परवां आपण म्हटल्याप्रमाणें आमच्या या मुलीचा स्वीकार करून आपण आमच्या येथेंच गृहस्थाश्रमाला सुरुवात करावी; आणि आम्हां सर्वांना पावन करावें.

**वसंत**– नारायण, नारायण ! अहो, मीं अद्याप या गोष्टीचा विचार केलेला नाहीं तोंच मला आपण आश्रमांत--

**माधव**-- (हंसून) या बाबतींत अविचार होत असला तर त्याचा विचार आम्हीं करायचा ! आपण नाहीं. आपल्याला घालूं त्या भिक्षेचा स्वीकार करणें भागच आहे.

**वसंत**-- पण अण्णासाहेब, तात्यासाहेब, मातोश्री, आपण या बाबतींत मला गळ घालूं नका. नारायण, नारायण, नारायण. ( पिलंभटाच्या कानाशीं अण्णा व यशोदा लागतात. )

**पिलंभट**-- महाराजांनीं सर्वांच्या विनंतीला मान द्यावा. पट्टशिष्याची अब्रु राखणें आतां महाराजांच्या हातांत आहे.

**वसंत**-- नारायण ! खोटी गोष्ट ! अरे, आमच्यासारख्या साधूंच्या बाबतींत आमची अब्रु आमच्या शिष्यांच्यावर अवलंबून असते. आमची अब्रु नेहमीं तुमच्या मुठींत. बरें तें असो. पण सर्वांना पुन्हां सांगतों कीं, या गोष्टीला आपण सर्वजण मला उगीच गळ घालून नारायण नारायण ... (पिलंभटाच्या कानाशीं लागतो.)

**पिलंभट**-- माधवराव, महाराज म्हणत आहेत कीं या बाबतींत तुम्हीं वेणुताईची संमति घेतली आहे का ? कारण त्यांचा निश्चय आहे कीं मीं गृहस्थाश्रम स्वीकारीन, पण त्या गोष्टीला मुलीची संमति पाहिजे.

**माधव**-- वेणु आपला वसंतच आहे ! तेव्हां तुझी संमति--

**यमुना**– (त्याच्या कानांत) आहेच !

**माधव**– अण्णा, ती म्हणते तुम्हां सर्वांच्या इच्छेबहेर मी नाहीं.

**यशोदा**– माझी पोर आहेच तशी शहाणी !

**तात्या**– मग आतां महाराज उगीच अवधि नको. आपण एकदां हो म्हटलेंत म्हणजे–

**अण्णा**– हो आम्हांला पुढील तयारीला ठीक पडेल.

**यशोदा**-- खरेंच तर काय! मला पापड, शेवयांपासून सगळी तयारी करायची

आहे. हो पण माझ्या देवीचा गोंधळ.

**अण्णा**-- घालूं वरें तुझ्या देवीला गोंधळ ! पण महाराजांनीं एकदां--

**वसंत**-- सर्वांचा ज्याअर्थी इतका आग्रह आहे त्याअर्थी आम्हींसुद्धां नारायणालाच स्मरून तुमच्या म्हणण्याला संमति देतों आणि आमच्या आश्रमाचा त्याग करतों. माधवराव, तुम्हांला वचन दिल्याप्रमाणें, आज आमच्या आश्रमाचा मी त्याग करून तुम्हां सर्वांसाठीं मी, हें तुमच्या आश्रमांत पहिलें पाऊल टाकतों आहें.

**अण्णा, तात्या, यशोदा**-- अरे, त्यांना हे कपडे बदलावयास सांग.

**माधव**-- स्वामीमहाराजांनीं थोडा वेळ कपडे बदलण्यासाठीं आंत चलावें.

(वसंत, माधव, रमा, यमुना आंत जातात.)

**मधुकर**-- (आंतून जोरानें 'वसंत, ए वसंत. बाहेर येऊन) वसंत, अरे वसंत, आई, अण्णा, स्वामीमहाराज कुठें गेले ?

**अण्णा**-- अरे आतां ते स्वामीमहाराज नाहींत.

**तात्या**-- अरे त्यांनीं आपल्या वेणूचें आनंदानें पाणिग्रहण केलें.

**पिलंभट**-- माधवरावांना कबूल केल्याप्रमाणें.

**यशोदा**-- त्यांनीं आपल्या वेणूचा स्वीकार केला.

**मधुकर**-- कुणीं आपल्या वेणूचा स्वीकार केला ?

**तात्या**-- अरे आपल्या महाराजांनीं. या पिलंभटाच्या महाराजांनीं आपल्या वेणूचा स्वीकार केला !

**मधुकर**-- 'कुणीं ? त्या गुरुमहाराजांनी ?

**सर्वजण**-- आपल्या गुरुमहाराजांनीं.

**मधुकर**-- अहो, ते गुरुमहाराज--

**तात्या**-- अति विद्वान आहेत वरें.

**अण्णा**-- अरे मधु, ते महाज्योतिषी आणि महातपस्वी आहेत वरें.

**पिलंभट**-- तसेंच मधुकर, तुम्हांला माहीतच आहे कीं ते महान् योगीहि आहेत

**यशोदा**-- आणि त्यांच्या भाकिताबद्दल तर काय बोलूच नकोस !

**मधुकर**-- तुम्हां सर्वांच्यापुढें मी काय बोलणार ! बाकी मी तुम्हांला सांगून ठेवतों कीं, तो एक महान् ढोंगी साधु आहे.

**सर्वजण**-- तो ढोंगी ?

**मधुकर**-- हो. तो ढोंगी आहे ! आणि वेणूला तुम्ही तेथें देऊं नका !

अण्णा-- तो कोणीहि असो. सर्वांच्या संमतीनें मीं जें केलें आहें तें अगदीं बरोबर आहे. माझ्या वेणूला मी तिथेंच देणार !

मधुकर-- अण्णा, या गोष्टीचा थोडा तरी विचार करा.

तात्या-- अरे, आम्हांला जो काय विचार करायचा तो आम्हीं केला आहे.

मधुकर-- तो पूर्ण विचाराचा आहे अशी तुमची खात्री आहे ?

सर्वजण-- हो. आमची खात्री आहे. (वसत कपडे बदलून रमाबाई, यमुना, वेणू यांच्यासह येतो)

मधुकर-- या मिस्टर वसंतराव–

सर्वजण-- काय; वसंत ?

मधुकर-- होय. आपला वसंतच हा. त्यानें हें सर्व कारस्थान केलें आणि आपल्या वेणूचें तुम्हां सर्वांच्या संमतीनें त्यानेंच पाणिग्रहण केलें !

तात्या--कांहीं असो. तिच्या ग्रहांचा योगच तसा होता.

अण्णा -आणि वैद्यक दृष्टीनेंहि मला तसें कांहीं वावगें दिसत नाहीं.

यशोदा–आणि सकाळीं पिलंभटाच्या देवानें कौलहि तसाच दिला आहे.

मधुकर–कांहीं असो, माझ्या एकट्याच्या असमाधानानें जर तुम्हां सर्वांचें समाधान होत असेल तर या गोष्टींत मलाहि समाधान मानून घेणें भाग आहे. शाबास गुरुमहाराज ! तुमचा दंभस्फोट मजकडून घडला त्याची मीं क्षमा मागतों.

रमाबाई--जोडा कसा छान शोभतो आहे हो.

यशोदा--अगदीं खरें. माझ्या अंबाबाईनें अगदीं माझें गाऱ्हाणें ऐकलेंन्. पण काय हो वसंतराव, तुम्हांला देव कधींपासून खेळवितां येऊं लागले ?

पिलंभट--अहो देवाचें खेळणें त्यांनीं पूर्वींच केलें आहे, पण या देवीसाठीं या देवांनीं जो हा खेळ केला--

अण्णा–पण काय हो वसंतराव, तुम्हांला वनस्पतीची माहिती इतकी असेल अशी मला कल्पना नव्हती.

तात्या–काय रे पिलंभट, या वसंतरावांचे आणि आपल्या वेणूचे ग्रह पूर्वीं कुंडली पाहिली होती त्यावेळीं बिलकुल जमत नव्हते आणि आतां अगदीं इतके सोळा आणे–

पिलंभट–अहो, त्यांनीं हा वेष अंगावर धारण केल्याबरोबर त्यांचे ग्रह एकदम असे उलटेपालटे झाले कीं त्यांनीं तुमच्या गृहांत शिरूनसुद्धां उलथापालथ

केली. रमाबाईंची त्यांनीं शुद्धि करून, अहो, माझ्यासारख्या ब्राह्मणालाहि त्यांनीं आपल्या दातृत्वानें शिष्यत्व कबूल करायला लावलें. त्यांना श्रीसरस्वति अगदीं प्रसन्न आहे.

**माधव**--हें दिसतेंच आहे. मधुकर, थोडा विचार केला म्हणजे असें वाटतें कीं, या वसंतरावानें आपल्यासाठीं म्हणा, किंवा आमच्या वेणूसाठीं म्हणा, आपली जर योग्यवेळीं काळजी घेतली नसती तर आपलें घर म्हणजे एक वेड्यांचा वाडा म्हणून प्रसिद्धीला आला असता. अर्थात् इतक्या सर्वांच्या वेडाला ज्यानें अशी त्रैलोक्यचिंतामणीची मात्रा दिली--

**अण्णा**--त्याला वैद्यकीचें ज्ञान नाहीं असें तरी कोण म्हणेल !

**वसंत**--तुम्हीं सर्वांनीं मला कांहीं म्हटलेंत तरी यावेळीं एकाद्या नाटकांतल्या नायकाप्रमाणें मला स्वतःला खरोखरच कांहीं बोलतां येण्यासारखें नाहीं. तथापि झालेल्या सर्व प्रकाराबद्दल मी तुमची मनःपूर्वक क्षमा मागतों.

**मधुकर**--वसंत, तुझ्या प्रयत्नानेंच या सर्व गोष्टीचें एक सीरियस नाटक व्हावयाच्याऐवजीं एक उत्तम आनंदपर्यवसायी प्रहसन झालें हें पाहून कोणाला आनंद होणार नाहीं ! माझ्या मनांत ही गोष्ट लिहून काढून आपल्या आवडत्या रामकवीला पाठवायची आहे. म्हणजे तो एक त्याचें चांगलें स्मारक करून ठेवील.

**पिलंभट**--आणि तें तात्याकडे वसवायला द्यावें, म्हणजे त्याचेहि उपकार फेडल्यासारखे झाले. बाकी त्या नाटकाला आम्हांला मात्र एक मुलावाळां-सुद्धां फ्री पास हवा !

**यशोदा**--खरेंच बाई, अगदीं नाटकागत सगळें वाटत आहे.

**अण्णा**--अग, नाटकागत म्हणजे, आमच्या अण्णा किर्लोस्करांच्या सुभद्राहरणांत त्यानेंसुद्धां शेवटीं अशीच गंमत उडवून दिली आहेन् आणि त्याप्रमाणेंच मीहि आतां या प्रसंगाला शोभेल असेंच सांगणार आहें. तात्या, नाटकांतल्या गर्गगुरुप्रमाणेंच आपल्या वेणूचा हात यांच्या हातांत घालून इथेंच वाङ्निश्चय करून टाका !

**पिलंभट**--पण या प्रसंगाची दक्षणा मात्र नाटकी चालायची नाहीं हो !

**यमुना, रमा**--काय सुभद्रावन्सं, शेवटीं संन्याशालाच वरलेंत !

**वेणु**--हें ग काय वहिनी !

**तात्या**--वसंतराव, तुम्हीं जे आम्हां सर्वांवर उपकार केलेत त्याची अंशतः

तरी फेड करण्यासाठीं आम्ही आपल्या वेणूचा हात आज तुमच्या हातांत देत आहोंत. त्याचा स्वीकार करा. [ हातांत हात घालतात. ]

**माधव**--आतां नाटकी भाषेंतच बोलायचें म्हणजे तुमचें आणखीं प्रिय--

**वसंत**--माझें आणखी प्रिय तें काय व्हायचें आहे. तथापि या आपल्या वेड्यांच्या बाजारांतील सर्वच व्यापाऱ्यांचें दिवाळें वाजल्यामुळेंच आज आपल्याला हा सोन्याचा दिवस दिसला. म्हणून परमेश्वराजवळ माझें एवढेंच हात जोडून मागणें आहे कीं ज्या नाट्यकलेनें आपणां सर्वांना या वेड्यांच्या बाजारांतून सहीसलामत पार पाडलें व आपलें असें प्रिय केलें त्या नाट्य-कलेची योग्य वाढ होऊन चांगल्या तऱ्हेचा तिला लोकाश्रय मिळो.

**सर्वजण**--तथास्तु.

## भरतवाक्य

ध्यातों तुज मी गुणवंता। स्वपदां संनिध ठेवी बलवंता ॥ धृ० ॥
आम्हा, रामा, नाट्यमंदिरीं, स्वतंत्र जगिच्या रंगभूमिवर।
रंगभूमिवरी आर्यनटाप्रति, दे प्रभु अभया, तशी मान्यता ॥ १ ॥

श्लोक

आकाशात् पतितं तोयं यथा गच्छति सागरम् ॥
सर्वदेवनमस्कारः श्रीकेशवं प्रतिगच्छति ॥ १ ॥

IRBK-0120344

समाप्त

म. प्र. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
क्र. ४०३ ... वि ...
वि. नाटक क्र. १२४५८